इचलकरंजी R.N.I. Regi. No. 63119/94 ■ पोस्टल रजि.नं. KLR/78/2024-2026 ■ अंक -१२९ ■ वर्ष - ४२

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव

## पावसाच्या ओढीचा डाळी,तांदूळ,गव्हाच्या भावावर परिणाम

पुणे,ता.७-

**उत्पादन क्षेत्रात पावसाने ओढ दिल्याचा परिणाम गुलटेकडी मार्केट यार्डातील भुसार बाजारातील धान्य आणि डाळींच्या दरांवर दिसू लागला आहे. उत्पादन घटण्याची शक्यता असल्याने तूरडाळ आणि मूगडाळीच्या दरात किलोमागे प्रत्येकी पाच रुपयांची, तर हरभरा डाळीच्या दरात तीन रुपयांची वाढ झाली आहे. बेसनच्या भावातही किलोमागे तीन रुपयांनी वाढ झाली.**

कर्नाटकातील तांदूळ उत्पादक भागात पावसाने दडी मारल्याने नोव्हेंबरमध्ये बाजारात दाखल होणाऱ्या नवीन पिकाबाबत चिंता निर्माण झाली आहे. त्याचा परिणाम उकडा आणि कोलम तांदळाच्या दरावर झाला असून, दोन्ही प्रकार किलोमागे एक रुपयाने महागले आहेत. आगामी काळात तांदळाच्या दरात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.उत्पादन क्षेत्रातून गव्हाची आवक कमी झाल्याने गव्हाच्या दरातही किलोमागे एक रुपयाची वाढ झाली आहे.

मंगळवार,ता.८ सप्टेंबर २०२६ | श्रावण कृ.१२ | www.emahasatta.com | E-mail : mahasatta@gmail.com | पाने १२ | किंमत ₹ ५.००

### महाराष्ट्रासह बावीस राज्यांना पावसाचा इशारा

■ नवी दिल्ली,ता.७-

**दक्षिण-पश्चिम मॉन्सून सक्रिय असल्याने महाराष्ट्रासह देशातील २२ राज्यांना भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) पावसाचा अलर्ट दिला आहे.**

हवामान विभागाच्या माहितीनुसार दिल्ली-एनसीआर, उत्तर प्रदेश, बिहार, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, पंजाब, हरियाणा, राजस्थान(पान २ वर)

### दिल्ली दुर्घटना प्रकरणी उपायुक्तांसह पाच अधिकारी निलंबित

■ नवी दिल्ली,ता.७-

**सत्य निकेतन पीजी इमारत दुर्घटनेप्रकरणी दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी कारवाई करत दिल्ली महानगरपालिकेच्या (एमसीडी) दक्षिण विभागाच्या उपायुक्तांसह पाच अधिकाऱ्यांना निलंबित केले.**

या अपघातात आतापर्यंत सहा जणांचा (पान २ वर)

### अंतरवालीत या, जरांगेंचे आवाहन

■ छ.संभाजीनगर,ता.७-

**सव्वा ते तीन कोटी मराठा मुंबईत येऊ शकतो, यावेळी आंदोलकांनी स्व-संरक्षासाठी झाडू ठेवावा.**

आजपासून कामाला लागा, सर्वांनी १२ तारखेला अंतरवालीमध्ये यायचे आहे असे आवाहनही मराठा (पान २ वर)

### गळीत हंगाम तीन महिन्यातच आटोपणार

■ पुणे,ता.७-

**राज्यात यंदा खोडवा उसाचे प्रमाण सुमारे ६० टक्के असून, नव्याने झालेली ऊस लागवड कमी आहे.**

त्यामुळे क्षेत्रनिहाय उसाचे क्षेत्र अधिक दिसत असले तरी कारखान्यांची वाढलेली प्रतिदिन १०.४० लाख टन गाळप क्षमता लक्षात घेता २०२६-२७ चा गळीत हंगाम शंभर दिवसांच्या आत संपण्याची (पान २ वर)

### जिल्ह्यातील प्रमुख धरणांचा पाणीसाठा

| धरण | क्षमता (टीएमसी) | साठा (टीएमसी) |
|---|---|---|
| कोयना | १०५.२५ | १०५.०१ |
| राधानगरी | ८.३६ | ०८.३३ |
| तुळशी | ३.४७ | ०३.४७ |
| वारणा | ३४.४० | ३४.४० |
| काळम्मावाडी | २५.३९ | २५.३९ |
| कासारी | २.७७ | २.७६ |
| कडवी | २.५२ | २.५२ |
| कुंभी | २.७२ | २.७१ |
| पाटगाव | ३.७२ | ३.७१ |
| चिकोत्रा | १.५२ | १.३९ |
| चित्री | १.८९ | १.८९ |
| जंगमहट्टी | १.२२ | १.२२ |
| घटप्रभा | १.५६ | १.५१ |
| जांबरे | ०.८२ | ०.७८ |
| आंबेआहोळ | १.२४ | १.२४ |
| सर्फनाला | ०.६७ | ०.६७ |
| धामणी | १.२९ | ०१.२९ |

| सोने प्रति तोळा | चांदी प्रति किलो |
|---|---|
| १५३००० रु. | २३४५०० रु. |

अंडी ५८० रुपये शेकडा

### हास्यतुषार -सुरेंद्र दास



आम्ही मोर्चा काढला की,लगेच म्हणायचे पोळी भाजून घेतो, आणि तुम्ही काढले की देश प्रेम म्हणायचे काय ?

# जिल्हा बँकेसाठी ठरावांचा धडाका

### दिवसात २,०३५ ठराव दाखल आतापर्यंत ५,५१२ संस्थांची नोंद

■ कोल्हापूर,ता.७(प्रतिनिधी)-

**कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी पंचवार्षिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संस्थांचे ठराव दाखल करण्याच्या प्रक्रियेला आता निर्णायक वेग आला आहे. जिल्हा बँकेच्या निवडणुकीतील मतदारसंघनिहाय**



**राजकीय गणित ठरविण्यात महत्त्वाची भूमिका असलेल्या ठरावांसाठी राजकीय गटांकडून जोरदार प्रयत्न सुरू आहेत. सोमवारी एकाच दिवसात तब्बल २ हजार ३५ ठराव दाखल झाल्याने आतापर्यंत दाखल ठरावांची संख्या ५ हजार ५१२** वर पोहोचली आहे.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी जिल्ह्यातील सुमारे १२ हजार २४३ संस्थांचे ठराव अपेक्षित आहेत. त्या तुलनेत आतापर्यंत ५ हजार ५१२ ठराव दाखल झाले आहेत. त्यामुळे अद्याप मोठ्या संख्येने संस्थांचे ठराव दाखल होणे बाकी आहे. ९ सप्टेंबर रोजी सायंकाळी पाच वाजता ठराव दाखल करण्याची अंतिम मुदत संपणार आहे. त्यामुळे उर्वरित दोन दिवस जिल्हा बँकेच्या निवडणुकीच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरणार आहेत.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीत विविध मतदारसंघांतील संस्थांचे ठराव निर्णायक मानले जातात. त्यामुळे कोणत्या गटाच्या बाजूने किती संस्थांचे ठराव दाखल होतात, यावर आगामी निवडणुकीतील राजकीय ताकदीचा (पान २ वर)

# एमपीएससीच्या कारभाराविरोधात कोल्हापुरात विद्यार्थ्यांचा आक्रोश मोर्चा

## अध्यक्षांच्या राजीनाम्यासह विविध मागण्यांचे निवेदन



■ कोल्हापूर,ता.७ (प्रतिनिधी)-

**एमपीएससी परीक्षा पेपरफुटी आणि परीक्षा प्रक्रियेतील गैरप्रकारांविरोधात स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संतापाचा उद्रेक सोमवारी कोल्हापुरात पहायला मिळाला. ऐतिहासिक दसरा चौकातून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत विद्यार्थ्यांनी आक्रोश मोर्चा काढत प्रशासन आणि एमपीएससीच्या कारभाराविरोधात घोषणाबाजी केली.**

सकाळी साडेअकराच्या सुमारास दसरा (पान २ वर)

# शिंदे समितीने शोधलेल्या नोंदी प्रसिध्द केल्या जाणार

### ना.विखे-पाटील

■ अहिल्यानगर,ता.७-



**निवृत्त न्यायमूर्ती शिंदे समितीने शोधलेल्या ५८ लाख नोंदी ग्रामपंचायतींमध्ये प्रसिद्ध केल्या जाणार असून, १० ते १७ सप्टेंबर दरम्यान प्रत्येक जिल्ह्यात शिबिरे आयोजित करावीत; तसेच सर्व जिल्ह्यांमधील अधिकाऱ्यांनी योग्य समन्वय ठेवून आरक्षणातील प्रत्येक प्रश्नाबाबत गांभीर्याने कार्यवाही करावी, अशा सूचना मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी विभागीय आयुक्तांसह सर्व जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या.**

मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी मराठवाड्यातील धाराशिव, बीड, छत्रपती संभाजीनगर, परभणी, हिंगोली, लातूर, जालना या जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी व प्रांताधिकारी यांच्याशी दूरदृश्यप्रणालीद्वारे (पान २ वर)

**आरक्षणाच्या प्रश्नाबाबत सरकारची चर्चेची तयारी**

**मराठा आरक्षणाबाबत सरकार केवळ आश्वासने देत असल्याच्या मनोज जरांगे पाटील यांच्या आरोपावर बोलताना मंत्री विखे-पाटील म्हणाले की, मागील आंदोलनातील बहुतांश मागण्यांवर सरकारने कार्यवाही केली आहे. उर्वरित मागण्यांवरही मार्ग काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. इतर कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देण्याची सरकारची भूमिका असून, आरक्षणाच्या मुद्द्यावरून मनोज जरांगे पाटील यांच्याशी चर्चा करण्याची सरकारची कधीही तयारी आहे.**

# सरकार जाणीवपूर्वक हलगर्जीपणा करत आहे

■ छ.संभाजीनगर,ता.७-



**सरकार जाणून बुजून हयगय, हलगर्जीपणा करत आहे. मराठ्यांचा रोष वाढत आहे. मराठा संपवण्यासाठी जाणूनबुजून हलगर्जीपणा चालला आहे, असा आरोप मराठा आंदोलक जरांगे यांनी केला आहे.**

त्यांच्या आंदोलनाचा १० वा दिवस होता. सरकारने अद्यापही त्यांच्या सगळ्या मागण्या मान्य न केल्याने उपोषण सुरूच आहे. त्याच पार्श्वभूमीवर माध्यमांशी बोलताना जरांगे-पाटील यांनी मुख्यमंत्री फडणवीसांना लक्ष्य केले.

### जरांगेंचा मुख्यमंत्र्यांवर आरोप

फडणवीसांनी मला फोन केला होता, मी त्यांच्याशी बोललो. हैदराबाद गॅझेटचा जीआर निघाल्यानंतर हा फोन आला होते, तेव्हा या जीआरनुसार एकही मराठा वंचित राहू देणार नाही, असे फडणवीसांनी म्हटल्याचे जरांगे पाटलांनी सांगितले. सरकार जाणून बुजून हलगर्जीपणा करत आहे.मराठ्यांचा रोष वाढत आहे.मराठा संपवण्यासाठी जाणूनबुजून हलगर्जीपणा चालला आहे. सरकारला १२ तारखेपर्यंतचा वेळ दिलाय. सगळ्या मंत्र्यांनी सांगितले होते, तुम्हाला उपोषणाची वेळ येणार नाही म्हणून. मार्च, फेब्रुवारीला प्रसाद लाड म्हटले होते, आम्हाला बोलवा. ते म्हणाले, फडणवीस मराठ्यांच्या मागण्या पूर्ण करतील. म्हणून लाड यांना बोलावले होते, एक वर्षात त्यांनी काही केले नाही. असे म्हणत जरांगे पाटलांनी मुख्यमंत्र्यांनाही लक्ष्य केले.

### तीन बळी घेणारी वाघिण अखेर जेरबंद

■ अमरावती,ता.७-

**गेल्या अकरा दिवसांत तीन जणांचे बळी घेणाऱ्या वाघिणीला बेशुद्ध करुन पिंजऱ्यात बंदिस्त करण्यात वनविभागाच्या पथकाला यश प्राप्त झाले आहे.**

शिरजगाव कसबा नजीक सोमवारी दुपारी शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यावर वाघिणीने हल्ला केला होता. त्यात या शेतकऱ्याचा मृत्यू झाला होता. त्यानंतर वनविभागाच्या पथकाने शोधमोहीम तीव्र केली होती. शिरजगाव कसबा येथील एका शेतातून या वाघिणीला जेरबंद करण्यात आले.

रविवारी सायंकाळी वाघिणीने चांदूर बाजार तालुक्यातील सोनोरी येथील शेतशिवारात (पान २ वर)

# दुचाकीवरून पडल्याने महिला जागीच ठार

■ सरूड,ता.७ (प्रतिनिधी)-

**शाहूवाडी तालुक्यातील भेडसगाव बांबवडे मार्गावर मोटारसायकलचा पेडल तुटून झालेल्या अपघातात निलाबाई आनंदा माने (वय ५१, रा. हारुगडेवाडी, ता. शाहूवाडी) यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेची नोंद शाहूवाडी पोलिसात झाली आहे.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी सकाळी पावणेअकरा वाजता हा अपघात झाला. मयत निलाबाई माने या त्याच गावातील गोरख बापू शिंदे (वय५०) यांच्या मोटारसायकल वरून भेडसगाव येथील निलकंठेश्वर मंदिरात दर्शनासाठी गेल्या होत्या.तेथून भेडसगाव-बांबवडे मेन रोडने हारुगडेवाडीच्या दिशेने जात असताना मोटारसायकलचे पेडल तुटले. त्यामुळे निलाबाई माने यांचा तोल जाऊन त्या रस्त्यावर पडल्या. त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यांना तातडीने मेढसगाव येथील सरकारी दवाखान्यात उपचारासाठी नेण्यात आले. मात्र उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला.

# म्हात्रेंना रस्त्यावर फिरण्याचा अधिकार नाही;तुरूंगातच टाका

## डोंबिवली डॉक्टर हल्ला प्रकरणी 'सुप्रीम'चे ताशेरे

■ नवी दिल्ली,ता.७-

**डोंबिवली (जि. ठाणे) शास्त्रीनगर रुग्णालयातील डॉक्टरांवर झालेल्या हल्ल्याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने शिवसेना नगरसेवक रमेश म्हात्रे यांच्यावर अत्यंत कडक शब्दांत ताशेरे ओढले आहे.**

अशा लोकांना मोकळेपणाने रस्त्यावर फिरण्याचा कोणताही अधिकार नाही, त्यांना स्थानबद्ध करायला हवे अशा कठोर शब्दांत न्यायालयाने आपली नाराजी व्यक्त केली. या प्रकरणात राज्य सरकारने म्हात्रे यांचा जामीन रद्द करण्यासाठी दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने नोटीस बजावली असून, पुढील सुनावणी २८ सप्टेंबर रोजी होणार आहे.

न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. सुनावणी दरम्यान म्हात्रे यांच्यावतीने ज्येष्ठ



वकील मुकूल रोहतगी यांनी याचिका मागे घेण्याची परवानगी मागितली.न्यायालयाने याचिका मागे घेण्यास परवानगी न देता ती फेटाळून लावली. मात्र, राज्य सरकारने म्हात्रे यांच्याविरोधात दाखल केलेल्या याचिकेची न्यायालयाने दखल घेत त्यांना नोटीस बजावली. डॉक्टरांच्या केबिनमध्ये घुसून त्यांना अमानुषपणे मारहाण करणे कसे समर्थनीय (पान २ वर)

# विलिनीकरणासाठी भाजप आग्रही

### उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार,पार्थ पवारांचा मात्र विरोध

■ नवी दिल्ली,ता.७-

**दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार अशा चर्चा अनेक दिवसांपासून राजकीय वर्तुळात सुरू आहेत. मात्र याबाबत एकाही गटाने अधिकृतपणे प्रतिक्रिया दिलेली नाही अथवा आपली जाहीर भूमिका मांडलेली नाही. अशातच आता राष्ट्रवादी विलिनीकरणाबाबत भाजपने सुनेत्रा पवार, पार्थ पवार यांना निर्णय घेण्यासाठी मुदत दिल्याची माहिती समोर** येत आहे.



दोन्ही राष्ट्रवादी एकत्र यावे अशी भाजपच भूमिका आहे. राष्ट्रवादी विलिनीकरणासाठी भाजप आग्रही असल्याची माहिती सुत्रांकडून मिळाली आहे. भाजपचे पदाधिकारी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि पार्थ पवारांसमवेत चर्चा करत आहे. तर, दुसरीकडे शरद पवार (पान २ वर)

# आजऱ्यात एमडी ड्रग्जसह कोल्हापुरचे दोघे ताब्यात

## दीड लाखाचा मुद्देमाल जप्त

■आजरा,ता.७ (प्रतिनिधी)-

**अंमली पदार्थांची विक्री करण्याच्या उद्देशाने आंबोली-आजरा मार्गावरून मोटारसायकल वरून येणाऱ्या दोघांना स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने सापळा रचून ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातून १६ ग्रॅम मेफेड्रोन (एमडी) ड्रग्ज, दोन मोबाईल हँडसेट आणि सुझुकी कंपनीची ॲक्सेस मोपेड असा एकूण १ लाख ५८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.**



अंमली पदार्थांची साठवणूक व विक्री करणाऱ्यांचा शोध घेण्यासाठी पोलीस उपनिरीक्षक जालिंदर जाधव यांच्या नेतृत्वाखाली पथक तयार करण्यात आले होते. दरम्यान, ७ सप्टेंबर २०२६ रोजी पथकातील पोलीस अंमलदार समीर कांबळे व योगेश गोसावी यांना बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, आजरा पोलीस ठाणे हद्दीतील आंबोली-आजरा मार्गावरून ॲक्सेस मोटारसायकलवरून दोन इसम अंमली पदार्थ विक्री (पान २ वर)

### गोकुळच्या निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून

# प्रांताधिकारी चौगलेंची नियुक्ती

■ कोल्हापूर,ता.७ (प्रतिनिधी)-

**जिल्हा दूध उत्पादक संघ अर्थात 'गोकुळ' दूध संघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून करवीरच्या उपविभागीय अधिकारी मौसमी चौगले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र सहकार निवडणूक प्राधिकरणाचे सचिव अशोक गाडे यांनी सोमवारी त्यांच्या नियुक्तीचे आदेश काढले. चौगले येत्या दोन दिवसांत गोकुळच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्याची शक्यता आहे.**

**दोन दिवसांत निवडणूक कार्यक्रम जाहीर होणार?**

जिल्हा दूध संघाच्या निवडणुकीसाठी अंतिम मतदार यादी ४ सप्टेंबर रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानंतर दहा दिवसांच्या आत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नियुक्ती करून निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्याची प्रक्रिया आहे. त्यानुसार मौसमी चौगले यांची नियुक्ती करण्यात आली.

गोकुळच्या निवडणूक निर्णय अधिकारीपदी कोणाची नियुक्ती होणार, याबाबत गेल्या काही दिवसांपासून सहकार क्षेत्रात चर्चा सुरू होती. सहकार निवडणूक प्राधिकरणाकडून (पान २ वर)

# गडहिंग्लज नगराध्यक्षांची याचिका फेटाळली

## मुश्रीफ गटाच्या राष्ट्रवादीला जोरदार धक्का

■ गडहिंग्लज,ता.७ (प्रतिनिधी)-

**अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या जागेवरून गडहिंग्लज नगरपरिषदेचे नगराध्यक्ष म्हणून निवडून आलेले महेश महादेव तुर्बतमठ यांनी दाखल केलेली रिट याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचने फेटाळून लावली. न्यायमूर्ती शर्मिला देशमुख आणि न्यायमूर्ती नीरज धोटे यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. या निर्णयामुळे गडहिंग्लज नगरपरिषदेतील मंत्री हसन मुश्रीफ यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस गटाला धक्का बसला आहे.**

महेश तुर्बतमठ यांनी निवडणुकीवेळी गडहिंग्लजच्या उपविभागीय अधिकाऱ्यांनी दिलेले बेडा जंगम या अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र सादर केले होते. या प्रमाणपत्राच्या आधारे त्यांनी अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या नगराध्यक्षपदाच्या जागेवरून राष्ट्रवादी काँग्रेसच्या झेंड्याखाली निवडणूक लढवून विजय मिळवला होता. मात्र, त्यांच्याविरुद्ध निवडणूक लढवून पराभूत झालेले अनुसूचित जातीचे विनोद रामू बिलावर यांनी तुर्बतमठ यांच्या जातदाव्यावर आक्षेप घेत कोल्हापूर जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे लेखी तक्रार दाखल केली होती. (पान २ वर)

महासत्ता



(पान १ वरून)

## महाराष्ट्रासह बावीस राज्यांना पावसाचा इशारा

मध्य प्रदेश, महाराष्ट्र, छत्तीसगड, झारखंड, पश्चिम बंगाल, ओडिशा तसेच ईशान्येकडील राज्यांमध्ये पुढील काही दिवस पाऊस,मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि जोरदार वारे वाहण्याची शक्यता आहे.काही भागांत वाऱ्याचा वेग ताशी ७० किलोमीटरपर्यंत जाण्याचा अंदाज आहे. उत्तराखंड, हिमाचल प्रदेश यांसारख्या डोंगराळ भागांत मुसळधार पावसामुळे भूस्खलन आणि मातीची धूप होण्याचा धोका वाढला आहे. महाराष्ट्रात कोकण आणि गोव्यात पावसाची शक्यता असून, विदर्भात १० ते १२ सप्टेंबरदरम्यान मुसळधार पावसाचा अंदाज आहे. नागरिकांनी हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करून सतर्क राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. सप्टेंबरच्या सुरुवातीपासून राज्यातील काही भागांत पावसाचा जोर कायम आहे. मॉन्सूनशी संबंधित हवामान प्रणाली सक्रिय असल्याने पुढील काही दिवस राज्यात पावसाची स्थिती कायम राहण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस होण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## हंगाम तीन महिन्यातच आटोपणार

शक्यता निर्माण झाली आहे.परिणामी कारखाने सरासरी १५० दिवस चालविण्याचे आव्हान पुन्हा एकदा साखर उद्योगासमोर उभे राहिले आहे.या पार्श्वभूमीवर कारखान्यांनी ऊस विकास कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी धोरणात्मक उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे. वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशनचे (विस्मा) अध्यक्ष बी. बी. ठोंबरे यांनी साखर आयुक्त डॉ.संजय कोलते यांना निवेदन देऊन साखर उद्योगासमोरील विविध प्रश्नांकडे लक्ष वेधले आहे. मंत्री समितीच्या बुधवारी होणाऱ्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर हे निवेदन देण्यात आले. कमी पर्जन्यमानामुळे उभ्या उसावर दुष्काळसदृश परिस्थितीचा परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे उपलब्ध ऊस कमी झाल्यास कारखाने शंभर दिवसांपर्यंतच सुरू राहण्याची भीती विस्माने व्यक्त केली आहे.ऊस उपलब्धता वाढविण्यासाठी ऊस विकास कार्यक्रमांना गती देण्याची आवश्यकता असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

## पाच अधिकारी निलंबित

मृत्यू झाला आहे. मुख्यमंत्र्यांनी निलंबित केलेल्या अधिकाऱ्यांमध्ये दक्षिण उपायुक्त राकेश कुमार,अधीक्षक अभियंता रणवीर सिंग, कार्यकारी अभियंता (इमारत) ललित कुमार गोयल, सहायक अभियंता (इमारत) सुनील चौहान आणि कनिष्ठ अभियंता (इमारत) आशिष कुमार यांचा समावेश आहे.

मुख्यमंत्र्यांनी सोमवारी पुन्हा अपघातस्थळी भेट देऊन मदत आणि बचाव कार्याचा आढावा घेतला. तळघर पाण्याने भरले असून पाणी साचल्याने तसेच जुन्या इमारतीत सुरू असलेल्या दुरुस्तीच्या कामामुळे इमारत कोसळली. आतापर्यंत १२ जणांना बाहेर काढण्यात आले असून, त्यापैकी सहा जणांचा मृत्यू झाला असून उर्वरित सहा जणांची प्रकृती स्थिर आहे. दिल्लीतील पाचव्या मजल्यावरील इमारती तातडीने सील करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत. जवळपासच्या पीजी आणि इमारतींची सखोल तपासणी करण्याचे आणि नियमांचे उल्लंघन आढळल्यास सील करण्याचे निर्देशही त्यांनी दिले आहेत.

## अंतरवालीत या-जरांगे

बांधवांना जरांगे पाटलांनी केले.मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनावर मंत्री उदय सामंत यांनी भाष्य केले.विखे पाटील यांनी आत्ताच ऑनलाईन बैठक घेतली आहे,मीही त्यात होतो.सगळे अधिकारी त्यात होते, आम्ही यावर तोडगा काढण्याचा प्रयत्न करतोय.तुमच्या माध्यमातून देखील मी जरांगे पाटील यांना विनंती करेल की, त्यांनी तब्येतीची काळजी घ्यावी, प्रश्न सुटतच राहणार आहेत, पण आपली प्रकृती, आपला जीव देखील महत्त्वाचा आहे. त्यादृष्टीने त्यांनी आंदोलन स्थगित करावे अशी विनंती उदय सामंत यांनी चंद्रपूर दौऱ्यात असताना केली.दरम्यान, ओबीसी समाजाचे आरक्षण कुठल्याही प्रकारे कमी होणार नाही असे महायुती सरकारचे धोरण आहे. मुख्यमंत्र्यांनी देखील हे घोषित केले आहे की, ओबीसी समाजाच्या कुठल्याच आरक्षणाला धक्का लागणार नाही, असेही सामंत यांनी स्पष्ट केले.

## वाघिण अखेर जेरबंद

एका १८ वर्षीय युवतीवर हल्ला करून तिला ठार केले होते. त्यानंतर ड्रोनच्या सहाय्याने वाघिणीचा शोध सुरू करण्यात आला. परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर वाघिणीला बेशुद्धीकरणाचे इंजेक्शन देऊन बंदिस्त करण्याचा निर्णय घेण्यात आला. एका शेतात वाघिण थांबून असल्याची माहिती वन विभागाच्या पथकाला मिळाली होती. पुणे येथील रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्टचे पशुवैद्यक डॉ. हेमराज यांनी वाघिणीला यशस्वीपणे डार्ट करून बेशुद्ध केले. त्यानंतर वाघिणीला पिंजऱ्यात टाकण्यात आले.

## विलीनीकरणासाठी आग्रही

गटासोबत जवळीक वाढवण्याचे देखील प्रयत्न सुरु आहेत. राष्ट्रवादी विलिनीकरणासाठी भाजप आग्रही असली तरी राष्ट्रवादी विलिनीकरणास उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि पार्थ पवारांचा विरोध असल्याची देखील चर्चा आहे. प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ यांच्यासह सर्व मंत्री, आमदार मात्र विलीनीकरणाच्या बाजूने असल्याची माहिती सुत्रांकडून मिळाली आहे.

गेल्या आठवड्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षावर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पार्थ पवार आणि जय पवार यांच्यासोबत विलिनीकरणा संदर्भात बैठक झाली. भाजपच्या केंद्रीय नेतृत्वानाकडूनही दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाचा आग्रह आहे. सुनेत्रा पवार, पार्थ पवार यांना लवकर निर्णय घेण्यासाठी मुदत दिल्याची माहिती समोर आली आहे.

## म्हात्रेंना तुरूंगातच टाका

ठरू शकते, असा सवाल खंडपीठाने उपस्थित केला. डॉक्टरांवरील हल्ला हा केवळ कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न नसून सार्वजनिक सुरक्षेशी संबंधित गंभीर बाब असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. खटला वेगाने चालवला जात असल्याबाबत रोहतगी यांनी आक्षेप घेतला असता, खटल्याची सुनावणी वेगाने झाली तर त्यात गैर काय? असा सवाल न्यायालयाने केला. अशा घटनांबाबत समाजात कठोर संदेश जाणे आवश्यक असल्याचेही खंडपीठाने स्पष्ट केले.

दरम्यान, सुनावणीवेळी न्यायालयाने पालघरमध्ये नुकत्याच डॉक्टरांवर झालेल्या हल्ल्याचाही उल्लेख केला.डॉक्टरांना वारंवार लक्ष्य केले जात असल्याच्या घटनांबाबत सर्वोच्च न्यायालयाने गंभीर चिंता व्यक्त केली. डॉक्टरांवरील हिंसाचार खपवून घेतला जाऊ नये, असा स्पष्ट संदेश या सुनावणीतून देण्यात आला आहे.

# आजरा-कागल तालुक्यातील प्रलंबित कामांचा ना.मुश्रीफ यांच्याकडून आढावा

■ कोल्हापूर,ता.७ (प्रतिनिधी)-

**वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात कागल व आजरा तालुक्यातील विविध प्रलंबित प्रश्नांचा मॅरेथॉन आढावा घेतला.**

यावेळी बोलताना मुश्रीफ म्हणाले, उत्तुर येथील बस स्थानकाचे प्रलंबित असलेले बांधकाम येत्या आठ दिवसात मार्गी लावावे. मौजे सिद्धनेर्ली येथील हरीजन सोसायटीचे ऑडिट पुन्हा एकदा नव्याने करून ती संस्था पुनर्जीवित करून घ्यावी. तसेच पुनर्जीवित प्रस्ताव जिल्हा उपनिबंधक मार्फतसह जिल्हा निबंधकला पाठवावा. जिल्हा प्रशासनाच्या सहाय्याने कागल तालुक्यातील म्हाकवे येथील गावठाण वाडीतील प्लॉट स्थानिकांना देण्याबाबत सकारात्मक निर्णय घेऊ. मौजे हणबरवाडी व तमनकवाडा येथील रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाने लवकरात लवकर तयार करून ग्रामस्थांची सोय करावी.कोगनोळी ते करनुर येथील बोगद्याच्या उंची वाढवण्याबाबतचा प्रश्न कंत्राटदार व ग्रामस्थांनी एकत्र येऊन त्यावर तोडगा काढावा तसेच ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार



त्या बोगद्याची उंची ठेवावी असे निर्देश त्यांनी यावेळी दिले. बाळेघोल येथील रामपूरवाडी गावठाणातील १०० प्लॉट ग्रामस्थांना घरे बांधण्यासाठी वाटण्यात आलेले आहेत या प्लॉटची नियमानुसार शासकीय मोजणी करून तेथील नागरिकांना प्रॉपर्टी कार्ड देण्यासंदर्भात भूमि अभिलेख कार्यालयाने सकारात्मक कार्यवाही करावी असेही ते म्हणाले.

आजरा तालुक्यातील उत्तुर इंदिरानगर येथील गावठाणासंदर्भात स्थानिकांना प्रॉपर्टी कार्ड मिळण्याबाबत प्रशासन सकारात्मक असून भूमी अभिलेख कार्यालयाने पंधरा दिवसात एटीआर (अँक्शन टेकन रिपोर्ट) दाखल करावा असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांनी या बैठकीत दिले तर कागल तालुक्यातील बाळेघोल येथील राहणाऱ्या नागरिकांना लेआउट प्रमाणे प्रॉपर्टी कार्ड मिळावे अशी मागणी स्थानिक रहिवाशांनी या बैठकीत केली. यावेळी मंत्री मुश्रीफ यांनी कागल तालुक्यातील मौजे सिद्धनेर्ली, बाळेघोल मांगनुर, म्हाकवे,हणबरवाडी, तमनकवाडा तसेच आजरा तालुक्यातील उत्तुर येथील नागरिकांना भेडसवणाऱ्या समस्यांचा दीर्घ असा आढावा घेतला.

या बैठकीसाठी माजी आमदार संजय घाडगे, जिल्हाध्यक्ष भूमी अभिलेख शिवाजी भोसले, उपजिल्हाधिकारी डॉ. संपत खिलारी, हेमंत निकम, राधानगरी प्रांताधिकारी प्रसाद चौगुले, कागल तहसीलदार अमरदीप वाकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता क्रांतीकुमार मिरजकर भाऊसाहेब हजारे, एसटीच्या वैशाली भोसले यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी आणि कंत्राटदार उपस्थित होते.

# कोल्हापुरात विद्यार्थ्यांचा आक्रोश मोर्चा

(पान १ वरून )

चौकातून सुरू झालेला मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर पोहोचल्यानंतर त्याचे सभेत रूपांतर झाले. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या व्यथा मांडत एमपीएससीच्या परीक्षा प्रक्रियेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले.

एमपीएससी अध्यक्षांचा तात्काळ राजीनामा घेऊन उच्चस्तरीय चौकशी करावी, गट 'ब' परीक्षेतील आक्षेपांवर आयोगाने आठ दिवसांत स्पष्टीकरण द्यावे, परीक्षा प्रक्रियेत मल्टिलेयर सिक्युरिटी आणि डिजिटल ऑडिट ट्रेल अनिवार्य करावे, स्वतंत्र तक्रार निवारण यंत्रणा सुरू करावी, रद्द झालेल्या परीक्षांचे कालबद्ध वेळापत्रक जाहीर करावे, तसेच संशयित परीक्षांच्या निकालांची स्वतंत्र चौकशी करावी, अशा मागण्या विद्यार्थ्यांनी केल्या.

लघुलेखक पद पुनर्जीवित करावे, २५ ऑक्टोबरची गट 'क' पूर्व परीक्षा पारदर्शक पध्दतीने घ्यावी, कोल्हापूरला मुख्य परीक्षेचे केंद्र जाहीर करावे आणि बोगस प्रमाणपत्रधारकांवर कठोर कारवाई करावी, अशीही मागणी यावेळी करण्यात आली.

दरम्यान, जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात विद्यार्थ्यांचे ठिय्या आंदोलन सुरू असताना याच मार्गावरून दोन ॲम्ब्युलन्स आल्या.

ॲम्ब्युलन्स दिसताच विद्यार्थ्यांनी क्षणाचाही विलंब न करता शिस्तीत बाजूला होत रुग्णवाहिकेसाठी वाट मोकळी करून दिली.

आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांनी दाखवलेल्या या संवेदनशीलतेचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले.

यावेळी श्वेता परुळेकर, शुभम शिरहट्टी, विवेकानंद पाटील, सारिका गुघे, अरुण पाटील, शुभम यादव, साक्षी कुसाळे, शुभम इंदुलकर, ओंकार पाटील, बाबासो माने, राहुल इंगळे, अनिकेत पाटील, प्रेम चौगुले, अंकिता नायकवडी, अंबोली कांबळे, सूरज रोंगे, करण कवठेकर आदी उपस्थित होते.

**मंत्री मुश्रीफ यांना निवेदन**

मंत्री हसन मुश्रीफ हे जिल्हाधिकारी कार्यालयात बैठकीसाठी आले होते. बैठक संपल्यानंतर विद्यार्थ्यांनी त्यांची भेट घेऊन मागण्यांचे निवेदन दिले. मंत्री मुश्रीफ यांनी निवेदन स्वीकारून विद्यार्थ्यांना सकारात्मक प्रतिसाद दिला.

## कोल्हापुरात १७ सप्टेंबरपासून लष्कर भरती मेळावा

■ कोल्हापूर,ता.७ (प्रतिनिधी)-

**अग्निपथ योजनेंतर्गत भारतीय लष्कराच्या कोल्हापूर सैन्य भरती कार्यालयामार्फत छत्रपती संभाजी महाराज विभागीय क्रीडा संकुल येथे १७ ते २९ सप्टेंबर या कालावधीत लष्कर भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.**

महाराष्ट्र व गोवा राज्यातील युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देतानाच देशसेवेची संधी मिळावी, हा या भरती मेळाव्याचा उद्देश आहे.

या भरती प्रक्रियेत अग्निवीर जनरल ड्युटी,अग्निवीर टेक्निकल तसेच अग्निवीर ट्रेड्समन १० वी व ८ वी उत्तीर्ण पदांसाठी भरती केली जाणार आहे. महाराष्ट्रातील कोल्हापूर, सातारा, सांगली, सिंधुदुर्ग व रत्नागिरी तसेच गोवा राज्यातील उत्तर गोवा व दक्षिण गोवा जिल्ह्यातील अधिवासी उमेदवार या भरतीसाठी पात्र आहेत. वैध प्रवेशपत्र, प्रतिज्ञापत्र व आवश्यक कागदपत्रे असलेल्या उमेदवारांनाच भरतीस्थळी प्रवेश दिला जाणार आहे.

## जिल्हा बँकेसाठी ठरावांचा धडाका

(पान १ वरून )

अंदाज येणार आहे. यामुळे ठराव दाखल करण्याच्या अंतिम टप्प्यात सहकार क्षेत्रातील नेते आणि राजकीय गटांकडून संस्थांशी संपर्क वाढविला जात असून, अधिकाधिक ठराव आपल्या बाजूने करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा सुरू आहे.

ठराव दाखल करण्यात करवीर तालुका ४२६ ठरावांसह आघाडीवर आहे. कागले २६९, राधानगरी २४३, चंदगड २०६, हातकणंगले १८८, भुदरगड १५४ आणि शिरोळ १२९ ठराव दाखल झाले आहेत. गडहिंग्लज ११२, आजऱ्यात ८६, शाहूवाडीत ६८, पन्हाळ्यात ६४ आणि कोल्हापूर शहरात ६४ ठराव प्राप्त झाले आहेत. तर गगनबावडा तालुक्यात सर्वात कमी २६ ठराव दाखल झाले आहेत.

**अंतिम दोन दिवसांकडे लक्ष**

आतापर्यंत दाखल झालेल्या ठरावांपेक्षा अद्याप मोठ्या संख्येने ठराव दाखल होणे बाकी आहे. त्यामुळे अंतिम दोन दिवसांत कोणत्या तालुक्यातून किती ठराव दाखल होतात.कोणत्या गटाला त्याचा फायदा होतो आणि त्यातून जिल्हा बँकेच्या निवडणुकीतील मतदारसंघनिहाय समीकरणे कशी बदलतात, याकडे सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

# शिंदे समितीने शोधलेल्या नोंदी प्रसिध्द केल्या जाणार

(पान १ वरून )

बैठक घेऊन झालेल्या निर्णयांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. या बैठकीमध्ये मंत्री विखे-पाटील यांनी जिल्हानिहाय देण्यात आलेली जात पडताळणी प्रमाणपत्रांची संख्या, कुणबी नोंदी तसेच प्राप्त झालेल्या अर्जांचा सविस्तर आढावा घेतला. प्रत्येक जिल्हाधिकाऱ्याने आजपर्यंत केलेल्या कार्यवाहीची तसेच अंमलबजावणीची सविस्तर माहिती बैठकीमध्ये सादर केली. यामध्ये प्रामुख्याने परभणी जिल्हाधिकारी कार्यालयाने सापडलेल्या नोंदी वेबसाईटच्या माध्यमातून जाहीर केल्या आहेत. त्याच पद्धतीने इतर जिल्ह्यांनीही अशाच प्रकारची कार्यवाही करावी आणि १० ते १७ सप्टेंबर दरम्यान प्रमाणपत्रांच्या पूर्ततेसाठी शिबिरे आयोजित करून अधिक चांगल्या पद्धतीचे नियोजन करावे, अशा सूचना मंत्री विखे पाटील यांनी बैठकीमध्ये दिल्या.

बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना मंत्री विखे पाटील यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, 'कायद्यापेक्षा कोणीही मोठे नाही. वंशावळ आणि कायदेशीर नियमांचे पालन करूनच प्रमाणपत्रे दिली जातील.' मराठवाड्यात आतापर्यंत साडेतीन लाख कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप झाल्याचे सांगत, पात्र लाभार्थ्यांना प्रमाणपत्रे देताना नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मराठा आंदोलक नेते मनोज जरांगे पाटील समाजासाठी आंदोलन करीत असून, त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांबाबत सरकार त्यांच्याशी चर्चा करणारच आहे.

काही लोकांना त्या पायघड्या वाटत असतील, पण हे सर्व आरोप बिनबुडाचे आहेत. कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाच्या आरक्षणासाठी सरकार पुढाकार घेत आहे; परंतु काही लोक मराठा आरक्षणाला विरोध करण्यासाठी मुद्दाम आंदोलनाची भाषा करीत असतील तर ते चुकीचे असून, याद्वारे विनाकारण सामाजिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे. सरकारने काहीही चुकीचे केलेले नाही व तशी भूमिकाही नाही. मराठा आरक्षणाचा प्रश्न कायदेशीर चौकटीत आणि सर्व समाजांच्या हिताचा विचार करून सोडविण्याची सरकारची भूमिका असून, पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे प्रमाणपत्र मिळावे यासाठी प्रशासनाला आवश्यक सूचना देण्यात आल्याचे विखे-पाटील यांनी यावेळी सांगितले.

## पलूसमधील दाम्पत्याच्या आत्महत्येचा तपास सुरू

■ पलूस,ता.७

**पलूसधील संजय पाटील आणि त्यांची पत्नी मनिषा पाटील या दाम्पत्याने कर्जाला कंटाळून आत्महत्या केली. या घटनेची नोंद पलूस पोलिसात झाली आहे. दरम्यान, आत्महत्त्येचे नेमके कारण शोधण्यासाठी पोलिसांनी तपास सुरू केला आहे.**

संजय पाटील यांच्यावर सहकारी बँका, पतसंस्था, विकास सोसायटीसह फायनान्स कंपन्या आणि खाजगी लोकांचेही कर्ज होते. यातील अनेकांनी कर्ज वसुलीसाठी त्यांच्याकडे तगादा लावला होता. ते येथील पलूस महाविद्यालयासमोर असलेल्या शॉपींग कॉम्पलेक्समध्ये महाराष्ट्र शासनाच्या योजनेतून शिवभोजन थाळीचे केंद्र चालवत होते. शासनाकडून या केंद्रासाठी मिळणारे अनुदान वेळेत मिळत नसल्याने आणि ते देतानाही अनेक अडचणीना सामोरे जावे लागत असल्याने ते आर्थिकदृष्ट्या अडचणीत आले होते. त्यामुळे पाच सहा महिन्यांपासून हे केंद्र चालवणे बंद केले होते. त्यानंतर त्यानंतर पाटील यांनी जुन्या मध्यवर्ती बसस्थानकाच्या चौकात हॉटेल आणि बेकरीचा व्यवसाय चालू केला होता. पण कर्जदारांचा वसुलीसाठीचा तगादा सहन न झाल्याने या दोघांनी बुधवार दि. २ सप्टेंबर रोजी दुपारी आपल्या राहत्या घरीच विषारी किटकनाशक द्रव्य प्राशन केले होते. ते अत्यवस्थ झाल्याने त्यांना पलूसमधील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर सांगलीच्या सरकारी दवाखान्यात दाखल केले होते. तेथुन त्यांना शुक्रवारी डिस्चार्जही मिळाला होता. मात्र घरी आल्यानंतर घरातील टीव्ही, फ्रीज सारख्या महागड्या वस्तु एका फायनान्स कंपनीने वसुलीपोटी जप्त केल्याचे कळल्यावर त्यांना पुन्हा अस्वस्थ वाटु लागले होते. त्यामुळे मनिषा पाटील यांना पलूसच्या ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र त्यांची तब्येत जास्त बिघडली. दुसऱ्या दवाखान्यात नेत असतानाच मनिषा यांची प्राणज्योत मालवली. पत्नीचा मृत्यू संजय पाटील यांना जिव्हारी लागला. त्यामुळे त्यांनाही अस्वस्थ वाटु लागले आणि त्यातच त्यांचाही मृत्यू झाला. दरम्यान, या घटनेची नोंद पोलिसात झाली असून याप्रकरणी तपास सुरू आहे.



## गजानन सहकारी गृहनिर्माण संस्थेची वार्षिक सभा खेळीमेळीत

■ तारदाळ,ता.७ (वार्ताहर)-

**गजानन सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, जी.के. तारदाळची ३९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा जी.के. नगर येथील संस्थेच्या सांस्कृतिक भवनात खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सभेत विषय पत्रिकेवरील सर्व विषयांवर सविस्तर चर्चा करून त्यांना सभासदांनी एकमताने मंजुरी दिली.**

संस्थेने अहवाल वर्षात केलेल्या विविध कामांचा आढावा तसेच आगामी काळात हाती घेण्यात येणाऱ्या कामांची माहिती संस्थेचे चेअरमन तथा सभाध्यक्ष सुनील गजानन कांबळे यांनी दिली.संस्थेचे उपाध्यक्ष रणजीत माने यांनी संस्थेच्या राखीव जागेतील हॉस्पिटलसाठी राखून ठेवलेली जागा सार्वजनिक आरोग्य उपकेंद्र उभारणीसाठी ग्रामपंचायत तारदाळकडे हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव मांडला. या प्रस्तावास सभासदांनी एकमताने मंजुरी दिली.

सभेपुढील विषयपत्रिकेचे वाचन सचिव विनायक माळी यांनी केले. त्यानंतर सर्व विषयांना सभासदांनी एकमताने मंजुरी दिली. यावेळी संचालक राजेश शिंदे, अकबर खलिफा, प्रभाकर जाधव, अण्णासो कोडणीकर, महादेव मगदूम, शिरीष कांबळे, कुमार नेजे, सुरेश पाठुकले, सुरेश रणदिवे, हरिश्चंद्र गायकवाड, शशिकांत घाटगे, भूपाल बरगाले, संचालिका सुनीता साखळकर यांच्यासह संस्थेचे सभासद उपस्थित होते

## कोल्हापुरचे दोघे ताब्यात

(पान १ वरून )

करण्यासाठी येणार आहेत. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक सुशांत चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक जालिंदर जाधव यांच्या पथकाने आजरा पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक बाबासाहेब सरवदे यांच्यासह आंबोली-आजरा मार्गावर सापळा रचला. यावेळी संशयित अन्वर अस्लम शेख (वय ३४, रा. कोल्हापूर) आणि किरण दडाप्पा माने (वय ३३, रा.शिवाजी पार्क, कोल्हापूर) यांना ताब्यात घेण्यात आले.

त्यांची झडती घेतली असता त्यांच्या ताब्यात १६ ग्रॅम मेफेड्रोन (एमडी) अंमली पदार्थ, दोन मोबाईल हँडसेट आणि सुझुकी ॲक्सेस मोपेड आढळून आली. पोलिसांनी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून हा सर्व मुद्देमाल जप्त केला. जप्त केलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत १ लाख ५८ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# गडहिंग्लज नगराध्यक्षांची याचिका फेटाळली

(पान १ वरून )

त्यानंतर समितीने संबंधित कागदपत्रांची पडताळणी केली. त्या नोंदींमध्ये बेडा जंगम असा उल्लेख करण्यात आल्याचे समितीच्या निदर्शनास आले. बेडा जंगम ही नोंद वेगळ्या हस्ताक्षरात आणि वेगळ्या शाईने करण्यात आल्याचे समितीने नमूद केले. त्यामुळे या नोंदींमध्ये फेरफार अथवा नंतरची भर घालण्यात आली असावी, असा निष्कर्ष समितीने नोंदवला. तुर्बतमठ यांचे काका विश्वनाथ शंकरय्या तुर्बतमठ यांच्या नावाची मूळ नोंद असलेले जनरल स्कूल रजिस्टरमधील संबंधित पानच गायब असल्याचे समितीच्या तपासणीत समोर आले. त्यानंतर रजिस्टरच्या शेवटी उप असलेल्या रिकाम्या जागेत त्यांचे नाव पुन्हा नोंदवण्यात आले आणि त्या ठिकाणी त्यांची जात बेडा जंगम अशी नमूद करण्यात आल्याचे निदर्शनास आले.

जात पडताळणी समितीने १९३२ च्या इंडियन फ्रेंचायझ कमिटीच्या अहवालातील डिप्रेसड क्लासेस या संकल्पनेचा आधार घेतला. त्या काळात अस्पृश्यते सारख्या सामाजिक बंधनांना सामोरे जाणाऱ्या समाजघटकांचा डिप्रेसड क्लासेस मध्ये समावेश केला जात असे. पुढे याच समाजघटकांना अनुसूचित जाती म्हणून ओळख मिळाली. या पार्श्वभूमीवर समितीने तुर्बतमठ यांच्या पूर्वजांच्या सामाजिक व ऐतिहासिक पार्श्वभूमीचाही विचार केला. १८९२ मध्ये महेश तुर्बतमठ यांच्या पणजोबांची गडहिंग्लज येथील श्री कळ्ळेश्वर, श्री बसवेश्वर आणि श्री ब्रह्मदेव या तीन मंदिरांमध्ये पूजा-अर्चा करण्यासाठी पुजारी म्हणून कोल्हापूरचे राजे यांनी नियुक्ती केली होती. या सेवेसाठी त्यांना इनाम जमिनीही देण्यात आल्याचे नोंदींवरून स्पष्ट झाल्याचे समितीने नमूद केले. मंदिरांमध्ये पूजा-अर्चा करण्यासाठी राजसतेकडून नियुक्ती झालेल्या त्यांच्या पूर्वजांना त्या काळातील डिप्रेसड क्लासेस अथवा अनुसूचित जातीतील व्यक्ती मानता येणार नाही, असा निष्कर्ष जात पडताळणी समितीने नोंदवला. तक्रारदार विनोद बिलावर यांच्या वतीने ॲड. एस. बी. तळेकर यांच्यासह अभिजित अडगुळे, सौरभ वीर, विशाखा पाटील यांनी बाजू मांडली.

## चंदगडचे पोलिस निरिक्षक चौखंडेंची तडकाफडकी बदली

चंदगड,ता.७(प्रतिनिधी)

**चंदगड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निंगाप्पा चौखंडे यांची तडकाफडकी बदली झाली. त्यांच्या जागी पन्हाळा येथून नामदेव शिंदे हजर झाले आहेत.**

चौखंडे गेल्या चार महिन्यापुर्वी हजर झाले होते. गेल्या कांही महिन्यात चंदगड तालुक्यात अवैध धंद्याचे प्रमाण जोरात वाढले होते. त्यामध्ये हाजगोळी येथे एमडी ड्रग्जचा कारखाना पुणे येथील विशेष पथकाने शोधून काढला. मात्र चंदगड पोलीस ठाण्यात याची माहिती देखील नव्हती. तालुक्यातील अनेक गावांमधे गोवा बनावटीच्या मद्याची विक्री राजरोसपणे चालू होती. अनेक ठिकाणी मटका व जुगार चालविला जात होता. गेल्या आठवड्यात जंगमहटी येथील युवकाचा प्रेमप्रकरणामधून खून झाला होता. अशी अनेक कारणे बदलीच्या मागे असल्याची जोरदार चर्चा सुरु आहे. चंदगड तालुक्याला कर्तव्यदक्ष व कडक शिस्तीचा अधिकारी मिळणे आवश्यक होता. ही उणीव नामदेव शिंदे भरून काढणार काय? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## प्रांताधिकारी चौगलेंची नियुक्ती

(पान १ वरून )

महसूल विभागातील अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत चाचपणी सुरू होती. अखेर करवीरच्या उपविभागीय अधिकारी मौसमी चौगले यांच्या नियुक्तीवर शिक्कामोर्तब झाले.

दरम्यान, 'गोकुळ'सह कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीची प्रक्रियाही सुरू झाली आहे. जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी ठराव मागविण्याची प्रक्रिया सुरू असून, आगामी काळात दोन्ही महत्त्वाच्या सहकारी संस्थांच्या निवडणुकांमुळे जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील राजकीय घडामोडींना वेग येण्याची शक्यता आहे.

# महानगरपालिकेच्या पीएम ई-बसची यशस्वी चाचणी

## ११ सप्टेंबरपासून सेवा सुरू होणार; शहरवासीयांमध्ये उत्सुकता

इचलकरंजी,ता.७ –

**इचलकरंजी शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम, पर्यावरणपूरक आणि आधुनिक करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकत इचलकरंजी महानगरपालिकेच्या वतीने सोमवारी पीएम ई–बसची यशस्वी चाचणी घेण्यात आली. शुक्रवार, ता. ११ सप्टेंबरपासून शहरात पीएम ई–बस सेवा सुरू होणार असून, त्या पार्श्वभूमीवर शहरातील विविध मार्गांवर ई–बसची चाचणी घेण्यात आली.**

महानगरपालिका आयुक्त पल्लवी पाटील तसेच अतिरिक्त आयुक्त सुषमा शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही चाचणी पार पडली. प्रत्यक्ष बससेवा सुरू करण्यापूर्वी शहरातील विविध मार्गांवरील वाहतुकीची परिस्थिती, रस्त्यांची स्थिती, वळणे, थांबे तसेच बसच्या सुरळीत वाहतुकीच्या दृष्टीने आवश्यक बाबींची यावेळी पाहणी करण्यात आली.

शहरातील प्रमुख मार्गांवरून पीएम ई–बस धावताना पाहून नागरिकांमध्ये विशेष उत्सुकता निर्माण झाली होती. अनेक नागरिकांनी रस्त्याच्या दुतर्फा तसेच विविध चौकांमध्ये थांबून ई–बस पाहिली. शहरात लवकरच आधुनिक आणि पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतूक सेवा उपलब्ध होणार असल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण दिसून आले.



इलेक्ट्रिक बसमुळे पारंपरिक इंधनावरील अवलंबित्व कमी होण्यास मदत होणार असून वायू तसेच ध्वनी प्रदूषण कमी करण्याच्या दृष्टीनेही ही सेवा महत्त्वपूर्ण ठरणार आहे. त्याचबरोबर शहरातील नागरिकांना सुरक्षित, आरामदायी आणि विश्वासार्ह सार्वजनिक वाहतुकीचा पर्याय उपलब्ध होणार आहे.

आज घेण्यात आलेली चाचणी यशस्वीरीत्या पूर्ण झाल्याने नियोजित बससेवेच्या शुभारंभाच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला आहे. आता ११ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या पीएम ई–बस सेवेची शहरवासीयांना उत्सुकता लागली आहे.

यावेळी मुख्य लेखा परिक्षक आरती खोत, सहा.आयुक्त रोशनी गोडे, सामाजिक कार्यकर्ते प्रमोद बचाटे, विद्युत अभियंता इसरार बेग, उद्यान पर्यवेक्षक प्रशांत आरगे, विधी अधिकारी भावना देवडा, शुभांगी जोशी आदी उपस्थित होते.

## लोकशाही दिनामध्ये केवळ १ अर्ज दाखल

इचलकरंजी,ता.७–

**सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णयानुसार आयुक्त इचलकरंजी महानगरपालिकेच्या वतीने महानगरपालिका स्तरीय लोकशाही दिनाचे प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजन करण्यात येत आहे.**

उपायुक्त तथा नियंत्रण अधिकारी अशोक कुंभार यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवार, ता. ७ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी १या वेळेत महानगरपालिका स्तरीय लोकशाही दिन आयोजित करण्यात आलेला होता. आजच्या लोकशाही दिनामध्ये मार्केट विभाग १ अर्ज दाखल झालेला आहे.

यावेळी सहाय्यक आयुक्त नितिन बनगे, सहाय्यक कर संकलन अधिकारी दिपक खोत, भांडार अधिक्षक गणेश शिंदे, सहाय्यक नगर रचनाकार हरिश्चंद्र पाटील, विधी अधिकारी भावना देवडा, शुभांगी जोशी, मकरंद लोहार आदींसह विभाग प्रमुख उपस्थित होते.

## आम.राहूल आवाडे यांची बदनामी

# महाविकास आघाडीच्या २३ जणांना नोटीस

इचलकरंजी,ता.७–

**इचलकरंजी शहर महाविकास आघाडीच्यावतीने करण्यात आलेल्या लाक्षणिक उपोषणादरम्यान चुकीच्या माहितीच्या आधारे आणि अर्वाच्च भाषेत आमदार राहुल आवाडे यांची नाहक बदनामी करण्यात आली. या प्रकरणी आमदार राहुल आवाडे यांच्यावतीने संबंधितांना कायदेशीर नोटीस बजावण्यात आली आहे.**

१ सप्टेंबर २०२६ रोजी इचलकरंजी महानगरपालिका प्रवेशद्वारात इचलकरंजी शहर महाविकास आघाडी व मित्रपक्षांच्या वतीने एकदिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात आले होते. त्यामध्ये मदन कारंडे, उदयसिंग पाटील, संजय तेलनाडे, सुनील तेलनाडे, सचिन राणे, रणजीत जाधव, अमरजीत जाधव, संजय कांबळे, स्मिता तेलनाडे, यास्मिन तासगांवे, संगीता आलासे, पद्मा सावरतकर, सयाजी चव्हाण, शशांक बावचकर, सागर चाळके, प्रकाश मोरबाळे, सदा मलाबादे, नितीन कोकणे, संभाजी सूर्यवंशी, शशिकांत देसाई, रवी गोंदकर, प्रताप पाटील, शिवाजी साळुंखे आदी उपस्थित होते.

लाक्षणिक उपोषणावेळी आमदार राहुल आवाडे यांच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. आमदार राहुल आवाडे यांची जनमाणसांमध्ये बदनामी करण्याच्या हेतुनेच चुकीच्या माहितीच्या आधारे आणि अर्वाच्च भाषेत घोषणाबाजी केली गेली. लोकशाहीत आंदोलन करणे हे चुकीचे नसून चुकीच्या व अपुऱ्या माहितीच्या आधारे एखाद्याची व्यक्तीगत नाहक बदनामी करणे चुकीचे आहे. याची दखल घेऊन आमदार आवाडे यांनी उपरोक्त सर्वांना कायदेशीर नोटीस बजावली असून संबंधितांवर अब्रुनुकसानीचा दिवाणी व फौजदारी खटला दाखल करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.



वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलताना सेक्रेटरी संदेश लोखंडे व्यासपीठावर चेअरमन तरूण दत्तवाडेसह इतर पदाधिकारी.

## दि अर्बन क्रेडीट सोसायटीची वार्षिक सभा खेळीमेळीत

इचलकरंजी,ता.७–

**येथील दि अर्बन को–ऑप क्रेडीट सोसायटीची १०६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन तरूण दत्तवाडे यांच्या अध्यक्षतेखाली गावभाग परिसरातील महादेव मंदिरमध्ये खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.**

सभेच्या प्रारंभी उपस्थितांचे स्वागत व प्रास्ताविक विजय गुरव यांनी केले.तर अहवाल वाचन संस्थेचे सेक्रेटरी संदेश लोखंडे यांनी केले.संस्थेचे व्हाईस चेअरमन शाम पोतदार यांनी सभासदांनी पतसंस्थेवर ठेवलेल्या विश्वासाबद्दल समाधान व्यक्त केले.त्यानंतर संस्थेचे सभासद व पिग्मी एजंट प्रदिप मोळके यांनी, आपल्या मनोगतामध्ये संस्था मोठी होण्यासाठी संस्थेच्या कर्मचाऱ्यांची धडपड,वेळेवर वसुली,पिग्मी एजंट यांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे नमुद केले.चेअरमन तरूण दत्तवाडे यांनी आपल्या मनोगतामध्ये संचालक नाममात्र सेवकरी असून सभासदच खरे मालक असतात.सभासदांनी वेळोवेळी कर्ज भरून संस्थेच्या वाढीला हातभार लावला आहे.असे नमुद करून ठेवी वाढवण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन केले.तसेच चालू वर्षी ९ टक्के डेव्हिडंड देणार असल्याचे यावेळी जाहीर केले.विजय गुरव यांनी संस्थेमध्ये सुरू असलेल्या लाईट बील भरणा केंद्राचा सर्व सभासदांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले.यावेळी संचालक श्रीधर वठारे यांनी आभार मानले.यावेळी सभेला संचालक भाऊसाहेब पाटील,शामराव कांबळे,श्रीमती अर्पणा कुलकर्णी, सुनंदा केस्ती, महावीर बेडक्याळे यांच्यासह संस्थेचे कर्मचारी, पिग्मी एजंट सभासद वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## जलजीवनचे रखडलेले काम सुरू करण्याचा ठराव मंजूर



### शिरढोण ग्रामसभेत निर्णय

शिरढोण,ता.७ (प्रतिनिधी)–

**शिरढोण(ता. शिरोळ) येथील ग्रामसभेत जलजीवन योजनेच्या रखडलेल्या कामावरून चर्चा चांगलीच गाजली. योजनेच्या कामासाठी 'टक्केवारी'ची मागणी झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केल्याने सभेत काही काळ वातावरण तापले.विकासकामांना जाणीवपूर्वक अडथळा करणाऱ्यावर कारवाई करावी आणि रखडलेली जलजीवन योजना तातडीने मार्गी लावण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. सभेच्या अध्यक्षस्थानी प्रशासक तथा विस्तार अधिकारी दीपक कामत होते.**

भाजपा ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष पोपट पुजारी यांनी यावेळी काहीजण केवळ टक्केवारीच्या कारणावरून योजनेच्या कामात अडथळे आणत असल्याचा आरोप केला.

जलजीवन योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे आणि बेकायदेशीर असल्याच्या तक्रारींमुळे साडेतीन वर्षांपासून रखडले आहे. त्यामुळे आतापर्यंत झालेल्या कामाचे जिल्हा परिषद तसेच वॉलचंद महाविद्यालयाच्या समितीमार्फत तांत्रिक ऑडिट करावे.उर्वरित काम तातडीने सुरू करावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली. गावातील गणेश मंडळांनी मिरवणूक मार्गावर स्वखर्चातून सीसीटीव्ही कॅमेरे बसविल्याबद्दल अभिनंदनाचा ठराव करण्यात आला. सभेत गावातील रस्ते, सांडपाणी प्रकल्प, पशुवैद्यकीय दवाखान्याच्या इमारतीसाठी जागा या विषयांवर चर्चा झाली. मंजूर घरकुलांसह विविध प्रस्तावांना सभेने मंजुरी दिली.काही काळ सभेत शाब्दिक खडाजंगी झाली. मात्र, ग्रामसेवकांनी स्पष्टीकरण दिल्यानंतर वातावरण निवळले.यावेळी विश्वास बालीघाटे, सुरेश सासणे, शाहीर बाणदार, अजिंक्य चौगुले, पोलिस पाटील अनुराधा जाधव, प्रमोद कांबळे, विजय सूर्यवंशी, पप्पू कुगे, अरिहंत कापसे, बाबासाहेब हेरवाडे, जब्बार नालबंद, अरविंद सासणे, महादेव पानदारे उपस्थित होते.

# अडीच कोटीच्या फसवणूकीप्रकरणी आणखी एकास अटक

इचलकरंजी,ता.७–

**शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीत मोठा परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवून ४९ गुंतवणूकदारांची तब्बल २ कोटी २५ लाख ५७ हजार ९७२ रुपयांची फसवणूक केल्याच्या प्रकरणाचा तपास पुढे जात असताना या प्रकरणाची व्याप्ती वाढली आहे. गुंतवणूकदारांकडून घेतलेली रक्कम विविध माध्यमांतून गुंतवल्याचे तपासात समोर आले असून, हेंटेक मार्केट कंपनीचा एजंट जॉन महेश पेरीयामी (वय ३९, रा. अंबरनाथ, ठाणे) याला पोलिसांनी अटक केली आहे. त्यामुळे अटक केलेल्या संशयितांची संख्या तीन झाली आहे.**



या प्रकरणातील मुख्य संशयित मोहसिन मणेर याने गुंतवणूकदारांकडून जमा केलेली कोटयवधी रुपयांची रक्कम जॉन पेरीयामी याच्याकडे तसेच दुबईतील सीपी एफेक्स कंपनीशी संबंधित ॲडवर्ड लुईस याच्याकडे वेबसाईटच्या माध्यमातून गुंतवल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. दुबईतील संबंधित व्यक्तीचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून सायबर यंत्रणेसह अन्य मार्गांनी तपास सुरू आहे.मोहसिन मणेर आणि त्याचा कर्मचारी मुदस्सर मकानदार यांना यापूर्वीच अटक करण्यात आली आहे. जॉन पेरीयामी याच्या अटकेनंतर तिघांनाही सोमवारी न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने मणेर आणि पेरीयामी यांना ९ सप्टेंबरपर्यंत, तर मकानदार याला ११ सप्टेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली.दरम्यान, न्यायालयीन सुनावणीवेळी संशयित मोहसिन मणेर याने स्वतःहून पोलिस कोठडी वाढवून देण्याची मागणी केली. दुबईतील व्यक्तीकडे आपण गुंतवणूक केल्याचे सांगत त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांना सहकार्य करण्याची तयारी असल्याचे त्याने न्यायालयात नमूद केल्याची माहिती आहे.

# लोक अदालतीच्या धर्तीवर महसुल लोक अदालत

## १० ऑक्टोबरला आयोजन

इचलकरंजी,ता.७–

**लोक अदालतीच्या धर्तीवर महसुल विभागातील प्रलंबित महसुली दावे तडजोडीने निकाली काढण्यासाठी महात्मा जोतिराव फुले महसुल लोक अदालत अभियान राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्या अनुषंगाने हातकणंगले व शिरोळ तालुक्यातील उपविभागीय अधिकारी कार्यालय इचलकरंजी यांचेकडे दाखल अर्धन्यायिक प्रकरणांच्या अनुषंगाने महात्मा जोतिराव फुले महसुल लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.**

पहिली महसुल लोक अदालत १० ऑक्टोबर रोजी होणार असून त्यासाठी ७ सप्टेंबर ते १६ सप्टेंबर या कालावधीत अर्ज स्विकारले जाणार आहेत. तर ५ डिसेंबर रोजी होणाऱ्या महसुल लोक अदालतीसाठी ६ नोव्हेंबर ते १६ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत अर्ज स्विकारले जातील. तर ६ मार्च २०२७ रोजी होणाऱ्या महसुल लोक अदालतीसाठी ८ फेब्रुवारी ते १६फेब्रुवारी २०२७ या कालावधीत अर्ज स्विकारले जाणार आहेत. ही लोक अदालत प्रांत कार्यालय इचलकरंजी याठिकाणी होणार आहे.

या महसुल लोक अदालतीमध्ये सहभागी होण्यासाठी तडजोडानामा अर्ज नमुना अ या विहित नमुन्यात अर्ज करुन तो विहित कालावधीत उपविभागीय अधिकारी कार्यालय इचलकरंजी येथे सादर करणेचा आहे. प्रस्तुत कालावधीत प्राप्त अर्ज लोक अदालतीमध्ये ठेवण्यात येतील, अशी माहिती उपविभागीय अधिकारी दीपक शिंदे यांनी दिली आहे.

# थकबाकी पोटी ६० गाळे सील

## ■ ३५ लाखांची वसुली ■

कोल्हापूर, ता.७ (प्रतिनिधी)–

**कोल्हापूर महानगरपालिकेच्या इस्टेट विभाग व उपद्रव शोध पथकाने शाहू क्लॉथ मार्केटमध्ये धडक कारवाई करत महापालिकेचे भाडे थकीत असलेले तब्बल ६० गाळे सील केले. या कारवाई दरम्यान काही गाळेधारकांनी जागेवरच थकीत रकमेचा भरणा केल्याने महापालिकेच्या तिजोरीत ३५ लाख रुपयांची वसुली झाली. आयुक्त डॉ. राजेंद्र भारुड यांच्या सूचनेनुसार सोमवारी ही कारवाई करण्यात आली.**

महापालिकेच्या शहरातील विविध गाळ्यांच्या भाड्याची थकबाकी मोठ्या प्रमाणात प्रलंबित आहे. सन २०१९ ते २०२६ या कालावधीतील थकबाकी भरण्यासाठी प्रशासनाकडून वेळोवेळी गाळेधारकांना सवलत योजना राबविण्यात आल्या होत्या. तसेच गाळेधारकांना थकीत भाडे भरण्याबाबत वारंवार सूचना देण्यात आल्या. मात्र, त्यानंतरही काही गाळेधारकांकडून थकबाकी भरण्याकडे दुर्लक्ष करण्यात येत होते. शाहू क्लॉथ मार्केटमध्ये महापालिकेच्या मालकीचे एकूण १०३ गाळे आहेत. या मार्केटमधील एकूण थकबाकी सुमारे ८ कोटी रुपये आहे. कारवाईपूर्वी संबंधित गाळेधारकांना थकीत भाडे भरण्याबाबत कार्यालयामार्फत नोटिसा व सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र, थकबाकी न भरल्याने अखेर ६० गाळ्यांवर सीलची कारवाई करण्यात आली.

महापालिकेच्या गाळ्यांमध्ये भाडेतत्त्वावर व्यवसाय करणाऱ्या सर्व गाळेधारकांनी आपली थकबाकी तात्काळ भरावी अन्यथा थकबाकीदार गाड्यांवरही सील बंदची कारवाई करण्यात येईल असा इशारा इस्टेट विभागाच्यावतीने देण्यात आला आहे.


**IDEAL INSTITUTE OF MANAGEMENT, KONDIGRE**

(Approved By AICTE. DTE. Affiliated to Shivaji University, Kolhapur)

**MBA Admission at Institute Level seats (Against CAP) - A.Y.-2026-27**

Applications are invited from students to fill Institutional level vacant seats.

| | |
|---|---|
| Application forms available from | Date: 08-09-2026 to 09-09-2026 |
| Application Submission at Institute | Date: 08-09-2026 to 09-09-2026 |
| Display of Merit List | Date: 10-09-2026 at 11:00 am |
| Confirmation of Admission | Date: 10-09-2026 to 11-09-2025 at 04:00 pm |

**Address :-** 377/A, Ichalkaranji- Sangli Road, Nr. Dharmanagar, A/p-Kondigre, Tal – Shirol, Dist Kolhapur. **Website :** www.iimkondigre.edu.in
**Contact :-** 9970956452, 9309846617, 9637222944, 9423041063

**Secretary**



नोंदणी क्र.के.पी.आर/एच.एल.ई./आर.एस.आर./(सीआर)/१८२२/९४-९५/९४

**स्नेहदिप नागरी सह. पतसंस्था मर्या., इचलकरंजी.**

वॉर्ड नं. १३, घर नं. ५१, कर्नावट मिलसमोर, लंगोटे मळा, इचलकरंजी – ४१६ ११५. ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.
फोन : (०२३०) २४३०३२६.

**✲ नोटीस ✲**

स्नेहदिप नागरी सहकारी पतसंस्था मर्या., इचलकरंजी या संस्थेची संस्था सुरूवातीपासून १४/९/१९९४ ते ३१/०३/२०१६ अखेर या कालावधीतील ज्या फाईल आणि रेकॉर्डची काळभायत्ता संपली आहे असे जुने दप्तर नियमानुसार नष्ट करणेसाठी संचालक मंडळाने ठराव करून त्याची मंजुरी वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये घेतलेल्या मंजुरीप्रमाणे दप्तर नष्ट करणेसाठी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून सात (७) दिवसाच्या आत लेखी स्वरूपात कार्यालयाशी संपर्क साधावा. मुदतीत कोणताही आक्षेप प्राप्त न झाल्यास कार्यालयाकडून ठरवून दिलेल्या नियमानुसार संबंधित दप्तर नष्ट करण्याची कार्यवाही पूर्ण केली जाईल. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

सेक्रेटरी
**स्नेहदिप नागरी सह. पतसंस्था मर्या., इचलकरंजी.**



मन:पूर्वक शुभेच्छा

जयसिंगपूरचे नगराध्यक्ष,
मा. श्री.
**संजयजी पाटील**
(यड्रावकर)
चेअरमन,
व्यवस्थापकीय मंडळ,
यड्राव बँक



यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!

YADRAV BANK
**यड्राव बँक**
**यड्राव को-ऑप. बँक लि; यड्राव.**

श्रीशैल नायकुडे — मुख्य कार्यकारी अधिकारी
दिलीप लक्ष्मण मगदूम — व्हा. चेअरमन
अजय राजेंद्र पाटील (यड्रावकर) — चेअरमन

सर्व संचालक मंडळ, सभासद व कर्मचारी वर्ग

प्रशासकीय कार्यालय : ५७६ बी, स्टेशन रोड, जयसिंगपूर - ४१६ १०१.
☎ (०२३२२) २५२३०७, २२५५०१, २२७७५१. मो. ७२७६४७९८८९
शाखा विस्तार :- यड्राव ☎ ०२३२२ - २५२३०७, नरंदे ☎ ०२३० - २५८३२३५, जयसिंगपूर ☎ ०२३२२ - २२७७५०, दत्तवाड ☎ ०२३२२ - २४१५००, कुरुंदवाड ☎ ०२३२२ - २४३५००, नांद्रे ☎ ७२७६२२९८८९ सांगली ☎ ८५३०४७९८८९
E-mail : headoffice@yadrav.bank.in Web : www.yadrav.bank.in ✆ 7276209889

महासत्ता

सुविचार :- मुले ही बागेतील कळ्यांसारखी असतात, त्यांना काळजीपूर्वक आणि प्रेमाने वाढवले पाहिजे, कारण ती भविष्यातील राष्ट्राचे निर्माते आहेत. - पं.जवाहरलाल नेहरू

मंगळवार,ता.८ सप्टेंबर २०२६

■ संपादकीय ■

# बदललेला नकाशा

संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेच्या बैठकीत गेल्या आठवड्यामध्ये जगाचा नकाशा बदलण्याच्या विषयावर एकमत झाले. याबाबतचा ठरावही बहुमताने संमत करण्यात आला. ४०० पेक्षा जास्त वर्षांपासून वापरण्यात येणारा जगाचा नकाशा वास्तव नाही आणि दिशाभूल करणारा आहे, अशी चर्चा सुरू झाल्यानंतर आता अखेर संयुक्त राष्ट्राने आपल्या आमसभेमध्ये जगाच्या नकाशाला वास्तव आणि परिपूर्ण स्वरूप देण्याचा निर्णय घेतला, हे बरे झाले. ज्या कालावधीमध्ये म्हणजे सुमारे चारशे वर्षांपूर्वी मार्केस्टर नावाच्या एका नौदल तज्ज्ञाने आणि नकाशा तज्ज्ञाने जलवाहतूक करणाऱ्यांसाठी मार्गदर्शक म्हणून जो नकाशा केला होता त्यामध्ये अनेक अवास्तव गोष्टींची मांडणी करण्यात आली होती. म्हणजेच प्रत्यक्ष पृथ्वीवर असणारे जे विविध भूखंड किंवा खंड आहेत त्यांचा आकार आणि नकाशावर दाखवण्यात आलेला त्यांचा आकार यामध्ये कोठेही साम्य नव्हते किंवा प्रमाणबद्धता नव्हती. ही गोष्ट आफ्रिका खंडातील टोगो नावाच्या एका छोट्या देशाच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी काही वर्षांपूर्वी 'नकाशा बदला' अशी चळवळ सुरू केली. त्याला आफ्रिकेतील अनेक राष्ट्रांनी पाठिंबा दिल्यानंतर अखेर नवा नकाशा आता अस्तित्वात येणार आहे. मार्केस्टर नावाच्या तज्ज्ञाने तयार केलेल्या नकाशाची जागा आता 'इक्वल अर्थ' या तत्त्वावर आधारित जास्त वास्तव नकाशा घेणार आहे. आधुनिक काळात अत्याधुनिक सामग्री, उपग्रहांचा वापर आणि तंत्रज्ञान उपलब्ध असल्यामुळे जगात पृथ्वीवर असलेले विविध खंड, त्यामध्ये असलेले देश, त्यांच्या सीमारेषा आणि या खंडांचे आकार व देशांचे आकार याबाबत अचूक माहिती आता उपलब्ध होऊ शकते. साहजिकच त्या माहितीच्या आधारेच योग्य नकाशा जगासमोर ठेवणे अत्यंत महत्त्वाचे होतेच. ४०० वर्षांपूर्वी जेव्हा जो नकाशा तयार करण्यात आला तेव्हा उपलब्ध माहितीनुसार ग्रीनलँड या छोट्या देशाला आफ्रिकेपेक्षा मोठा दाखवण्यात आले होते. प्रत्यक्षात ग्रीनलँड हा खूप छोटा देश आहे आणि आफ्रिका खंड खूप मोठे म्हणजे १४ पट आहे. साहजिकच नव्या नकाशामध्ये ही दुरुस्ती करण्यात आली आहे. आफ्रिका खंडाचा आकारही वाढला आहे आणि अमेरिका व युरोप खंडांचे आकार कमी झाले आहेत. ही गोष्ट अन्यायकारक किंवा टीका करण्यासारखी नाही. कारण आतापर्यंत जी माहिती चुकीच्या पद्धतीने सादर केली जात होती, ती आता योग्य पद्धतीने वास्तव माहितीच्या आधारे सादर केली जात आहे हा त्याचा अर्थ. आधुनिक काळात शाळांमध्ये, महाविद्यालयांमध्ये, भूगोल अध्यापनाच्या विषयांमध्ये किंवा डिजिटल प्लॅटफॉर्म्सवरसुद्धा नेहमीच नकाशे अत्यंत महत्त्वाचे असतात. संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेच्या निमित्ताने जो नवा नकाशा अस्तित्वात येणार आहे, त्याचा वापर या सर्वच ठिकाणी परीपूर्णपणे करणे शक्य होणार आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे अमेरिकेचा या प्रस्तावाला असलेला विरोध किंवा इतर सहा छोट्या देशांनी तटस्थ राहण्याची घेतलेली भूमिका सोडता या नकाशा बदलण्याच्या प्रस्तावाला कोणीही विरोध केला नाही. भारत, पाकिस्तान, चीनसह सर्व प्रमुख देशांनी या नकाशा बदलाला पाठिंबा दिला आहे हे महत्त्वाचे आहे. खरे तर भारत आणि चीन किंवा भारत आणि पाकिस्तान यांच्यामध्ये नेहमीच सीमावाद अस्तित्वात आहे. आमसभेने ज्या नकाशाला मंजुरी दिली आहे तो खंडाचा नकाशा असल्यामुळे त्या खंडांमध्ये जे देश उपलब्ध आहेत त्यांच्या सीमारेषा आणि त्यांचे क्षेत्र हा शेवटी त्या त्या देशांपुरता असा विषय आहे. पृथ्वीवर जे खंड आहेत त्यांचा प्रत्यक्ष आकार आणि त्याचप्रमाणे तो आकार नकाशावरही दिसावा या दृष्टिकोनातून बदल करण्यात आले असल्याने ही आधुनिक काळातील एक महत्त्वाची घटना मानता येईल. संयुक्त राष्ट्राने अशा किरकोळ विषयांपेक्षा अधिक महत्त्वाच्या विषयांना प्राधान्य द्यायला हवे, अशा भूमिकेतूनच अमेरिकेने या ठरावाला विरोध केला आहे. बाकी नकाशा बदलण्याच्या विषयाला त्यांचा विरोध नाही हेसुद्धा या ठिकाणी लक्षणीय आहे. भारतासह जगात अनेक देशांमध्ये इतिहास आणि भूगोल यांची मोडतोड आपल्याला पाहिजे त्या पद्धतीने केली जात असल्याचे आरोप केले जात असल्याच्या पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्रांच्या पुढाकाराने झालेला हा बदल निश्चितच लक्षणीय आहे. संयुक्त राष्ट्रांचे सदस्य देश असलेल्या सर्वांनी एकमुखाने याला पाठिंबा दिला असल्यामुळे आगामी कालावधीमध्ये हा बदललेला नवीन नकाशा अस्तित्वात येणार आहे आणि कार्यरतही होणार आहे. अमेरिकेने नेहमीप्रमाणे वेगळी भूमिका घेऊन हा विषय एवढा महत्त्वाचा नाही अशी टीका जरी केली असली, तरी पुढील काळातील पिढ्यांसाठी खरा वास्तव नकाशा समोर येणे अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे, हे नाकारून चालत नाही. जागतिक घडामोडींवर कधीही लक्ष न घालणाऱ्या आणि कधीही पुढाकार घेऊन निर्णय न घेणारा संयुक्त राष्ट्र अशी टीका होणाऱ्या या संघटनेने आता एक चांगला निर्णय घेतला आहे, त्याबद्दल त्यांचे निश्चितच अभिनंदन करावे लागेल.

# पंजाब काँग्रेसमधील अंतर्गत दुही

**पंजाबच्या राजकारणाशी काँग्रेसचे नाते स्वातंत्र्यपूर्व काळापासूनचे. १९२९ च्या अखेरीस लाहोर येथे जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या काँग्रेस अधिवेशनात 'पूर्ण स्वराज्या'चा ठराव झाला आणि २६ जानेवारी १९३० हा स्वातंत्र्यदिन म्हणून पाळण्याचे आवाहन करण्यात आले. पुढच्याच वर्षी कराची अधिवेशनात सरदार वल्लभभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली मूलभूत अधिकार आणि आर्थिक धोरणाचा ऐतिहासिक ठराव मंजूर झाला.**




स्वतंत्र भारतातील नागरिकांचे अधिकार, समानता आणि प्रौढ मताधिकार यांची दिशा त्या ठरावातून स्पष्ट झाली. या इतिहासाचा उल्लेख आज करण्याचे कारण एवढेच, की पंजाबमध्ये दीर्घ राजकीय परंपरा असलेल्या काँग्रेससमोर आज प्रतिस्पर्ध्यांपेक्षा स्वतःच्या घरातील विसंवादाचे आव्हान अधिक मोठे झाले आहे. स्वातंत्र्यानंतर पंजाबचा भूगोल आणि राजकीय रचना वारंवार बदलली.संस्थानांचे विलीनीकरण, पेप्सूची निर्मिती आणि पुढे १९५६ मधील पुनर्रचना यांतून संयुक्त पंजाब अस्तित्वात आला. भाषावार राज्याच्या मागणीने पुढे जोर धरला आणि १९६६ मध्ये पंजाबची पुनर्रचना होऊन हरियाणा स्वतंत्र राज्य झाले; पर्वतीय भाग हिमाचल प्रदेशात गेला. या पुनर्रचनेनंतर पंजाबच्या राजकारणातील काँग्रेसचे निर्विवाद वर्चस्व संपण्यास सुरुवात झाली. १९६७ मध्ये अकाली दल आणि जनसंघाच्या आघाडीने सत्तेचे समीकरण बदलले. पुढील काळात ज्ञानी झैलसिंग, दरबारा सिंह, प्रकाशसिंग बादल अशा नेत्यांच्या भोवती पंजाबचे राजकारण फिरत राहिले. १९८० च्या दशकातील दहशतवादाने तर राज्याच्या राजकीय आणि सामाजिक जीवनावर खोल जखमा केल्या. १९९० च्या दशकात पंजाब त्यातून बाहेर पडला, पण काँग्रेस आणि अकाली दल यांच्यातील पारंपरिक सत्तास्पर्धा दीर्घकाळ कायम राहिली. या द्विध्रुवीय राजकारणाला २०२२ च्या विधानसभा निवडणुकीने निर्णायक धक्का दिला. आम आदमी पक्षाने ११७ पैकी ९२ जागा जिंकून अभूतपूर्व बहुमत मिळवले. काँग्रेस १८ जागांवर घसरली, तर शिरोमणी अकाली दल आणि भाजपही प्रभावी पर्याय ठरू शकले नाहीत. पंजाबच्या मतदारांनी केवळ सत्ताबदल केला नव्हता; अनेक वर्षे चालत आलेल्या राजकीय व्यवस्थेलाच त्यांनी नकार दिला होता. काँग्रेसच्या पराभवामागे पक्षांतर्गत संघर्षाचा मोठा वाटा होता. २०१७ मध्ये पक्षाला सत्तेवर आणणारे कॅप्टन अमरिंदर सिंह यांना २०२१ मध्ये मुख्यमंत्रिपद सोडावे लागले. त्यांच्या जागी चरणजितसिंग चन्नी आले. त्याच काळात प्रदेशाध्यक्ष नवज्योतसिंग सिद्धू आणि पक्षातील इतर नेत्यांमधील मतभेद सतत सार्वजनिक होत राहिले. सरकारने केलेल्या कामांपेक्षा कोण कोणाच्या विरोधात आहे, मुख्यमंत्री कोण होणार, पक्षाची सूत्रे कोणाकडे राहणार, याचीच अधिक चर्चा झाली. मतदाराने या गोंधळाचा निकाल मतदानातून दिला. चार वर्षांनंतरही काँग्रेसला या अनुभवातून अपेक्षित धडा मिळालेला दिसत नाही. आता प्रदेशाध्यक्ष अमरिंदरसिंग राजा वडिंग आणि माजी मुख्यमंत्री चरणजितसिंग चन्नी यांच्यातील तणाव पक्षाच्या चिंतेचा विषय झाला आहे. पंजाबमध्ये काँग्रेसकडे अजूनही सामाजिक आधार, अनुभवी नेते आणि संघटनात्मक अस्तित्व आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत १३ पैकी ७ जागा जिंकून काँग्रेसने हेच दाखवून दिले. त्यामुळे पक्षासाठी राजकीय जमीन संपलेली नाही; उलट आम आदमी पक्षाला पर्याय शोधणाऱ्या मतदारांपर्यंत पोहोचण्याची संधी त्याच्याकडे आहे. प्रश्न त्या संधीचा उपयोग करण्याइतकी अंतर्गत शिस्त निर्माण करण्याचा आहे. पंजाबचे प्रभारी म्हणून भूपेश बघेल यांच्याकडे ही जबाबदारी देण्यात आली होती. छत्तीसगडचे मुख्यमंत्री म्हणून प्रदीर्घ अनुभव असलेल्या बघेल यांच्याकडून विविध गटांना एका व्यासपीठावर आणण्याची अपेक्षा होती. प्रत्यक्षात मात्र प्रदेशातील गटबाजी कमी झाली नाही. उलट त्यांच्याही भूमिकेविषयी पक्षातील एका गटाने प्रश्न उपस्थित केले. आता काँग्रेस नेतृत्वाने सचिन पायलट यांच्याकडे पंजाबची जबाबदारी सोपवून नव्याने प्रयत्न सुरू केला आहे. पायलट यांच्यासाठी पंजाब ही सहज हाताळता येण्यासारखी जबाबदारी नाही. पंजाबच्या काँग्रेसमध्ये संघर्ष केवळ दोन नेत्यांच्या व्यक्तिगत महत्त्वाकांक्षेपुरता मर्यादित नाही. त्याला प्रादेशिक, सामाजिक आणि नेतृत्वाच्या पुढील पिढीशी संबंधित अनेक पदर आहेत. चरणजितसिंग चन्नी यांच्याकडे दलित समाजातून पुढे आलेल्या माजी मुख्यमंत्र्याचे राजकीय वजन आहे. राजा वडिंग यांच्या हाती प्रदेश संघटना आहे. प्रतापसिंग बाजवा यांच्यासारखे ज्येष्ठ नेतेही स्वतंत्र प्रभाव राखून आहेत. अशा परिस्थितीत एका गटाला बळ देऊन दुसऱ्याला शांत करण्याचा प्रयत्न झाला तर तो तात्पुरता उपाय ठरेल. सचिन पायलट यांची जमेची बाजू म्हणजे अशा संघर्षाचा त्यांना स्वतःलाही अनुभव आहे. राजस्थान काँग्रेसमधील अशोक गेहलोत-पायलट संघर्ष राष्ट्रीय पातळीवर चर्चेत राहिला. संघटना आणि सत्तेतील संघर्ष किती दूर जाऊ शकतो आणि त्याची निवडणुकीत किती मोठी किंमत मोजावी लागते, याची त्यांना कल्पना असणे स्वाभाविक आहे. पंजाबमध्ये त्यांना याच अनुभवाचा अधिक संयमी उपयोग करावा लागेल. सचिन पायलट यांच्यापुढील खरी परीक्षा गटांमध्ये तात्पुरता तह घडवण्याची नाही; या सर्व शक्तींना २०२७ च्या निवडणुकीपूर्वी एका राजकीय दिशेने चालायला लावण्याची आहे.

दैनंदिनी

# अक्षरज्ञानासोबत डिजीटल साक्षरताही महत्वाची

## साक्षरतेच्या व्याख्येत बदल;डिजीटल ज्ञानही अंगीकारण्याची गरज



**''साक्षरतेचा संबंध आता केवळ शैक्षणिक गुणवत्ता किंवा वाचता आले आणि लिहिता आले या पुरता मर्यादित राहिला नसून,आजच्या काळात त्याचे समीकरण बदललेले आहे. ८ सप्टेंबर आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन साजरा केला जातो. व्यक्तीच्या विकासाबरोबरच सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक प्रगतीसाठी साक्षरतेचे महत्त्व अधोरेखित करणे हा या दिवसाचा प्रमुख उद्देश आहे.''**

आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन विशेष


साक्षरता व्यक्तीला माहिती समजून घेण्याची, निर्णय घेण्याची आणि आपल्या हक्कांसाठी उभे राहण्याची क्षमता देते. डिजिटल युगात या क्षमतेला तंत्रज्ञानाच्या ज्ञानाची जोड मिळणे आवश्यक झाले आहे. साक्षरता म्हटले की, अक्षर ओळखता येणे, वाचता आणि लिहिता येणे एवढाच त्याचा पारंपरिक अर्थ आपल्या मनात येतो.मात्र तंत्रज्ञानाने आपल्या जीवनशैलीत आमूलाग्र बदल घडवून आणला आहे. स्मार्टफोन, इंटरनेट, डिजिटल बँकिंग, ऑनलाइन शिक्षण, सोशल मीडिया आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहेत. त्यामुळे आजच्या युगात केवळ अक्षरज्ञान पुरेसे नाही. तर डिजिटल साधनांचा सुरक्षित, जबाबदार आणि विवेकी वापर करता येणे ही आधुनिक साक्षरतेची नवी ओळख आहे.भारतात यूपीआय आणि डिजिटल पेमेंट याचे उत्तम उदाहरण म्हणजे डिजीटल साक्षरता आहे. शहरांपासून छोट्या गावांपर्यंत चहाच्या टपरीपासून किराणा दुकानापर्यंत क्यूआर कोड दिसतो.गाव खेड्यातील ग्राहकसुद्धा मोबाईलवरून काही सेकंदांत पैसे देतो आहे.मात्र डिजिटल व्यवहार करता येणे एवढेच पुरेसे नाही. एखाद्याने 'तुमच्या खात्यात पैसे जमा करण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा' असे सांगितल्यास पैसे मिळण्याऐवजी आपल्या खात्यातून पैसे जाऊ शकतात, हे समजणे सुद्धा तितकेच आवश्यक आहे. त्यामुळे डिजिटल साक्षरता बरोबरच आर्थिक सुरक्षितता सुद्धा तितकीच महत्वाची आहे. ऑनलाइन फसवणुकीचे प्रकार हे डिजिटल साक्षरतेच्या अभावाचे गंभीर उदाहरण आहे. 'तुमचे बँक खाते बंद होणार आहे', 'तुमचे केवायसी अपडेट करा' किंवा 'तुम्हाला बक्षीस मिळाले आहे' अशा संदेशांसोबत बनावट लिंक पाठवली जाते. घाईघाईने लिंक उघडून बँक तपशील, पासवर्ड किंवा ओटीपी दिल्यास मोठे आर्थिक नुकसान होऊ शकते. डिजिटल साक्षर नागरिक अशा संदेशांवर त्वरित विश्वास न ठेवता अधिकृत माध्यमातून त्याची पडताळणी करतो. ओटीपी, पासवर्ड किंवा पिन कोणालाही न देणे हा साधा नियम अनेकांना आर्थिक फसवणुकीपासून वाचवू शकतो.

डिजिटल साक्षरतेचा फायदा ग्रामीण भागालाही मोठ्या प्रमाणात होऊ शकतो. उदाहरणार्थ, शेतकरी मोबाईलवरून हवामानाचा अंदाज, बाजारभाव, कृषीविषयक माहिती आणि विविध सरकारी योजनांची माहिती मिळवू शकतो. पावसाचा अंदाज पाहून शेतीची कामे नियोजित करता येतात किंवा वेगवेगळया बाजारपेठांमधील दरांची माहिती घेऊन माल विक्रीचा निर्णय घेता येतो. पूर्वी चांगल्या शिक्षकांपर्यंत पोहोचण्यासाठी शहरात जाण्याची गरज होती; आज इंटरनेटमुळे ज्ञानाचे जग मोठ्या प्रमाणात सर्वांसाठी खुले झाले आहे. परंतु मोबाईलचा वापर अभ्यासाऐवजी केवळ मनोरंजनासाठी होऊ नये, यासाठी विद्यार्थ्यांना डिजिटल शिस्त आणि माहितीचे चिकित्सक आकलन शिकवणे गरजेचे आहे. सोशल मीडियावरील चुकीची माहिती हे डिजिटल युगातील आणखी एक मोठे आव्हान आहे. आज 'वाचता येणे' इतकेच नव्हे, तर वाचलेल्या माहितीचे मूल्यमापन करता येणे हीदेखील साक्षरतेची कसोटी आहे.

ज्येष्ठ नागरिकांसाठी डिजिटल साक्षरता विशेष महत्त्वाची आहे. ऑनलाइन बँकिंग, रेल्वे आरक्षण, बिल भरणे, सरकारी सेवा आणि व्हिडिओ कॉल यांसारख्या सुविधांमुळे त्यांचे जीवन सुलभ होऊ शकते. मात्र त्यांना डिजिटल फसवणुकीपासून सुरक्षित राहण्याचे प्रशिक्षण देणेही तितकेच आवश्यक आहे. कुटुंबातील तरुणांनी ज्येष्ठांना मोबाईल वापर शिकवताना पासवर्ड, पिन आणि ओटीपीची गोपनीयता याबाबतही जागरूक करणे गरजेचे आहे. आता कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात डिजिटल साक्षरतेचा अर्थ आणखी व्यापक झाला आहे. एआयच्या मदतीने मजकूर, चित्रे आणि विविध प्रकारची माहिती काही क्षणांत तयार करता येते. परंतु एआयने दिलेली प्रत्येक माहिती अचूक असेलच असे नाही. त्यामुळे तंत्रज्ञानावर पूर्णपणे अवलंबून न राहता माहितीची पडताळणी करण्याची सवय आवश्यक आहे. डिजिटल साक्षरता ही केवळ तंत्रज्ञान वापरण्याची क्षमता नाही; ती विवेकाने तंत्रज्ञान वापरण्याची क्षमता आहे. ग्रामीण नागरिक असो, विद्यार्थी असो, महिला असो किंवा ज्येष्ठ नागरिक प्रत्येकाला डिजिटल जगात सुरक्षितपणे वावरता आले पाहिजे. आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनाच्या निमित्ताने म्हणूनच साक्षरतेची व्याख्या नव्याने समजून घेण्याची वेळ आली आहे. अक्षरज्ञान प्रत्येकासाठी आणि डिजिटल ज्ञान प्रत्येकाच्या हातात हा संकल्प प्रत्यक्षात उतरवला, तरच डिजिटल भारत अधिक सक्षम, सुरक्षित आणि समावेशक बनेल. कारण डिजिटल युगातील खरी साक्षरता म्हणजे केवळ स्क्रीनवरचे शब्द वाचणे नव्हे; तर त्यातील सत्य ओळखणे, योग्य निर्णय घेणे आणि तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर करणे होय.नाहीतर आपण या डिजिटल महाजालात केव्हा अलगद फसले जाऊ हे काही सांगता येणार नाही.

■दत्तप्रसाद शिरोडकर

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**मंगळवार,ता.८.९.२०२६,**विक्रमसंवत २०८२, शिवशक ३५३, शालिवहन शके १९४८,पराभव नाम संवत्सरे, दक्षिणायणे, वर्षा ऋतो, श्रावण मासे,कृष्ण पक्षे, द्वादशी तिथी,१४.४४ नंतर त्रयोदशी तिथी,पुष्य नक्षत्र, १६.४० नंतर आश्लेषा नक्षत्र, कर्क रास,परिघ योग, २४.४१ नंतर शिवयोग तैतिल करण १४.४४ नंतर, गरज करण २५.३६ पर्यंत, दिनमान १२.१५, सुर्योदय ६.२४, सुर्यास्त १८.३९ (कोल्हापूरचे) राहू काळ सकाळी ३ ते ४.३०,भौम प्रदोष, २ ते ४.३० दुपारी मध्यम दिवस, धान्य कापणी, संग्रह ओटी भरणेस,सोने खरेदी, मंगळागौरी व्रत समाप्ती, भवानी यात्रा व्हनाळी व जरंडी, संतश्रेष्ठ सेनामहा व महिपती महाराज पु.दि. दुपारी २ पर्यंत परिघ पूर्वदल म्हणून वर्ज्य.

**ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## ✻ राशीभविष्य ✻

**मेष-** नोकरदारवर्गाला वरिष्ठांचे सहकार्य मिळेल. आर्थिक समीकरण जुळून येईल.राजकीय क्षेत्रात महत्त्वाच्या कामाविषयी चर्चा होईल.घरगुती वातावरण चांगले राहील.

**वृषभ-**आर्थिक लाभ होईल. राजकीय क्षेत्रातील ताणतणाव कमी होईल. घरगुती वातावरण चांगले राहील.मानसिक-शारीरिक स्वास्थ्य चांगले राहील.आर्थिक लाभ होईल.

**मिथून-** व्यवसायात फायद्याचे प्रमाण चांगले राहील. नोकरदार वर्गाला अधिकार प्राप्त होईल. आर्थिक बाबतीत चिंता वाटणार नाही. राजकीय क्षेत्रात यश मिळेल.

**कर्क-** व्यवसायात चढ-उतार असला तरी फायद्याचे प्रमाण चांगले राहील. नोकरदार वर्गाचे कामामध्ये मन रमणार नाही. आर्थिक खर्च कमी कसे होतील ते पाहा.

**सिंह-**नोकरदार वर्गाने ज्येष्ठांकडून कामाच्या संदर्भात योग्य ते मार्गदर्शन घेऊन मगच काम केलेले चांगले. खर्च जपून करा. राजकीय क्षेत्रात सध्या तुम्हाला रस वाटणार नाही.

**कन्या-**व्यवसायात गुंतवणूक करू नका. नोकरदार वर्गाला ज्येष्ठांचे चांगले मार्गदर्शन मिळेल. आर्थिक बचत करणे योग्य राहील. मित्र-मैत्रिणींचे सहकार्य मिळेल. जोडीदार साथ देईल.

**तुळ-**व्यवसायातील परिस्थितीत बदल होईल. नोकरदारवर्गाला नवीन कामाचे प्रस्ताव येतील. आर्थिक लाभ होईल.राजकीय क्षेत्रात प्रसिद्धी मिळेल. घरगुती वातावरण आनंदी राहील.

**वृश्चिक-**आर्थिक व्यवहार जपून करा.मित्र-मैत्रिणींशी संवाद साधाल.नातेवाईकांच्या भेटीगाठी होतील. मंगलकार्यात सहभाग राहील. धार्मिक स्थळांना भेट द्याल.

**धनु-** नोकरदार वर्गाला वरिष्ठांचे प्रोत्साहन मिळेल. घरगुती वातावरण चांगले कसे राहील ते पाहा. नातेवाईकांच्या सुख-दुःखात सहभागी व्हाल. धार्मिक कार्यासाठी खर्च कराल.

**मकर-**व्यवसायात गुंतवणूक करताना विचार करा. इतरांवर अवलंबून राहून गुंतवणूक करणे त्रासाचे राहील.नोकरदार वर्गाने कामाव्यतिरिक्त इतर गोष्टीला महत्त्व देऊ नये.

**कुंभ-** सध्या व्यवसायात नवीन प्रस्ताव स्वीकारू नका. नोकरदार वर्गाने वरिष्ठांच्या मर्जीने काम करणे चांगले राहील. आर्थिक व्यवहार फसणार नाहीत याची काळजी घ्या.

**मीन-**राजकीय क्षेत्रात वर्चस्व गाजवाल. नातेवाईकांच्या सुखदुःखात सहभागी व्हाल. भावंडांशी संवाद साधाल. धार्मिक गोष्टींसाठी वेळ द्याल. मानसिक समाधान लाभेल.

## वाचकांचा पत्रव्यवहार

### बापटांच्या भूमिकेचे स्वागत पण..!



गणेशोत्सवाच्या निमित्ताने मिरवणुकांमध्ये वाजवला जाणारा डीजे आणि पारंपरिक वाद्ये यांमुळे प्रचंड ध्वनी प्रदूषण होते ज्याचा त्रास सर्वसामान्य नागरिकांना भोगावा लागतो हे सूत्र पुण्यात विद्यानंद बापट यांनी लावून धरले आणि त्यांच्या समर्थनार्थ हजारो पुणेकर एकवटले. सोशल मीडिया, वृत्त वाहिन्या, सामाजिक कार्यकर्ते सर्वांनीच विद्यानंद बापट यांच्या भूमिकेचे समर्थन करत त्यांना पाठिंबा दर्शवला आहे. डीजेमुळे होणारे ध्वनी प्रदूषण, त्याचा कानठळ्या बसवणारा आणि हृदयात धडकी भरवणारा आवाज आजतागायत अनेकांच्या मृत्यूला, कायमस्वरूपी बहिरेपण येण्याला आणि अनेक जीवघेण्या आजारांना निमंत्रण देण्यास कारणीभूत ठरला आहे हे सत्य आज कुणीच नाकारू शकत नाही. न्यायालयाने अनेकदा निर्बंध लादुनही राजकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळे आजतागायत डीजेचे स्तोम काही कमी झालेले नाही. नुकत्याच सरलेल्या गोपाळकाल्याच्या इव्हेंट्समध्येही ठिकठिकाणी डीजेचा दणदणाट पाहायला मिळाला. गर्भवती स्त्रिया, लहान मुले, वयोवृद्ध, मनोरुग्ण, मतिमंद यांच्यावर डीजेचे अत्यंत घातक परिणाम होतात. त्यामुळे डीजेवर कायमस्वरुपी बंदी आणावी यावर एकमत असणारा मोठा वर्ग समाजात आहे ज्यामुळे विद्यानंद बापट यांना आज समाजातून मोठ्या प्रमाणात समर्थन मिळत आहे. आपली भूमिका मांडताना ते सार्वजनिक गणेशोत्सव कसा साजरा करावा याबाबतही सांगतात. मोठमोठ्या मैदानांत, सभागृहात जशी वस्तूंची प्रदर्शन आणि विक्री केंद्रे उभारली जातात त्याप्रमाणे मंडळांनी एकत्र येऊन मोकळे मैदान भाड्याने घेऊन त्याठिकाणी आपापल्या मंडळांचे मंडप रांगेत उभारून मंडपात आपली मूर्ती प्रदर्शनासाठी ठेवावी असे ते आवर्जून सांगता त्यामुळे असले बुद्धीभेद करणारे विचार मांडणे बापटांनी टाळायला हवे. डीजेवर बंदी आणण्याबाबत बापटांनी घेतलेल्या आग्रही भूमिकेचे स्वागत असले तरी बापटांचे सार्वजनिक गणेशोत्सव कसे साजरे करावेत याबाबत असलेली मते गणेशभक्तांच्या श्रद्धेवर घाला घालणारी आहेत.

■जगन घाणेकर

### चुकांमुळे करदात्यांच्या पैशांची उधळपट्टी

मुंबई महानगरपालिका, पश्चिम रेल्वे, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,विमान वाहतूक प्राधिकरण अशा विविध शासकीय संस्थांमधील समन्वयाच्या अभावी होणाऱ्या चुकांमुळे करदात्यांचे कोट्यवधी रुपये पाण्यात जात आहेत. आधी बांधकाम करायचे, मग चूक लक्षात आल्यावर ते तोडून पुन्हा कोट्यवधी रुपये खर्च करून दुरुस्त करायचे हा नवीनच प्रकार मुंबईत सुरु झाला आहे का, असा प्रश्न पडतो. आधी मुंबईच्या अंधेरी पूर्व आणि अंधेरी पश्चिमेला जोडणाऱ्या गोपाळ कृष्ण गोखले उड्डाणपुलाच्या चुकीच्या डिझाइनमुळे झालेली चूक सुधारण्यासाठी पालिकेला पर्यायाने करदात्यांना १० कोटी रुपयांचा नाहक अतिरिक्त आर्थिक भुर्दंड सहन करावा लागला आणि या पुलाचा एकूण खर्च १०० कोटी रुपयांच्या वर गेला. हा धक्का ताजा असतानाच अंधेरी पूर्व (गुंदवली)ते छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ टर्मिनल २ ला थेट जोडणाऱ्या मेट्रो ७ अ चा जवळपास पूर्ण झालेला सुमारे १ किलोमीटरचा उन्नत मार्ग पाडावा लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या मार्गाचे डिझाईन करणाऱ्यांनी वरून जाणाऱ्या विद्युत वाहिन्यांच्या उंचीचा विचार न केल्यामुळे विमानतळाच्या एअर फनेल सुरक्षा क्षेत्राच्या मर्यादेचे २.५ मीटरने उल्लंघन झाले आहे. हा उन्नत मार्ग पाडून पुन्हा बांधावा. लागल्यास २५० ते २६० कोटी रुपयांचे प्रचंड नुकसान होणार आहे.त्यामुळेच सरकारने सर्व संबंधित यंत्रणांच्या समन्वयासाठी एक सामायिक समन्वय समिती स्थापन करणे गरजेचे आहे.जेणेकरून भविष्यात असे प्रकार टाळता येतील.

■ प्रदीप मोरे

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् अ‍ॅन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५. , दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६०, सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.✻ कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१.
टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# महिलांना स्वयंपूर्ण उद्योगशील बनवू

## मंत्री हसन मुश्रीफ

मुरगूड,ता.७(प्रतिनिधी)-

**महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम बनल्या पाहिजेत त्यासाठी महिलांना आयकर भरू शकतील इथपर्यंत उद्योगशील करून त्यांना स्वयंपूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न आहे,असे प्रतिपादन वैद्यकिय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांनी मुरगूड येथे केले.**



मुरगूड येथे राष्ट्रवादी व जमादार सेवाभावी संस्थेच्यावतीने आयोजित महिला मेळाव्यात बोलताना वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ व समरजित घाटगे समोर उपस्थित महिला वर्ग.

मुरगूड शहर राष्ट्रवादी व बाळासाहेब जमादार सेवाभावी संस्थेच्यावतीने आयोजित महिला मेळाव्यात मंत्री मुश्रीफ बोलत होते.अध्यक्षस्थानी शाहू ग्रुपचे प्रमुख समरजित घाटगे हे होते. प्रारंभी सोनाली कलकुटकी यांनी स्वागत केले.माजी नगराध्यक्ष राजेखान जमादार यांनी प्रास्ताविक करताना ना.मुश्रीफांनी कागल व गडहिंग्लज शहर विकासासाठी ७० ते ७५ कोटीचा निधी दिला. गेल्या आठ महिन्यापासून मुरगूडचा विकास ठप्प आहे.यापुढील निवडणूकीत परत चुक करू नका. बेंटेक्सचे सोने न घेता अस्सल २४ कॅरेटचे सोन्याचे नेतृत्व ओळखून मुश्रीफांच्या पाठीशी ठाम रहा.तशी मला खात्री आहे असे सांगितले

समरजित घाटगे म्हणाले, लाडक्या बहिणींच्या आशिर्वादा शिवाय निवडणूकीत विजय मिळविता येत नाही हा माझा अनुभव आहे. तो आशिर्वाद पुढे मला मिळावा. महिला सक्षम झाल्याशिवाय समाजाची प्रगती होणे अशक्य आहे.

या मेळाव्यात सुनिता कांबळे, सौ. आशा एकल विजय काळे, शिवाजी विद्यापीठ सिनेट सदस्य श्वेता पुरेकर यांची भाषणे झाली.यावेळी उपस्थित महिलांनी नाम.हसन मुश्रीफ व समरजित घाटगे यांना राख्या बांधून औक्षण करण्यासाठी गर्दी केली होती

मेळाव्यास पंचायत समिती सदस्या सौ.रुपाली आंगज , तसनिम जमादार, सौ.खराडे आदी प्रमुख उपस्थित होते. सौ. आदिती सुर्यवंशी यांनी आभार मानले.

## तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत बागेवाडी कॉलेजचे यश

निपाणी,ता.७(प्रतिनिधी)-

**खडकलाट येथे संपन्न झालेल्या तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत निपाणी येथील केएलई संस्थेच्या जी. आय. बागेवाडी पदवीपूर्व महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत यश संपादन केले आहे.**

या क्रीडा स्पर्धेत बागेवाडी महाविद्यालयाच्या मुलांच्या आणि मुलींच्या दोन्ही संघांनी उत्कृष्ट खेळ खेळत सर्वसाधारण विजेतेपद पटकावले.तसेच या शानदार कामगिरीच्या जोरावर २०२६-२७ या वर्षाचे निपाणी तालुका ओव्हरऑल चॅम्पियनशिप (सर्वसाधारण विजेतेपद) देखील याच महाविद्यालयाने आपल्या नावावर केले आहे. स्पर्धेतील खेळाडूंना शारीरिक प्रशिक्षक सिद्धू उद्गटी यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल प्रवीण बागेवाडी,प्राचार्य डॉ.एम.एम.हुरळी, प्राचार्या हेमावती चिकमठ, आणि महाविद्यालयातील प्राध्यापक वर्गानी खेळाडूंचे अभिनंदन केले.

# सरस्वती लक्ष्मी संस्थेने शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावले- उत्तम पाटील

बारवाड,ता.७(वार्ताहर)-

**श्री सरस्वती लक्ष्मी ही संस्था अल्पावधीतच लोकप्रिय झाली असून सभासदांचे हित व सामाजिक बांधिलकी जोपासणे हाच संघाचा उद्देश असून या संस्थेने शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्याचे काम केले असल्याचे मत अरिहंत उद्योग समूहाचे प्रमुख उत्तम पाटील यांनी व्यक्त केले.**

ते भोज (ता.निपाणी) येथील श्री सरस्वती लक्ष्मी सहकारी संघाच्या ७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मार्गदर्शन करताना बोलत होते. अध्यक्षस्थानी संघाचे मार्गदर्शक डॉ.बी.ए.माने हे होते. यावेळी डॉ.बी. ए.माने यांनीही मनोगत व्यक्त केले.अहवाल वाचन करताना चेअरमन मैनुद्दीन सनदी म्हणाले, संघाचे ४३६ सभासद असून ४ लाख ८४ हजार ३५० रुपये शेअर भांडवल, २९ लाख ८० हजार २६७ रुपये निधी आहेत.



वार्षिक सभेत बोलताना उत्तम पाटील व्यासपीठावर मान्यवर.

संघाकडे ११ कोटी ८२ लाख रुपये ठेवी असून गुंतवणूक ५ कोटी ४९ लाख ८६ हजार ८५२ रुपये इतक्या असून ५ कोटी ३७ लाख २६ हजार ७४६ रुपये कर्ज वाटप केले आहे.तर संघास आर्थिक वर्षात १२ लाख ५ हजार ९८५ रुपये नफा झाला असून यावर्षी सभासदांना १५ टक्के लाभांश वाटप करण्यात येणार असल्याचे सांगितले.त्यानंतर सभेचे विषय वाचन प्रमोद पाटील यांनी तर नफा तोटा ताळेबंद पत्रकाचे वाचन सेक्रेटरी राजू कुरुंदवाडे यांनी केले.प्रारंभी सरस्वती लक्ष्मी फोटो पूजन व दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.स्वागत इंद्रजीत हिंदलकर यांनी तर प्रास्ताविक लक्ष्मण हिंदलकर यांनी केले.

सभेस संघाचे व्हा.चेअरमन शिवाजी साळुंखे, संचालक संकेत माने, आण्णासाहेब दुर्गे, सुरेंद्र पाटील, विश्वनाथ बुर्जी, तुकाराम चव्हाण, नेमगौडा पाटील, आप्पासाहेब जाधव, चेतन परीट, कल्पना कुरुंदवाडे, शालन पाटील, आण्णासाहेब माने यांच्यासह सभासद, सेवकवर्ग उपस्थित होते.

# एकसंबा शहर स्वच्छ,सुंदर बनविणार-आम.हुक्केरी

चिकोडी,ता.७(प्रतिनिधी)-

**एकसंबा शहरात दर्जेदार रस्ते, सिंचन योजना,शाळा व महाविद्यालय, समुदाय भवन आणि विविध मंदिरांचा विकास यासारखी अनेक लोकोपयोगी कामे हाती घेण्यात आली आहेत. एकसंबा शहर स्वच्छ, सुंदर आणि प्रगतशील बनवण्याचा मुख्य उद्देश असल्याचे आमदार गणेश हुक्केरी यांनी सांगितले.**

एकसंबा येथील खोत मळ्यातल्या लक्ष्मी देवीच्या मंदिराचा कलशारोहण सोहळा उत्साहात आणि भव्यदिव्य वातावरणात पार पडला. याप्रसंगी बोलताना आमदार हुक्केरी यांनी वरील मनोगत व्यक्त केले.या महोत्सवानिमित्त मंदिरात होम, नवग्रह पूजा, महाअभिषेक, रुद्राभिषेक आणि विविध धार्मिक विधी पार



एकसंबा:येथील मंदिराच्या कलशारोहण सोहळ्या प्रसंगी आ.गणेश हुक्केरी, श्री शिवप्रसाद देवरु,श्री गुरूलिंग स्वामीजी व इतर.

पडले. यादनवाडीतून आगमन झालेली रेणुका माता व लक्ष्मी देवीची पालखी मिरवणूक वाजत-गाजत काढण्यात आली.चिंचणी सिद्धसंस्थान मठाचे शिवप्रसाद देवरु आणि विजापूरच्या योगाश्रमाचे गुरुलिंग महास्वामींच्या प्रमुख उपस्थितीत कलशारोहण विधी पार पडला. यावेळी सदशिव कोकणे, अण्णासाहेब इंगळे,अंकुश खोत, राजूं कराळे,सुनील सप्तसागर, मारुती खोत,कल्लाप्पा खोत, सचिन खोत,बसवराज खोत, महादेव खोत, संतोष खोत, श्रीधर खोत, बाळासाहेब खोत, पुजारी राहुल हिरेमठ, जमन्शा मकानदार, चिदानंद बेळे, अरुण मगदूम,विजय खोत, सुनील खोत,महानतेश खोत, विनायक खोत, महेश खोत, मनोज खोत, धुंडाप्पा खोत,दत्ता शिंदे, धुंडाप्पा गौरोजी,अजित खोत यांच्यासह, भाविक उपस्थित होते.

# रयत संस्थेस २७.३३ लाखाचा नफा-भागाजे

बारवाड,ता.७(वार्ताहर)-

**कारदगा येथील श्री रयत को-ऑप क्रेडीट सोसायटीची ७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा महावीर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.**

प्रारंभी सरस्वती फोटो पूजन पासगोंड हुद्दार यांच्या हस्ते करून दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.स्वागत व प्रास्ताविक व्हा. चेअरमन दादासो बलवान यांनी केले त्यानंतर अहवाल सालात मयत झालेल्या मान्यवरांना श्रद्धांजली वाहण्यात आली.त्यानंतर विविध क्षेत्रात निवड झालेल्या मान्यवरांचा व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.अहवाल वाचन करताना संस्थापक चेअरमन भरत भागाजे म्हणाले की, अहवाल सालात ४९६ सभासद असून शेअर



रयत संस्थेच्या वार्षिक सभेप्रसंगी दिपप्रज्वलन करताना पासगोंडा हुद्दार, महावीर पाटील भरत भागाजे व इतर मान्यवर.

भांडवल-१३ लाख ८२ हजार रुपये, निधी-७१ लाख २५ हजार ५९८ रुपये, ठेवी १५ कोटी ७२ लाख ९ हजार ६२५ रुपये,कर्जे-८ कोटी ५७ लाख ४७ हजार ६७० रुपये वाटप केले असून अहवाल सालात २७ लाख ३३ हजार ३६१ रुपये नफा झाला असल्याचे सांगून सभासदांना ११ टक्के लाभांश देणार असल्याचे सांगितले.नफातोटा ताळेबंद पत्रकाचे वाचन सेक्रेटरी संतोष गावडे यांनी केले.त्यानंतर संजय खामकर,अरविंद कांबळे, संजू नोरजे, धोंडीराम काशिद, विजय तेली,महावीर पाटील आदींनी संस्थेच्या प्रगतीबद्दल प्रशंसा व्यक्त करून शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी संचालक कुंतिनाथ व्हनवाडे, बाबासो माणगावे, किरणकुमार टाकळे, गफूर शिराजभाई, गोपाल गावडे, विरकुमार आळते, महादेव दिंडे, अनिता गुरव, इंदुताई यळगुडे, आनंदा चव्हाण, सूर्यकांत हुद्दार, अरुण खोत, चंद्रकांत निगवे,संजय बुडके यांच्यासह सभासद,ठेवीदार, हितचिंतक व सेवकवर्ग उपस्थित होते.

## कत्ती परिवार जनतेच्या सेवेसाठी सदैव कटीबद्ध-आम.निखिल कत्ती

संकेश्वर,ता.७(प्रतिनिधी)-

**कत्ती परिवार जनतेच्या सेवेसाठी सदैव कटीबद्ध असल्याचे आमदार निखिल कत्ती यांनी सांगितले.ते संकेश्वर समुदाय आरोग्य केंद्रास अन्न व नागरी पुरवठा मंत्री दिवंगत उमेश कत्ती यांच्या स्मरणार्थ रुग्णवाहिका प्रदान सोहळ्यात बोलत होते.त्यांच्या हस्ते फित सोडून पूजाविधी कार्यक्रमांने रुग्णवाहिका लोकार्पण करण्यात आली.**

प्रारंभी संकेश्वर समुदाय आरोग्य केंद्राच्या वतीने हुक्केरी तालुका वैद्याधिकारी डॉ.उदय कुडची, संकेश्वर समुदाय आरोग्य केंद्राच्या वैद्याधिकारी डॉ.पौर्णिमा तल्लूर यांचे हस्ते आमदारांचा सन्मान करण्यात आला.आमदार निखिल कत्ती पुढे म्हणाले, हुक्केरी-संकेश्वर मतक्षेत्रातील जनतेने माजी मंत्री दिवंगत उमेश कत्ती यांना आशीर्वाद करुन ८ वेळा आमदार केले. गेल्या विधानसभा निवडणुकीत जनतेने मला आशीर्वाद केला. त्यामुळे कत्ती परिवार हुक्केरी-संकेश्वर मतक्षेत्रातील लोकांच्या सेवेसाठी कटीबद्ध आहे. कार्यक्रमास डॉ.पौर्णिमा तल्लूर, डॉ.विशाल सुतार, युके-२७ चे व्यवस्थापक पंकज यादव,हुक्केरी विद्युत संघाचे संचालक गजानन क्वळी, शिवानंद मुडशी,महादेव क्षिरसागर, सुभाष कासारकर, सुनील पर्वतराव, डॉ.मंदार हावळ,रोहण नेसरी, दिपक भिसे, राजू बांबरे, हारुण मुल्ला, संदीप दवडते, बंडू सुर्यवंशी, दिनेश कोळेकर, कुमार बस्तवाडी, आनंद संसुध्दी, नागेश क्वळी, विजय जरळी, राजू सुतार, आरोग्य विभागाचे अधिकारी पालिकेचे मुख्याधिकारी प्रकाश मठद, अभियंता आर.बी.गडाद, कर्मचारी अंगणवाडी सेविका, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.आभार डॉ.पौर्णिमा तल्लूर यांनी मानले.

## दोशी विद्यालयात शिक्षक दिन उत्साहात साजरी

निपाणी,ता.७(प्रतिनिधी)-

**अर्जुननगर येथील मोहनलाल दोशी विद्यालयात शिक्षक दिन व गोपाळकाला उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन मुख्याध्यापिका एस.एम.गोडबोले यांच्या हस्ते करण्यात आले.**

यावेळी श्रावणी आढाव, शाल्मली अंकोशे, समदर्श जाधव, संस्कृती सोकांडे यांनी मनोगत व्यक्त केले व शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. तसेच विविध वर्गातील विद्यार्थी व विद्यार्थिनी मिळून एक दिवसाचे शिक्षक बनून अध्यापनाचा अनुभव घेतला व शाळा सांभाळली. गोपाळकाला निमित्त वर्गातील मुलांच्या व मुलींच्या संघांनी दहीहंडी फोडली यावेळी आर.डी.पाटील, आर.एस. भोसले यांच्यासह शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

# श्री श्रध्दा क्रेडीट संघास १ कोटी ५० लाखाचा नफा

## चंद्रकांत कोठीवाले

निपाणी,ता.७(प्रतिनिधी)-

**श्री श्रध्दा क्रेडीट सौहार्द सहकारी संघ यावर्षी रौप्यमहोत्सव साजरा करीत आहे.छोटे व्यावसायीक, शेतकरी, शेतमजूर, नोकरदार व उद्योजक आमच्या संस्थेचे ग्राहक आहेत.त्यामुळे संस्थेने दिलेल्या वेगवेगळ्या योजनेचा लाभ घेत स्वतःचा आणि संस्थात्मक विकास करावा.**



निपाणीःश्री श्रध्दा क्रेडीट सौहार्द संघाच्या वार्षिक सभेत बोलताना अध्यक्ष सहकाररत्न चंद्रकांत कोठीवाले बाजूस संचालक मंडळ.

संस्थेने मयत सभासदांच्या वारसदारांना सहाय्यधन योजना तर कर्मचाऱ्यांसाठी ईएसआय योजना लागू केली आहे. येत्या वर्षात दोनशे कोटी रुपयांपर्यंत ठेवीचे उद्दिष्ट आहे. यावर्षी संस्थेला १ कोटी ५० लाख ४० हजार रुपयांचा नफा झाला असून सभासदांना १५ टक्के लाभाश देण्यात येणार असल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष सहकाररत्न चंद्रकांत कोठीवाले यांनी दिली.

येथील श्रध्दा क्रेडीट सौहार्द सहकारी संस्थेची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा महादेव मंदिर सांस्कृतिक भवनात संपन्न झाली. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ सभासद मलाप्पा रुगे हे होते. प्रथम एस. सी. पाटील यांनी स्वागत केले. संचालक पप्पू पाटील यांनी प्रास्ताविकात सर्व सभासद, हितचिंतकांच्या सहकार्यामुळे संस्थेची प्रगती सुरू असल्याचे सांगितले. सीईओ डी. के. पोवार यांनी विषय पत्रिकेचे वाचन केले.अध्यक्ष सहकाररत्न चंद्रकांत कोठीवाले पुढे म्हणाले, संस्थेचे ८ हजार सभासद असून संस्थेने मयत सभासदांच्या वारसदारांना सहाय्यधन योजना तर कर्मचाऱ्यांसाठी ईएसआय व कामगार विमा योजना लागू केली आहे. येत्या वर्षात दोनशे कोटी रुपयांपर्यंत ठेवीचे उद्दिष्ट आहे. कोअर बँकींगसह आधुनिक सुविधा सभासदांना दिल्या आहेत. व्यवसायापलीकडे सामाजिक बांधिलकी जपण्याची परंपरा संस्थेने राखली आहे. सध्या संस्थेच्या १२ शाखा कार्यरत असून पुन्हा ५ शाखा विस्तार करण्यात येणार आहेत. तरी सभासदांनी संस्थेच्या ठेवी वाढविण्याबरोबर विविध योजनांचा लाभ घ्यावा,असे आवाहन केले.

सभेत शाखा अध्यक्ष, उपाध्यक्ष व संचालकांचा सत्कार झाला. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष शिवमूर्ती स्वामी संचालक सुरेश कोठीवाले, शशिकांत कोठीवाले, रावसाहेब पाटील,धनंजय मानवी, दयानंद कोठीवाले, राजशेखर हिरेकोडी, नरसगोंडा पाटील, श्रीराम भारमल, राजेश तिळवे,गिरीजा पाटील, बेबीताई पाटील, मुरुघेंद्र तोडकर यांच्यासह संचालक,कर्मचारी सभासद उपस्थित होते. संजय शिंदे यांनी आभार मानले.

## निधन वार्ता

### जनाबाई कांबळे

गारगोटी,ता.७(प्रतिनिधी)



आकुर्डे(ता.भुदरगड) येथील जनाबाई बापु कांबळे (वय ८०) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात् मुलगा, मुलगी, सुन नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

### सुमन मुडशिंगे

प.कोडोली,ता.७(प्रतिनिधी)



रांगोळी(ता.हातकणंगले) येथील सुमन दत्तू मुडशिंगे (वय ७१) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात भाऊ, भावजया, भाचा असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने परिसरातून हळहळ व्यक्त होत आहे.



तुषार पवार यांचा सत्कार करताना कुमार पाटील व रेखा पाटील.

## स्पर्धा परीक्षा म्हणजे क्षमतेला सिद्ध करण्याची संधी-पवार

कोगनोळी,ता.७(प्रतिनिधी)

**विद्यार्थ्यांनी वाचन, चालू घडामोडी, सामान्य ज्ञान आणि अभ्यासाचे नियोजन यावर भर दिला पाहिजे. स्पर्धा परीक्षा ही केवळ नोकरी मिळवायची परीक्षा नसून आपल्या क्षमतेला सिद्ध करण्याची संधी असल्याचे प्रतिपादन तुषार पवार यांनी केले.**

कोगनोळी (ता. निपाणी) येथील इंटरनॅशनल पब्लिक स्कूलमध्ये शिक्षक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव कुमार पाटील हे होते.प्रारंभी विनोद परीट यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यावेळी तुषार पवार यांची कोल्हापूर जिल्हा परिषद शाळेत शिक्षक म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.याप्रसंगी साधना मधाळे,किरण संकपाळ, कुमार पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.यावेळी संस्थेच्या अध्यक्षा रेखा पाटील, प्राचार्य अनमोल पाटील, मुख्या.कोमल पाटील यांच्यासह शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. प्रज्ञा माने यांनी सूत्रसंचालन केले. त्रिशेला दत्तवाडे यांनी आभार मानले.

# भगतसिंग तालीम पथकाने फोडली १.३१ लाखाची दहीहंडी

निपाणी,ता.७(प्रतिनिधी)

**येथील चाटे मार्केटमधील व्यापारी मित्र मंडळातर्फे रविवारी आयोजित दहीहंडी संकेश्वर येथील भगतसिंग तालीम मंडळाच्या गोविंदा पथकाने सहा थर लावीत फोडून १ लाख ३१ हजार रुपयांचे बक्षीस पटकावले.यावेळी उपस्थितांनी एकच जल्लोष केला.**



निपाणीः विजेत्या भगतसिंग तालीम मंडळाच्या गोविंदा पथकास बक्षीस देऊन गौरविताना उत्तम पाटील, विलास गाडीवड्डर, पृथ्वीराज पाटील, दिलीप पठाडे व इतर दुसऱ्या छायचित्रात दहीहंडी फोडताना गोविंदा पथक.

यावेळी बोरगाव येथील राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) चे युवा नेते सहकाररत्न उत्तम पाटील यांच्या हस्ते हे बक्षीस देऊन मंडळाला गौरविण्यात आले.प्रारंभी भुमिपुजन सहकाररत्न उत्तम पाटील, स्टेज पुजन तर फोटो पुजन पृथ्वीराज पाटील यांच्या हस्ते झाले.

यावेळी भगतसिंग तालीम मंडळाच्या पथकाने ३ वेळा सलामी देऊन दहीहंडी फोडण्याचा प्रयत्न केला.चौथ्या प्रयत्नात सहा थर लावीत या मंडळाचे गोविंदा वैभव शिंदे यांनी १.३१ लाखाची दहीहंडी फोडली. यावेळी विजेत्या गोविंदा पथकाला आयोजकांच्या वतीने रोख रक्कम, प्रमाणपत्र व शिल्ड देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमात सर्वांचे मुख्य आकर्षण सर्वात लहान गोविंदा सानवी नाईक हिला मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन सन्मान करण्यात आला.या कार्यक्रमासाठी शुभरत्न केंद्राचे पप्पू मोतीवाला यांचे सहकार्य लाभले.

याप्रसंगी बोलताना उत्तम पाटील यांनी, गेल्या ४० वर्षापासून या मंडळाने दहीहंडी उत्सवाच्या माध्यमातून भारतीय संस्कृती जोपासण्याचे काम केल्याचे सांगितले.यावेळी विलास गाडीवड्डर यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळाचे अध्यक्ष सुजय देसाई-सरकार,उपाध्यक्ष अतुल शिंदे, खजिनदार अल्ताफ हाजुखान, अनिल फुटाणकर, पांडूरंग भोई, विनायक वडे,ओंकार शिंदे, सुनिल शेलार यांच्यासह मंडळाच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. यावेळी निरंजन पाटील (सरकार), दिलीप पठाडे, ज्ञानेश्वर ढेरे, इरफान महात, पिंटू चव्हाण, बापू शिरगावे, इम्रान मकानदार,सुरज राठोड यांच्यासहआजी-माजी नगरसेवक, चाटे मार्केट व्यापारी मित्र मंडळाचे पदाधिकारी,कार्यकर्ते नागरिक, महिला उपस्थित होते.


# संकेश्वर'श्रीमठाचा'महादासोह सोहळा उत्साहात साजरा

संकेश्वर,ता.७(प्रतिनिधी)-

**संकेश्वर जगद्गुरू श्री दुरदुंडीश्वर (शाखा) मठाचा महादासोह सोहळा विविध धार्मिक कार्यक्रमांनी भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला.**

महादासोह कार्यक्रमास निडसोसी मठाचे पंचम डॉ. शिवलिंगेश्वर महास्वामीजी, उत्तराधिकारी निजलिंगेश्वर स्वामीजींचे दिव्य सानिध्य लाभले. श्रीमठात सकाळी जगद्गुरू श्री दुरदुंडीश्वर गद्दगीस महारुद्राभिषेक करण्यात आले.वैरागी वखार येथून गावातील प्रमुख मार्गे पारंपारिक वाद्यांच्या गजरात जगद्गुरू श्री दुरदुंडीश्वर पालखी उत्सव काढण्यात आला.पालखी उत्सवात संकेश्वर वीरशैव लिंगायत समाजाचे अध्यक्ष अप्पासाहेब शिरकोळी, आमदार निखिल कत्ती, प्रकाश कणगली, मलप्पा रवदी, दुंडप्पा हंज्यानट्टी, संतोष काकोळी, माजी नगराध्यक्ष संजय शिरकोळी, अॅड संतोष नेसरी, बसवराज बागलकोटी,किरण नेसरी, हुक्केरी विद्युत संघाचे संचालक गजानन क्वळी,शिवानंद मुडशी, माजी नगरसेवक सुनील पर्वतराव, रोहण नेसरी,प्रदीप माणगांवी,विजय जरळी सह भक्तगण मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

पालखी उत्सव मार्गावर ठिकठिकाणी भक्तगणांनी जगद्गुरु श्री दुरदुंडीश्वर देवदर्शनाचा लाभ घेतला. सुभाष रस्ता नेसरी बंधुंच्या निवासस्थान ते मठा दरम्यान आडवी पालखी सोहळा पार पडला.श्रीमठाजवळ श्री निजलिंगेश्वर स्वामीजींनी ध्वजारोहण करुन प्रसाद पूजन केले. तद्नंतर महाप्रसादाचा लाभ हजारो भक्तगणांनी घेतला.



आयुक्तांना निवेदन देताना दिपक सावंत यांच्यासह इतर मान्यवर.

## निपाणीत उद्यानांसह खुल्या जागेवर पालिकेचे फलक लावण्याची मागणी

निपाणी,ता.७(प्रतिनिधी)-

**नगरपालिकेच्या मालकीची उद्याने व शहरातील इतर खुल्या जागा ताब्यात घेऊन याठिकाणी नगरपालिकेचे फलक लावण्यात यावे यासाठी नागरिकांच्या वतीने आयुक्तांना निवेदन देण्यात आले.**

यावेळी आयुक्त गणपती पाटील यांनी त्वरित मागणीची दखल घेऊन उद्यान ताब्यात घेऊन याठिकाणी नगरपालिकेचे फलक लावण्यात येईल, असे आश्वासन दिले.यावेळी दिपक सावंत, अॅड. संजय चव्हाण, किरण पाटोळे,जावेद कोल्हापुरे,फारुख पटेल,विकी वैष्णव, राजू कोपार्डे, अश्रफ मुल्ला,आशिष भाट,गजानन खापे,नंदकुमार कांबळे,महादेव शिंदे, आप्पा शेटके, लोकेश घस्ते, अनिस बागवान,अमित जाधव यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

पहिल्या पंधरा शब्दास ७५ रू, पुढील प्रत्येक शब्दास ७ रू, शब्द मर्यादा ५० पर्यंत

## * खरेदी विक्री *

**६४ इंची २४ भिडे लूम विकणे आहे.** संपर्क-९५७९६०५६६९

**अर्जंट विकणे-** १ बीएचके फ्लॅट, ३ बीएचके फ्लॅट मॉर्डन हायस्कूलजवळ, कोल्हापूर रोड, इचलकरंजी. फोन-९५२७७७८८६६

**प्लॅटिना १०० नोव्हे. २०२१ मॉडेल** गुडकंडिशन गाडी विकणे आहे. ९७६२९३९९७३

**कबनूर येथे** प्रांत एनए असलेला २० फूट रस्त्यालगत ११०० स्क्वे. फूट प्लॉट विकणे आहे. कबनूर हायस्कूल पाठीमागे, झोळ कारखानालगत. ९९२२८११०५८, ८०८७८०५७९१

**हॉटेल, बँक, पतसंस्था** आणि इतर व्यवसायासाठी आरसीसी दुकानगाळा भाड्याने किंवा विकत देणे. स्टेशन रोड, अजब फर्निचरसमोर संपर्क-९८२२०६१५७५

**जुने सोफासेट** रिपेअरी करून देऊ तसेच नवीन सोफा, पडदे व गादी ऑर्डरीप्रमाणे तयार करून देऊ. संपर्क-८२६१०८९५९०

**जमीन विकणे आहे.** बोरगाव पाचवा मैल मेन रोडलगत ८४ गुंठे शेतजमीन विकणे आहे. प्लॉटिंगसाठी उपयुक्त संपर्क-७५८८४८९८२१, ७५८८४८९८३०

**अर्जंट २ बीएचके** रो हाऊस विकणे आहे. फूल फर्निचरसह २४ तास पाणी, कार पार्किंग सनसिटीमध्ये यड्राव फाटा, सोसायटी फर्निचरमागे, मो.८९९९९५७३४३

**महासत्ता चौक पॅराडाईज कॉलनी** येथे ऑफिस व १ बीएचके, २ बीएचके फ्लॅट उपलब्ध आकर्षक दर व ॲमिनिटीज. संपर्क-९३२५८३०५९२

**फ्लॅट विकणे** १ बीएचके सांगली नाका, अभय डेअरीसमोर, वेदूता रेसिडेन्सी, बी-विंग, इचलकरंजी, सागर जोशी, मो. ८८५६९३६७३१.

**जुने व नवीन पॉवरलूम** घेवू व देवू तसेच फवारा, कांडीमशीन डक्टींग व रिकामे बिमे देवू व घेवू. ८३१७२९१००८

**२ बीएचके फ्लॅट** रेडी पजेशन विक्रीसाठी उपलब्ध. २४ तास पाणी, लिफ्ट कर्जाची सोय. स्वामी समर्थ प्लाझा, जवाहरनगर, इचलकरंजी. ९८९०११६१६१

## * शैक्षणिक *

**Physics, Chemistry,** Maths, Biology (11th, 12th CET, NEET, JEE, Board) Home Tution available. Contact-7057980980

**स्माईल वर्ल्ड** एज्युकेशन तर्फे ॲब्याकस व वैदिक गणित मोफत वर्कशॉप व १ महिना ब्लाऊज मेकिंग क्लासेस मोफत. नाव नोंदणी सुरू इचलकरंजी व हुपरी. मो. ८६६८६०५६१५.

## * आरोग्य विषयक *

**मुळव्याध, कंबरदुखी, गुडघेदुखी, वाई, वात** कफ, पित्त, दमा, धाप इ. विकारावर १००% गुणकारी आयुर्वेदिक औषध मिळेल. सकाळी १० ते ५. संपर्क-७७६९९७११७१

## * बोअरवेल *

**चौगुले बोअरवेल्स जयसिंगपूर** घरासाठी ४।।। इंची व शेतीसाठी ६।। इंची बोअर मारून मिळेल. मो. ९९६०१०५४२१.

## * व्यवसाय *

**एक्स्ट्रा इन्कम-** मिळवण्याची सुवर्णसंधी. आपली नोकरी व व्यवसाय करून तुमच्या वेळेनुसार २ तास काम करून एक्स्ट्रा इन्कम मिळवू शकता? वय, शिक्षण व अनुभवाची अट नाही. संधी सर्वांसाठी संपर्क-योग शिक्षक-नंदकुमार सर-९८५०६१५४२१

## * नोकरी विषयक *

**भांडी दुकानात** कामासाठी होतकरू लेडीज/जेन्टस् कामगार पाहिजेत. आकर्षक पगार, तुलसी स्टील, आझाद टॉकीज जवळ, झेंडा चौक, ९४२३२४९७१७, सुनिल वणकुद्रे

**मुले पाहिजेत.** एअरजेट कारखान्यातील कापूस काढणेसाठी मुले पाहिजेत. वेळ-९ ते १ व ४ ते ६. पगार-१५०००/- वय- ३० पर्यंत. संपर्क-९१६८००५७१८

**मोफत कॉम्प्युटर प्रशिक्षण** योजने अंतर्गत ५० बॅचेसना प्रवेश सुरू १०० % नोकरी व व्यवसायाभिमुख प्रशिक्षण. Graphic Design, Ms-Office, Tally Prime, Advance Excel कोर्सेसना प्रशिक्षण. नाममात्र नोंदणी फी. युनिव्हर्स कॉम्प्युटर. पत्ता-इचलकरंजी बस स्टॅन्डजवळ, बँक ऑफ महाराष्ट्रसमोर, इचलकरंजी. - संपर्क- ९२८४२६४९८०

**टू व्हीलर शोरूमकरीता** सर्व्हिसिंग कामगार साफसफाई कामगार पाहिजेत. अर्जासह भेटा. ओम मोटर्स, शाहू पुतळ्याजवळ, इचलकरंजी.

**सेल्स एक्झीक्युटिव्ह पाहिजे.** किमान बारावी पास, उत्तम संभाषण कौशल्य असलेले फ्रेशर अथवा अनुभवी लेडीज अथवा जेंटस सेल्स एक्झीक्युटिव्ह पाहिजे. फॅशन डिझायनिंग झालेल्यांना प्राधान्य. ९४२११०५४४४

**ॲमेझॉन कंपनीमध्ये** पार्सल डिलेव्हरी करण्यासाठी त्वरीत मुले पाहिजेत. टू व्हीलर, ड्रायव्हिंग लायसन व ५ जी. मोबाईल आवश्यक. राजेंद्र सर-९०९६१०४४४२

**सिक्युरिटी गार्ड भरती-** इचलकरंजी, तारदाळ, शहापूर, खोतवाडी, यड्राव, कोंडिग्रे, चिपरी, जयसिंगपूर, नांदणी, हरोली, जांभळी, आकर्षक पगार. संपर्क-७०२०१९७९८०, ८२०८५१९९८८

**DTDC** कुरिअरमध्ये ऑफिससाठी स्टाफ भरती सुरू. ऑफिसबॉय. संपर्क-९७३०६८६२५३, ७०३००२११०८

**कामगार पाहिजेत.** पॅकिंगसाठी ४ महिला व भरणी उतरणीसाठी २ हमालांची आवश्यकता आहे. अर्जंट संपर्क-सरस्वती ट्रेडर्स. सरस्वती मार्केट, जुन्या नगरपालिकेजवळ, इचलकरंजी.

**रंगाचे दुकानात** कामगार व अकौटंट पाहिजे, अजय पेंटस, कल्पना टॉकीज, इचलकरंजी. ९४०४७१२५६०, ८००७००३२४३

**रंगाचे दुकानात** कामासाठी कामगार पाहिजेत. गरजूंना प्राधान्य. संपर्क- नवभारत पेंटस, बंगला रोड, इचलकरंजी. फोन-९८२३१८१४४८

**ऑफिस कामासाठी** लेडीज/मुलगी पाहिजे. कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक. पत्ता-एपीएस वेअर हाऊस, थोरात चौक, इचलकरंजी. ९६०७३३५७७७, ७८७५६९९९२४

**ऑफिस स्टाफ पाहिजे.** कॉम्प्युटर अकौटींग, एक्सेलचे ज्ञान असणारा, संपर्क-९८२३३५३३३२

**आईस्क्रीम पार्लरमध्ये** कामगार पाहिजे. वेळ- सकाळी १० ते ६ व दुपारी ४ ते ११.३० डेक्कन रोड, इचलकरंजी. संपर्क-९७६६०११३०३

**शोरूम कामासाठी** जेंटस व लेडीज पाहिजेत. (पॅकिंग व लफ्टींगसाठी) जेपी संघवी. सुंदर बागेजवळ. ९४२२४१४३८५, ८८८८८८८२४८

**किंग्स कॅच इचलकरंजी येथे** फिश कटर (अनुभवी) बिलींग काऊंटरसाठी महिला कर्मचारी व हेल्पर पाहिजेत. आकर्षक पगार, त्वरीत काम. संपर्क-९१४६०४१३६५

**ऑफिस क्लार्क कम अकौंटंट पाहिजे.** शिक्षण- बी.एस्सी/बी.कॉम, वय-२० ते ३० थोरात चौक, इचलकरंजी. ९८२३०२६७३७

**हॉटेल नंदादीप परमिट** रूम बिअर बारमध्ये अनुभवी वेटर पाहिजे. पार्टटाईम चालेल. आकर्षक पगार. संपर्क-९९२१८१४८१४

**अकौंटींग टॅली प्राईममध्ये** अनुभवी स्टाफ पाहिजे. विवाहीत लेडीजना प्राधान्य. संपर्क-८०१०२२२८२५

### पाहिजेत

कार्यालयीन कामकाजासाठी मराठी व इंग्लिश टायपिंगचा अनुभव असलेले क्लार्क-२, ऑफिसबॉय (शिपाई) २ व निव्यर्सनी ४० वयाच्या आतील ड्रायव्हर-२ नेमणेचे आहे

त्वरीत संपर्क साधा

**9371607123**

**जेंटस कामगार पाहिजे.** बेसिक १३ हजार पगार+इन्सेंटीव्ह. संपर्क-९६०४०००८४५

**कपड्याच्या शोरूममध्ये** फूल टाईम कॅशियर पाहिजे. बेसीक कॉम्प्युटर येणे आवश्यक. पत्ता- जुन्या नगरपालिकेसमोर, इचलकरंजी. ८६६८९४५३५५

**कामगार पाहिजेत.** वाईनशॉप मध्ये कामगार पाहिजेत. संपर्क- सम्राट वाईन्स, रिक्रेशन हॉलजवळ, इचलकरंजी. ९१७५८९८५८६

**पाहिजेत.** वे ब्रिज (वजन काटा) लक्ष्मी इंडस्ट्रियल इस्टेट येथे जेंटस अथवा लेडीज ऑपरेटर पाहिजे. फॅमिलीसहीत राहणेची सोय. संपर्क-९८९०९७८०९०

**एअरजेट लूम वर्कशॉपमध्ये** रिपेअरी कामासाठी लेथ मशिन ऑपरेटर व हेल्पर पाहिजेत. संपर्क-९२८४८०१९१९, खोतवाडी

**पिटर इंग्लंड रेडिमेड शोरूममध्ये** मुले/मुली पाहिजेत. वेळ- ६ ते १०, पगार-४०००, वेळ-सकाळी १० ते सायं. ६, पगार-८०००, भेटा- व्यंकटराव हायस्कूल रोड, युनियन बँकेसमोर, इचल.

**प्रिंट शॉपमध्ये** अनुभवी/शिकाऊ (अविवाहीत मुलगी) कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे. संपर्क-व्यंकटेश-९८९०८६१९२९

**व्हीआय मध्ये** सिमकार्ड विक्रीसाठी मुले/मुली पाहिजेत. आकर्षक पगार, पीएफ+ईएसआयसी सुविधा. संपर्क-८५३०७६६४२९

**टेलरिंग कामगार पाहिजेत.** पॅन्टमेकर, शर्टमेकर किंवा ऑल राऊंडर पाहिजेत. संपर्क-७७४१०१७११७

**लेडीज कॉम्प्युटर ऑपरेटर** व टेलिफोन ऑपरेटर पाहिजे. संपर्क-९६०४०००८४५

**हॉस्पिटल कामासाठी** अनुभवी किंवा सर्टिफिकेट असलेले डे/नाईटसाठी एएनएम/जीएनएम स्टाफ पाहिजे. संपर्क-९८८१८११९३३, इचलकरंजी.

**भारतातील नामांकित ज्वेलरी** राजेश सिल्वर या मॅन्युफॅक्चरींग कंपनीमध्ये जेवण करण्याकरीता गरजू कायमस्वरूपी जोडपे पाहिजे. आकर्षक पगार, जोडपे शाकाहारी पाहिजे. राहण्याची व जेवणाची सोय, दररोज चहा, नाष्टा, जेवण (२०० माणसे) संपर्क-७५०७३०८७८७, पत्ता- महावीर नगर, बँक ऑफ इंडियाजवळ, हुपरी

**नर्स/कंपौंडर पाहिजेत.** भेटा-मानस क्लिनिक ॲन्ड नर्सिंग होम, कागवाडे मळा, अग्रसेन भवनसमोर, विकली मार्केटच्या मागे, इचलकरंजी.फोन-(०२३०) २४३००१५

**कामगार पाहिजेत.** टू व्हीलर गाड्यांच्या शोरूमकरीता वॉशिंगसाठी व ऑफिसबॉयसाठी कामगार पाहिजेत. संपर्क- बोरगावे टीव्हीएस, शाहू पुतळ्याजवळ, इचलकरंजी.

**सेल्स एक्झीक्युटिव्ह पाहिजेत.** टू व्हीलर गाड्यांच्या शोरूमकरीता सेल्स एक्झीकुटिव्ह पाहिजेत. संपर्क- बोरगावे टीव्हीएस, शाहू पुतळ्याजवळ, इचलकरंजी.

**पाहिजेत.** श्री ग्राफिक्समध्ये एअर फायबर इन्स्टॉलेशन व सेल्समन कामासाठी मुले पाहिजेत. पगार-१०००० पासून पुढे. संपर्क-९६०७०७४५७५, ७६२०१५४९०१

**पाहिजेत.** वेल्डर-४, हेल्पर-४, आकर्षक पगार, दिवसा ८ तास काम, हॉलमार्क हॉस्पिटल फर्निचर, शहापूर रोड, सावली सोसायटी, इचल. ९९२२१४२०४०, ९४२३२७५२३२

**सेल्स एक्झीक्युटिव्ह पाहिजे.** अनुभवी, आकर्षक पगार+कमिशन हॉस्पिटल व मेडिकलचे फर्निचर विक्रीसाठी, हॉलमार्क हॉस्पिटल फर्निचर, शहापूर रोड, सावली सोसायटी, इचल. ९९२२१४२०४०, ९४२३२७५२३२

**कामगार पाहिजे.** साडी दुकानामध्ये काम करणेसाठी अनुभवी कामगार पाहिजे. आकर्षक पगार, चौकशी-वैशाली कापड केंद्र, मेन रोड, हॉटेल कुबेरशेजारी, इचलकरंजी. मो. ९८२२२५६६६६

**पाहिजेत.** बझार व गॅस एजन्सीकरीता भरती सुरू, मॅनेजर, कॉम्प्युटर ऑपरेटर, कॅशियर, फ्लोअर स्टाफ, डिलीव्हरी बॉय पार्टटाईम/फूलटाईम अनुभवींना प्राधान्य संपर्क-९०११००८५५५, ९३५६३३३३१०

**पेट्रोल पंपावर** कामगार पाहिजे. संपर्क-९३५६६७०७४६

**पाहिजेत.** आईस्क्रीम व्यवसायासाठी बिलींगसाठी (टॅली) आवश्यक तसेच डिलेव्हरीसाठी ड्रायव्हर कम डिलेव्हरी बॉय पाहिजे. वयोमर्यादा ३५ पर्यंत. हिरो शोरूमजवळ, यड्रावफाटा इचलकरंजी. फोन-७०५८५३५८५३

**ड्रायव्हर पाहिजे.** आयशर गाडीवर हेवी लायसन्सधारक (Trans) अनुभवी व हुशार ड्रायव्हर पाहिजे. मो. ९०२८३६७६८३

**अर्जंट हवेत-**सेल्सपर्सन-२, कॉम्प्युटर ऑपरेटर-२ जागा सुशिक्षित पात्रता बी.कॉम/१२ वी पास, कॉम्प्युटरचे सखोल ज्ञान, संवाद कौशल्य असणे आवश्यक. आकर्षक पगार. संपर्क- श्री जिनेंद्र ज्वेलर्स, रूणवाल टॉवर, इचलकरंजी. ९४२१२०३९५१

**ऑफिस कामासाठी** दिवाणजी पाहिजे. ७०६६८५७३४०

**नामांकित ज्युस दुकानात** सायंकाळी ६ ते ११ कामगार पाहिजेत. मुले/मुली. पत्ता- द ज्युस फार्म सुंदरबाग, इचलकरंजी. फोन-८२०८३८६५७६

**अनबॉक्स मोबाईल प्रिमियम** मोबाईल शॉपमध्ये मोबाईल आणि ॲक्सेसरीज सेलसाठी मुले/मुली पाहिजेत. पगार-९००० ते २००००. संपर्क-८७९६१७१११११, ९५९५२८७२४२

**ड्रायव्हर पाहिजे.** मिनरल वॉटर बॉटल फॅक्टरीमध्ये मार्केटिंगचा अनुभव असलेला ड्रायव्हर पाहिजे. आकर्षक पगार. संपर्क-कोहिनूर इंडस्ट्रिज, इचलकरंजी. ९०२८४४५५६०, ८६२३०६४४५५

**दुध डेअरी येथे** कामासाठी जेंटस हेल्पर पाहिजे. ओंकार दुध डेअरी, सांगली नाका, सोलगे मळा, इचलकरंजी. ९३२६०२२९१०

**सोशल मिडीया ॲडव्हर्टायझिंगसाठी** स्टाफ पाहिजे. रिल बनवता येणे आवश्यक. संपर्क-७३८७८८५०७३

**ड्रायव्हर, वायरमन व हेल्पर** पाहिजेत. संपर्क-तुषार इलेक्ट्रीकल्स, इचलकरंजी. ७०२०१५१४५५, ९५७९५५८५०९

**कार ड्रायव्हिंगसाठी** एक व्यक्ती पाहिजे. ७०६६८५७३४०

**ऑफिस कामासाठी** मुलगी/महिला पाहिजे. संभाषण कौशल्य आवश्यक. संपर्क-वर्धमान चौक, इचलकरंजी. फोन-८१७७८४१४७७, ९२७०२०५६९०

**पाहिजेत.** अकौटंट टॅलीचे ज्ञान आवश्यक, ट्रक ड्रायव्हर-संपर्क-एम.आर. पॉलिमर्स, बोरगाव. ६३६४१२८६५०

**हार्डवेअर दुकानात** अनुभवी/शिकाऊ कामगार व दिवाणजी पाहिजे. उमिया हार्डवेअर, वखारभाग, इचलकरंजी. ८४११०३५४११

**पाहिजेत.** आण्णाज फॅशन शॉपमध्ये कबनूर शाखेसाठी अकौटंट व नदीवेस नाक्यासाठी सेल्समन पाहिजेत. (पगार-७ ते १० हजार) लेडीज/जेंटस. संपर्क-९५६१७१४२६२

**पाहिजेत.** प्लांट इनचार्ज-२, बीएससी फूड, एमएससी फूड बेकरी कामाचा अनुभवी. बिलींग करिता-२, पदवीधर, टॅली आवश्यक, अनुभवी स्टोअर इनचार्ज-२, पदवीधर, स्टोअर कामाचा १ वर्ष अनुभवी, बस ड्रायव्हर-२. लायसन आवश्यक अनुभवी. फोन-९७६६२५६६५५

**डिलेव्हरीसाठी व कौंटरवर** सेल्ससाठी मुलगा पाहिजे. संपर्क-९४२२४२२९०९

**रिशेप्सनिस्ट पाहिजे.** कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक, समक्ष भेटा, पाटील आर्थोपेडिक हॉस्पिटल, चांदणी चौक, श्रीपाद नगर, इचलकरंजी.

**पावडर कोटींग कंपनीमध्ये** काम करणेसाठी होतकरू मुले पाहिजेत व अकौंटींगसाठी मुलगा पाहिजे. संपर्क-९६५७००७८६९७

**इचलकरंजी येथील** मध्यवर्ती पेट्रोल पंपासाठी कामगार पाहिजेत. ड्युटी दु. ३ ते रात्री ११, ८ तास, कॉलेज करणाऱ्या मुलांना सुवर्णसंधी. संपर्क-९९२१०२३०६८

**ड्रायव्हर पाहिजे.** छोटा हत्ती मालवाहतुक गाडीवर लायसन्सधारक (एलएमव्ही-टीआर) अनुभवी व हुशार. संपर्क-९८९०२२०९४३, ७५१७५०६६८२

**ॲमेझॉन कंपनीमध्ये** डिलेव्हरी बॉय पाहिजेत. पुणे एरिया राहण्याची व जेवणाची सोय आहे. पगार २५०००/-. संपर्क-९१४५३२७७६३, ८४८३९९१३२९.

**डॉमिनोज पिझ्झामध्ये** पिझ्झा डिलेव्हरीसाठी मुले/मुली पाहिजेत. डॉमिनोज पिझ्झा इचलकरंजी पेट्रोल आणि बाईक कंपनीकडून. संपर्क-८६२३०३६०२१

**फ्लिपकार्डमध्ये** इचलकरंजी आणि जवळपास भागात पार्सल डिलेव्हरीसाठी मुले/मुली पाहिजेत. संपर्क-९५६१८९०२४८, ९९६०४९१५८७

**Require-** Client co-ordinator, Married Female with experience of 5-6 years in custemer relation-ship with clear Communication skills in Hindi, English and Marathi. Contact-9823531183

**इचलकरंजी व कोल्हापूर येथे** अनुभवी सेल्समन पाहिजेत. आकर्षक पगार, फंड, इ.एस.आय लागू. संपर्क वेळ- सकाळी १० ते ८. संपर्क- ९२२६८८१४७०

**कोरोची येथे** गारमेंटमध्ये हेल्पर कामासाठी शिकाऊ मुलगा पाहिजे. पार्टटाईम, वेळ-१ ते ७ पर्यंत. ९६९९४३८४५८

**मेडिकल स्टोरसाठी** फार्मासिस्ट पाहिजे. राजवाडा, झेंडा चौक, इचलकरंजी. मो. ९९३९१९०९०९, ९६२३७३२१२०

**मानधना सिंथेटिक्स** प्रा. लि. पार्वती को-ऑप इंडस्ट्रियल इस्टेट यड्राव येथे ऑफिस कामाकरिता मुलगा पाहिजे. टॅली ईआरपी-९, वर्ल्ड एक्सेल येणे आवश्यक. संपर्क-९४२३८५६३७१

**पाहिजेत.** सुखमंगल इंडस्ट्रिज या नामांकित कंपनीमध्ये पुढील पदे भरणे आहेत. १) मोल्डींग व मेल्टिंग सुपरवायझर-२. २) लॅब इनचार्ज-१ ३) लॅब असिस्टंट-२ ४) पॅटर्न मेकर-१ ५) क्वॉलिटी इनचार्ज-१ ६) मेंटनन्स हेल्पर-२ संपर्क-९५६१८९५२६२, ९६२३४३१५४७

**कापड दुकानात** कामासाठी अनुभवी व हुशार सेल्सगर्ल पाहिजे. संपर्क-९७६७३७४५१६

**बिल्डींग मटेरियल सप्लाय शोरूममध्ये** जेंटस कामगार व लेडीज कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे. संपर्क-९५०४१११७१, शहापूर.

**Senior Staff Required-** to CA Firm for taxation, Audit Finance, Qualification CA/ CA Final MBA/M.Com/B.Com Address-Chougale and Associates Chartered Accountants, Ichalkaranji. Mob. 9423858214, E-Mail ID-chougaleassociate@gmail.com

**ऑफिस वर्क** व अकौंटींग कामासाठी लेडीज पाहिजे. अनुभव १ वर्ष. लोकल मार्ट जवळ, सांगली नाका,इचलकरंजी. मो. ९६३७३४२९१३.

**संजीवनी वायरनेटींग** इंडस्ट्रीजमध्ये साधेलूम चालवणारे कामगार पाहिजेत. कोरोची दररोज फक्त दिवसपाळी पगार १० हजार ते १२ हजार महिना. संपर्क - ७६२०७५५७७१.

**पाहिजेत इचलकरंजी** शहर परिसरात पार्ट टाईम शैक्षणिक कामासाठी कौन्सिलर नेमणे आहेत. मो. ८०८७६९१०२३.

**चिपींग ग्रायंडिंग** व हेल्पर कामासाठी कामगार पाहिजेत. मो. ९४२२८३८०००, ९४२२८३७०००.

**अनुभवी गार्ड** पाहिजेत. एमआयडीसी हातकणंगले. ड्युटी ८ तास १४०००+दरमहा. संपर्क ८८०६३२२४२४, ९८३४११९५४५.

## * भाड्याने देणे घेणे *

**बंगला भाड्याने देणे आहे.** २ बीएचके सर्वसोयीनियुक्त चिंतामणी गणेश मंदिराजवळ, लोकमान्य नगर, कोरोची. संपर्क-९६५७९५७८७३

**भाड्याने देणे.** आरसीसी २ बीएचके घर सर्वसोयीनियुक्त बँक, शिक्षक परिवार, शिक्षक कॉलनी, आमराई, इचलकरंजी. फोन-९९२२४९८६८४

**भाड्याने देणे.** २ बीएचके सर्वसोयीनियुक्त पार्किंगसह लिफ्टची सोय, ४ था मजला, अलायन्स हॉस्पिटलजवळ, इचलकरंजी (शाकाहारी) फोन-९८५००२१३१०

**शाहू कॉर्नर मुसळे बिल्डींगमधील** २२५ स्क्वे. फूटाचे २ दुकानगाळे, पतसंस्था, ऑफिस दुकानाकरीता भाड्याने देणे. मो. ९४२२०४४९१४, ९१७५८३३९३९

**गाळा भाड्याने देणे.** एएससी कॉलेज पेट्रोल पंपाशेजारी, ज्योती ऑटो स्पेअर्सजवळ ९ बाय २७. संपर्क-८०८७२६२०८६, ८१४९१४५३८०, इचलकरंजी.

**२७ बाय ६५ ची रिकामी शेड** भाड्याने देणे आहे. जय सांगली नाका, इचलकरंजी. फोन-९७६६६०६७१३

**भाड्याने देणे.** ८ बाय १० फूट गाळा भाड्याने देणे. तसेच ६० बाय ७० फूट रिकामा प्लॉट भाड्याने देणे. फोन-८८५५८४६१६२

**दुकानगाळा भाड्याने देणे.** १२ बाय १५ आरसीसी पोटमाळ्यासह, जुना चंदूर रोड, अष्टविनायक रेसिडेन्सीसमोर, इचलकरंजी. फोन-९८५०६२१००४, ९९२२२११००६.

**गाळा भाड्याने देणे आहे.** १० बाय ३० भाग्यरेखा टॉकीज शेजारी एस.एस. मोबाईलसमोर, कोल्हापूर रोडटच, इचलकरंजी. ९९७५९०३७९३

**सर्व सोयीनियुक्त आरसीसी** २ रूम किचन भाड्याने देणे आहे. तांबेमाळ शाळेसमोर, इचलकरंजी. संपर्क-९३०७०५५५९१

**आरसीसी ३ रूम** सर्वसोयीनियुक्त भाड्याने देणे. कोळी डॉक्टर दवाखानाजवळ, दगडी पाण्याच्या टाकीशेजारी, कबनूर, इंदिरा कॉलनी. ९२७०७४५६१२

**रूणवाल टॉवर** पहिला मजला १४०० स्क्वे. फूट हॉल विकणे/भाड्याने देणे आहे. ९८२२०५६५०१, ९४०३१३६६६९

**३९००० स्क्वे. फूट** इंडस्ट्रियल एनए जागेमध्ये १०००० स्क्वे. फूट शेड ३० फूट उंची, २०० एचपी लाईट कनेक्शन भाड्याने/भागीदारीने देणे आहे. संपर्क-९८२२०५६५०१, ९४०३१३६६६९

**भाड्याने देणे** १००० स्क्वे.फुटांचे ऑफीस काचेचे, वेल फर्निश्डसह सर्व सोईनीयुक्त, डॉ. बडे शेजारी, जवाहरनगर, इचलकरंजी. मो. ७०५७८५१००८.

**फॅशन डिझायनर** किंवा लेडीज ब्युटी पार्लरसाठी गाळा भाड्याने देणे. १३ बाय २५, आरसीसी, जवाहरनगर, इचलकरंजी. फोन-८६२५०३१८५७

**दुकानगाळा भाड्याने देणे.** शरद कॉलेजजवळ सुवर्णमनी कॉम्प्लेक्स गाळा नं.९ १२ बाय १४. संपर्क-९६६५१९९३१४

**शेड भाड्याने देणे.** आरसीसी २८ बाय ६० चे शेड सर्वसोयीनियुक्त २० एचपी लाईटसह तारदाळ, संपर्क-९५५२९१६८६५, ८८०५९१६८६५

**भाड्याने देणे.** ११०० स्क्वे. फूट कमर्शियल ३ बीएचके चे २ फ्लॅट सर्वसोयीनियुक्त बोअरसह कागवाडे मळा, इचलकरंजी. फोन-९९६०९९२९२६, ९८५०१८१८६८

**भाड्याने देणे** चालू कंडीशनमध्ये २३० सेंमी सुडोकामाचे १८ एअरजेट लुम शेडसह भाड्याने देणे आहे. मो. ८६६८४०५०४१.

**भाड्याने देणे.** ४००० स्क्वे. फूटाचा हॉल ४००० स्क्वे. फूटाचा बेसमेंटसह ऑफिस व सर्व सोयीनियुक्त भाड्याने देणे. पत्ता-वृंदावन कॉलनी, सोनाई हॉस्पिटलच्या बाजूस, इचलकरंजी. फोन-९५७९२१३०१६, ७०३८८६०१७८

## * कर्ज विषयक *

**सरकारी ३५%** अनुदानित कर्ज, नवीन व जुन्या उद्योगाकरीता थोरात सर ९६६५४०८८२८ व्यवसायविषयक मार्गदर्शक एमसिईडी (MCED) / मिटकॉन. कोल्हापूर/सांगली जिल्हा.

छोटी जाहिरात मोठा प्रतिसाद



### वाचकांसाठी निवेदन

**दै.महासत्ता** वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होणाऱ्या खरेदी-विक्री, नोकरीविषयक, भाड्याने देणे-घेणे, कर्ज, गुंतवणूक, व्यवसाय, आरोग्य विषयक व इतर सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहीरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. प्रत्येक जाहीरातीच्या आशयाची सखोल शहानिशा करणे शक्य नसल्यामुळे यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत **दै.महासत्ता** व्यवस्थापन हमी घेऊ शकत नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पुर्ततेसंदर्भात कोणतीही जबाबदारी **दै.महासत्ता** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक अथवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. **व्यवस्थापक**


# ध्वनी प्रदूषणाचे उल्लंघन दोघांवर गुन्हा दाखल

**सरूड,ता.७ (प्रतिनिधी)**

**सार्वजनिक ठिकाणी विनापरवाना आणि कर्णकर्कश आवाजात डॉल्बी सिस्टीम लावून ध्वनी प्रदूषणाचे नियम धाब्यावर बसवणाऱ्या दोघांवर शाहूवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई सोमवारी करण्यात आली.**

बांबवडे ते कोल्हापूर रोडवर असलेल्या गुरुकृपा ऑटोमोबाईल्स जवळील बी.जे. आयवेअर या दुकानासमोर संशयीतांनी सार्वजनिक ठिकाणी सामान्य लोकांना त्रास होईल अशा पद्धतीने आणि रदारीस अडथळा निर्माण करून अत्यंत मोठ्या आवाजात डॉल्बी सिस्टीम लावली होती. पोलिसांच्या परवानगीशिवाय हे कृत्य करून ध्वनी प्रदूषणाच्या नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी शाहूवाडी पोलिसांनी तत्काळ ही कारवाई केली. संकेत बाजीराव माने (रा. राक्षी, ता. पन्हाळा), तानाजी पांडुरंग सुतार (रा. ॲलवाडी, ता. शाहूवाडी )अशी गुन्हा दाखल झालेल्या संशयीतांची नावे आहेत.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक संभाजी पाटील करत आहेत. सार्वजनिक शांतता भंग करणाऱ्यांवर आणि विनापरवाना डॉल्बी वाजवणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल, असा इशारा पोलिसांकडून देण्यात आला आहे.

# रेड गावच्या हद्दीत बिबट्याचा वावर

## वनविभागाकडून बंदोबस्ताची मागणी

**शिराळा,ता.७(प्रतिनिधी)**

**शिराळा तालुक्यातील रेड गावच्या हद्दीत बिबट्याचा वावर वाढला असून, निकम वस्ती व जाधव वस्ती परिसरात दररोज रात्री सात ते नऊच्या सुमारास बिबट्याचे दर्शन होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.**

या परिसरात रात्रीच्या वेळी बिबट्याचा वावर असल्याने शेतकरी जीव मुठीत धरून शेताकडे जात आहेत. त्यातच रात्रीच्या वेळी सुमारे पाच तास वीजपुरवठा खंडित होत असल्याने परिसरात अंधाराचे साम्राज्य निर्माण होते. या अंधाराचा फायदा बिबट्या घेत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

दरम्यान, वनविभागाने या परिसरात तातडीने पाहणी करून बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी रेड गावातील शेतकऱ्यांनी केली आहे. वनविभागाने याकडे दुर्लक्ष केल्यास भविष्यात बिबट्याकडून शेतकऱ्यावर हल्ला होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे वनविभागाने तातडीने उपाययोजना करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी होत आहे.

# संजयनगरात चार नशेखोरांवर कारवाई

**सांगली,ता.७( प्रतिनिधी)-**

**संजयनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गांजाची नशा आणि मद्यपान करणाऱ्या चार संशयितांवर पोलीसांनी गुन्हा दाखल केला. आयन मुबारक पटेकर (वय १९), प्रणिल अनिल जाधव (१९ दोघेही रा. सहारा चौक, सांगली), अभिषेक संजय बामणे (३१, रा. वारणाली, सांगली) आणि रामलिंग लछराम रजपूत (२९, रा. झेडपी कॉलनी, वारणाली) अशी संशयितांची नावे आहेत.**

नशामुक्त अभियानांतर्गत पोलिसांच्यावतीने मोहिम राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत ही कारवाई करण्यात आली. ज्युबली कारखान्यानजीक असणाऱ्या सटाले मळा येथील मोकळ्या जागेत गांजा ओढत असताना दोघे संशयित आढळून आले. तसेच सेंट्रल स्कूलच्या पाठीमागे असलेल्या आडोशाला दोघेजण मद्यपान करत बसले असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.

# कसबा बावडा आरोग्य केंद्राला राष्ट्रीय गुणवत्ता प्रमाणपत्र

**कोल्हापूर, ता. ७ (प्रतिनिधी):**

**शहरातील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे व रुग्णालयांमधील आरोग्यसेवेची गुणवत्ता अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने शासनामार्फत राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम राबविण्यात येत आहे.**

या कार्यक्रमांतर्गत कोल्हापूर महानगरपालिकेच्या कसबा बावडा येथील प्राथमिक नागरी आरोग्य केंद्र क्र.५ ने राष्ट्रीय स्तरावरील मूल्यांकनात ९०.१८ टक्के गुण मिळवत राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन प्रमाणपत्र प्राप्त केले आहे. कोल्हापूर परिमंडळातील नागरी आरोग्य केंद्र प्रकारातील राष्ट्रीय प्रमाणपत्र मिळविणारे हे दुसरे केंद्र ठरले आहे.

या यशासाठी आयुक्त डॉ. राजेंद्र भारुड यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त किरणकुमार धनवाडे, आरोग्याधिकारी डॉ. प्रकाश पावरा, डॉ.अमोलकुमार माने, डॉ. विद्या काळे,अमोल महाडिक, प्रताप पाटील, डॉ. संदीप पाटील, श्रीमती नेहा भोई, आरसीएच कार्यालयातील सर्व कर्मचारी तसेच डॉ. पुलकीत खंबायते त्यांच्या समन्वयातून केंद्राने हे उल्लेखनीय यश संपादन केले.

# आठ वर्षांनंतर पशुधनाला विम्याचे कवच

## आम. सत्यजित देशमुख यांच्या पाठपुराव्याला यश

**शिराळा,ता.७(प्रतिनिधी)**

**गेल्या आठ वर्षांपासून बंद असलेली पशुधन विमा योजना पुन्हा सुरू करण्यासाठी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून, राज्य शासनाने राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत पशुधन विमा योजना पुन्हा सुरू केली आहे, अशी माहिती आमदार सत्यजित देशमुख यांनी दिली.**

पूर, वीज कोसळणे, अपघात किंवा आजारपणामुळे मौल्यवान जनावराचा मृत्यू झाल्यास पशुपालक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होते. सन २०१८ मध्ये पशुधन विमा योजना बंद झाल्याने शेतकऱ्यांना या नुकसानीचा मोठा फटका सहन करावा लागत होता. ही बाब लक्षात घेऊन योजना पुन्हा सुरू करण्यासाठी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केल्याचे आमदार देशमुख यांनी सांगितले.नव्याने सुरू करण्यात आलेल्या योजनेत शेतकऱ्याला विमा हप्त्याच्या केवळ १५ टक्के रक्कम भरावी लागणार असून, उर्वरित ८५ टक्के रक्कम शासन अनुदान म्हणून भरणार आहे. त्यामुळे अत्यल्प खर्चात पशुधनाला विमा संरक्षण मिळणार आहे. योजनेअंतर्गत दुधाळ गाय व बैलासाठी ७० हजार रुपये, दुधाळ म्हैस व रेड्यासाठी ८० हजार रुपये, तर शेळी व मेंढीसाठी ७ हजार रुपयांपर्यंत विमा संरक्षण मिळणार आहे.

# मलकापूर नगरपरिषदेला अखेर मैला सक्शन वाहन प्राप्त

**मलकापूर ता. ७ (प्रतिनिधी)**

**केंद्र पुरस्कृत स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत शहर स्वच्छता कृती आराखड्यानुसार मलकापूर नगरपरिषदेला ३ हजार लिटर क्षमतेचे मैला सक्शन वाहन प्राप्त झाले.**

सुमारे चार वर्षांपासून प्रलंबित असलेले हे वाहन नगराध्यक्षा रश्मी कोठावळे, उपनगराध्यक्ष दिलीप पाटील तसेच सर्व नगरसेवक व नगरसेविकांच्या पाठपुराव्यामुळे उपलब्ध झाले आहे. या वाहनाच्या माध्यमातून नागरिकांच्या घरगुती मैला टाक्या व सेप्टिक टँक उपसा करण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. नागरिकांनी या सुविधेचा लाभ घेण्यासाठी मलकापूर नगरपरिषदेशी संपर्क साधावा, असे आवाहन नगरपरिषद प्रशासन तसेच मुख्याधिकारी अंगाई साळुंखे यांनी केले आहे.

# निपाणीत दोन टॉप, दोन बेसला परवानगी

## बंदोबस्त अथवा विद्युत पुरवठ्यात हलगर्जीपणा चालणार नाही : आम.जोल्ले

निपाणी,ता.७(प्रतिनिधी)–

**निपाणी तालुक्यातील गणेश मंडळांना परवानगीसाठी एक खिडकी योजनेतून परवानगी आणि साऊंड सिस्टीमसाठी दोन बेस, दोन टॉप वापरण्यास परवानगी देण्याचा निर्णय निपाणी नगरपालिका सभागृहात झालेल्या बैठकीत घेण्यात आला. आम.शशिकला जोल्ले, तहसिलदार सुरेश मुंजे, सीपीआय बी. एस. तळवार व अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठक झाली.**



बैठकीत बोलताना आम.शशिकला जोल्ले, तहसलिदार सुरेश मुंजे, ता.पं.अधिकारी सुदिप चौगुला,पोलीस निरीक्षक बी.एस.तळवार.

आम.जोल्ले म्हणाल्या,गणेश उत्सव काळात पोलीस बंदोबस्त कडक ठेवण्यात यावा. कोणत्याही परिस्थितीत या काळात हलगर्जीपणा नको. रात्रीच्या वेळी पोलीसांची गस्त घालण्यात यावी.निपाणी शहरास ग्रामीण भागात ५०० हून अधिक गणेश मंडळे असून यामध्यें १० मंडळे अतिसंवेदनशिल तर ४३ मंडळे सुक्ष्मसंवेदनशिल आहेत. त्यामुळे बदोबस्त किंवा विद्युत पुरवठ्यात कोणताही हलगर्जीपणा चालणार नाही.

मंडळांना परवानगी देतानाही कोणता त्रास होणार नाही याकरीता एक खिडकी योजना सुरू करण्यात आली आहे. शहरासाठी नगरपालिकेत तर ग्रामीण भागासाठी तहसिलदार कार्यालयात एकाच ठिकाणी हेस्कॉम, पोलीस परवानगी देण्यात येणार आहे. विसर्जन मिरवणुकीसाठी दोन टॉप, दोन बेस लावण्यास परवानगी देण्यात आली आहे. या नियमांचे काटेकोर पालन न झाल्यास कारवाई अटळ आहे.

गणेश आगमन आणि विसर्जन रस्त्यावरील खड्डे मुजविण्यात यावेत. विसर्जन ठिकाणी स्वच्छता आणि योग्य नियोजन ठेवणे गरजेचे आहे. पोलीस व अग्निशामक दलानेही अलर्ट राहावे. आरोग्य विभागाने रूग्णवाहिका व्यवस्था ठेवावी. गरज लागल्यास हालसिध्दनाथ कारखान्यांचा अग्निशामक वाहन व जोल्ले ग्रुपची रूग्णवाहिकेचा वापर करावा. तहसिलदार सुरेंश मुंजे यांनी, एक खिडकी योजना सुरू केल्याने पोलीस, हेस्कॉम व नगरपालिका प्रतिनिधींनी योग्य कर्मचाऱ्यांची नेमणूक करून एकाच ठिकाणी परवानगी द्यावी. ग्रामीण भागात पीडीओंनी गणेश मंडळांचा सर्व्हे करून परवानगी तात्काळ द्यावी, असे सांगितले.

सीपीआय बी. एस. तळवार यांनी, विसर्जन मिरवणूक रात्री ११ पर्यतच काढावी. दोन टॉप,दोन बेसचा वापर करावा. पोलिसांबरोबर मंडळांनीही सुरक्षा पुरवावी. नियमांचे उल्लंघन झाल्यास कडक कारवाई करण्यात येईल, असे सांगितले. यावेळी तालुका पंचायत कार्यकारी अधिकारी सुदिप चौगुला यांनी, ग्रामीण भागात पीडीओच्या माध्यमातून नियमांचे पालन करण्यात येईल, असे सांगितले.यावेळी फौजदार जी. एस. पुजेरी, शिवराज नायकवडी, रमेश पोवार, सहाय्यक फौजदार एम. एस. नदाफ, हेस्कॉमचे अक्षय चौगुला, डॉ. ईश्वर पत्तार, अग्नीशामक दलाचे एस.जी. कोरे, नगरपालिका अभियंते विवेक जोशी, विनायक जाधव, शिरस्तेदार अभिषेक ढंगी तसेच जयवंत भाटले, सुनिल पाटील, संतोष सांगावकर, राजू गुंदेशा, प्रणव मानवी, बंडा घोरपडे, प्रशांत केस्ते, रवि कदम, अभि मुदकुडे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

# जिल्हास्तरीय चित्रकला, निबंध स्पर्धांना उदंड प्रतिसाद

## स्व.किसनराव आवळे स्मृतिदिनानिमित्त उपक्रम : विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

कोरोची,ता.७–

**येथील किसनराव आवळे बाल मंदिर,प्राथमिक विद्यामंदिर, माध्यमिक विद्यालयात लोकनेते स्व.किसनराव आवळे यांच्या २९ व्या स्मृतिदिनानिमित्त जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धा व निबंध स्पर्धा उत्साहात झाल्या.स्पर्धांना विद्यार्थ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला. चित्रकला स्पर्धेत २४३ तर निबंध लेखन स्पर्धेत १४८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.**

स्पर्धा लहान व मोठा अशा दोन गटात (५ वी ते ७ वी व ८ वी ते १० वी) झाल्या. लहान गटात निबंध लेखन स्पर्धेत कोमल चव्हाण,प्रथम (सरस्वती हायस्कूल),राजनंदिनी हुपरे,द्वितीय (हिरा-राम गर्ल्स हायस्कूल), प्राजक्ता झिपरे,तृतीय (मथुरा हायस्कूल),अनुश्री खोत,उत्तेजनार्थ (इचलकरंजी हायस्कूल) तर मोठ्या गटात श्रीया सुतार,प्रथम (इचलकरंजी हायस्कूल, राजवाडा),आलिया मुजावर,द्वितीय (श्रीमंत गंगामाई गर्ल्स हायस्कूल), राही आमणे,तृतीय (इचलकरंजी हायस्कूल),जुईली भंडगे, उत्तेजनार्थ (रामभाऊ जगताप हायस्कूल), चित्रकला स्पर्धेतील लहान गटात लिजा गेजगे,प्रथम (रोटरी कर्णबधीर विद्यालय, तिळवणी), पियुष कांबळे,द्वितीय (मराठी मिडीयम हायस्कूल, नारायण मळा),मनस्वी शिंदे,तृतीय (इचलकरंजी हायस्कूल),विश्वराज दशरथ सावंत,उत्तेजनार्थ (विनायक हायस्कूल, शहापूर),चित्रकला स्पर्धेतील मोठ्या गटात आचल वानखेडे,प्रथम (हिराराम गर्ल्स हायस्कूल), धैर्यशील कोळेकर, द्वितीय (दि.न्यू हायस्कूल, इचलकरंजी), राधा हुपरे,तृतीय (हिरा राम गर्ल्स हायस्कूल), वैष्णवी लायकर,उत्तेजनार्थ (मथुरा हायस्कूल) यांनी यश मिळवले.



बक्षिस वितरण प्रसंगी राजीव आवळे, अब्राहम आवळे, क्रांती आवळे, नोहा आवळे, व प्रा. तेली.

स्पर्धेनंतर पारितोषिक वितरण समारंभ झाला.यावेळी माजी आमदार राजीव आवळे यांनी, विद्यार्थ्यांना वाचाल तर वाचाल, मोबाईल पासून दूर राहा, चांगल्या मित्रांची संगती करा, भविष्यात यातून एक चांगला चित्रकार लेखक तयार होऊ शकतो. प्रत्येकाने स्पर्धेमध्ये भाग घेणे आवश्यक असून प्रत्येकाला बक्षीस मिळेल हे सांगता येत नाही,असे सांगितले.

शाहू शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व माजी नगरसेवक अब्राहम आवळे यांनी, स्व. किसनअण्णांच्या विचारांचा व सामाजिक कार्याचाआढावा घेतला. प्रत्येक विद्यार्थ्याने वक्तृत्व,चित्रकला, निबंध,गायन अशी कोणती ना कोणती कला जोपासली पाहिजे म्हणूनच त्या विचाराचा वारसा घेऊन दरवर्षी अण्णांच्या स्मृतिदिनानिमित्त वेगवेगळ्या स्पर्धा घेतल्या जातात, असे सांगितले.शाहू शिक्षण संस्थेच्या प्रशासकीय अधिकारी व नगरसेविका क्रांती आवळे यांनी, विद्यार्थ्यांनी छोट्या छोट्या निबंध स्पर्धेतून भाग घेऊन उद्याचे भावी लेखक, कवयित्री, चित्रकार व्हावेत अशी इच्छा व्यक्त केली.नोहा आवळे यांनी,स्पर्धेतील यशस्वीतांचे कोतूक करत स्पर्धांच्या माध्यमातून जीवनाला आकार मिळतो,असे सांगितले. यावेळी विजेत्या स्पर्धकांना रोख पारितोषिक व शिल्ड देण्यात आले.प्रास्ताविक मुख्याध्यापक बसवराज कोरे यांनी तर सूत्रसंचालन एस.आर.पाटील यांनी केले. आभार प्रा. नीलम तेली यांनी मानले. स्पर्धा यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# श्री शांतीनाथ पतसंस्थेचा १२ टक्के लाभांश : मिलींद कोले

कबनूर,ता.७–

**रौप्य महोत्सवी श्री शांतीनाथ नागरी सहकारी पतसंस्थेची ४३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा मामा लिगाडे सांस्कृतिक भवन, दिगंबर जैन मंदिर, कबनूर येथे झाली. मॅनेजर चंदुलाल फकीर यांनी नोटीसवरील सर्व विषयांचे वाचन केले. त्या सर्व विषयांना सभासदांनी मंजुरी दिली.**



संस्थेचे चेअरमन मिलींद कोले यांनी,अहवाल सालात संस्थेची उलाढाल २१ कोटीची झाली आहे. खेळते भांडवल ११ कोटी २६ लाख इतके झाले असून तरतुदी वजा जाता अहवाल सालात संस्थेला १४ लाख १६ हजार निव्वळ नफा झाला आहे.या वर्षीसुध्दा सभासदांना १२ टक्के डिव्हीडंड देणार असल्याचे जाहीर केले. माजी सरपंच मधुकर मणेरे, सन्मती बँक संचालक प्रदीप मणेरे यांचा कबनूर एज्युकेशन सोसायटीच्या संचालक पदी निवड झाल्याबद्दल,तसेच सुधीर कोळी, सा.बा. पाटील, सुभाष सुतार यांचा सत्कार झाला. सभेला व्हा. चेअरमन सुभाष केटकाळे, रमेश केटकाळे, बाळासो केटकाळे, ज्ञानदेव बडवे, नजरुद्दीन मुजावर, आनंदा कदम, राजेंद्र शेटे, सुरेखा सुरेश केटकाळे, सिमा लिगाडे, इंदिरा महिला पतसंस्थेच्या व्हा. चेअरमन स्वाती कोले,डॉ. मिता पाटील, वसंतदादा पतसंस्थेचे व्हा. चेअरमन संजय केटकाळे, राजाराम वाकरेकर, इंदिरा कॉलनी पतसंस्था चेअरमन सुरेश केटकाळे, कबनूर विकास सोसायटीचे चेअरमन अनिल पाटील, अशोक पाटील, सुरेंद्र केटकाळे, प्रकाश आवटी, किसन परीट, पांडुरंग वाकरेकर, अरुण केटकाळे, संजय लिगाडे, विलास कुंभार, आण्णाप्पा चौगुले यांच्यासह कर्मचारी , सभासद उपस्थित होते.किरण कांबळे यांनी आभार मानले.

# ज्योतिर्लिंग मंदिरात भाविकांची गर्दी

चिक्कोडी,ता.७ (प्रतिनिधी)–

**श्रावण महिन्यातील शेवटच्या सोमवारी एकसंबा येथील श्री. ज्योतिर्लिंग मंदिरात भगवान महादेवाची विशेष पूजा, अभिषेक व धार्मिक विधी झाले.**



यानिमित्त मंदिरात दिवसभर भाविकांची गर्दी पाहायला मिळाली.पहाटेपासूनच मंदिरात महाअभिषेक, रुद्रपाठ, आरती व विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. भगवान महादेवाला आकर्षक फुलांनी सजावट करण्यात आल्याने मंदिर परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता.दर्शनासाठी एकसंबासह, परिसरातील भाविकांनी रांगा लावल्या होत्या.श्रावण महिन्याच्या शेवटच्या सोमवारी शिवभक्तांनी हर हर महादेवच्या जयघोषात दर्शन घेतले. मंदिर समितीच्या वतीने भाविकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

# ईश्वरपुरात 'स्वराज्य अध्याय' एकपात्री प्रयोग ११ सप्टेंबरला

ईश्वरपूर,ता.७ (प्रतिनिधी)–

**छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांतून मुलांमध्ये संस्कार, कर्तव्य आणि सामाजिक जाणिवा रुजविण्याचा प्रयत्न स्वराज्य अध्याय'या प्रयोगातून केला जाणार आहे.**

प्रशांत यादव यांच्या संकल्पनेतून 'स्वराज्य अध्याय' हा एकपात्री प्रयोग साकारण्यात आला आहे. हा प्रयोग ११ सप्टेंबर रोजी ईश्वरपूर येथील खुले नाट्यगृहात सादर करण्यात येणार आहे. मुलांना केवळ इतिहासाची माहिती देणे नव्हे, तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा आजच्या जीवनाशी संबंध जोडून पालकांप्रती आदर, शिक्षकांप्रती कृतज्ञता, समाजाप्रती कर्तव्य, कर्मनिष्ठा, करुणा आणि संस्कार यांची जाणीव करून देणे, हा या प्रयोगाचा मुख्य उद्देश आहे.

आजच्या परिस्थितीत मुलांचे विचार आणि संस्कार योग्य दिशेने घडणे अत्यंत आवश्यक आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची उभारणी करताना दाखविलेली दूरदृष्टी, शिस्त, धैर्य, न्यायबुद्धी आणि मावळ्यांची स्वराज्याप्रती असलेली निष्ठा यामधून मुलांना प्रेरणा मिळावी, असा या प्रयोगामागील प्रयत्न आहे.'संस्कारातून भविष्य घडते' या विचाराने प्रेरित हा प्रयोग पालक, विद्यार्थी, शिक्षक आणि समाजातील प्रत्येक घटकासाठी विचारप्रवर्तक ठरणार आहे.

# खरी कॉर्नर पुलाजवळील सेवा रस्त्यावर गतीरोधक निर्मिती

निपाणी,ता.७ (प्रतिनिधी)

**बेळगाव नाका तहसीलदार प्लॉट या उपनगरांना जोडणारा महत्त्वपूर्ण उड्डाणपूल असलेल्या खरी कॉर्नर पुलाजवळ दोन्ही बाजूच्या सेवा रस्त्याला गतीरोधक नसल्याने पुलाखालून य-जा वाहनांना धोका निर्माण होऊन अपघाताची शक्यता होती.ही बाब लक्षात घेऊन सामाजिक कार्यकर्ते बंडा घोरपडे,माजी नगरसेवक दत्तात्रय जोत्रे यांच्या सहकार्याने राष्ट्रीय महामार्ग रुंदीकरण करणाऱ्या कंत्राटदार संस्थेच्या कर्मचाऱ्यांना घटनास्थळी बोलावून परिस्थितीची जाणीव करून दिली.यानंतर दोन्ही सेवा रस्त्यावर गतीरोधकाची गरज असल्याचे सांगितले.**



राष्ट्रीय महामार्ग रुंदीकरणाचे काम शहरातून जलद गतीने सुरू आहे.शहरातील आंदोलननगर, मुरगूड रोड, शिरगुपी रोड, खरी कॉर्नर, गांधी हॉस्पिटल व मानवी बंगल्यांनजीक उड्डाणपूल निर्माण करण्यात आले आहेत.त्यामुळे शहरातील नागरिकांना महामार्ग ओलांडताना अपघाताची किंवा कोणतीही मोठी घटना होण्याची शक्यता कमी झाली आहे.मात्र खरी कॉर्नर नजीक वाहतुकीची मोठी वर्दळ असते. शहरातील उपनगर असलेल्या तहसीलदार प्लॉट व परिसरात नागरिकांना या मार्गावरून ये-जा करावी लागते.त्यामुळे सेवा रस्त्यावरून जाणारी वाहने अति वेगाने जात आहेत.त्यामुळे अपघाताची शक्यता होती.त्यामुळे दोन्ही बाजूला तात्काळ गतीरोधक निर्माण करण्याचे काम सुरू केल्यामुळे नागरिकांतून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.यावेळी पिंटू बागडे यांच्यासह नागरिक


## जाहीर नोटीस

इचलकरंजी शहर येथील सि.स. नंबर ६४९५ व ६४९६ चे एकुन क्षेत्र २३६.६५ चौ. मिटर सदर मिळकतीवर बांधलेल्या सीके प्लाझा या बहुउद्देशीय इमारती मधील सहाव्या मजल्या वरील निवासी सदनिका क्रं. ६०१ चे बिल्टअप क्षेत्र ६२.२६ चौ. मिटर ची मिळकत यासी षष्ठःसिमा पुर्वेस - श्री ढवळे यांची मिळकत. पश्चिमेस - ओपन टेंस, दक्षिणेस- श्री मुलचंदाणी यांची मिळकत, उत्तरेस - श्री. महादेव काजवे यांची मिळकत. वर - कॉमन टेरेस. खाली - सदनिका क्रं. ५०२ ची मिळकत. सदर मिळकत श्री. शितल चंद्रकांत काजवे, श्री. रुपल चंद्रकांत काजवे, श्री. मुकुल चंद्रकांत काजवे तर्फे विकसक व वटमुखत्यार म्हणुन ओसिया डेव्हलपर्स रजी भागीदारी फर्म तर्फे श्री तानाजी तातोबा हराळे व श्री विकास रमणलाल चंगेडीया, रा. इचलकरंजी यांचे कब्जे वहीवाटीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीचे रजी. करारपत्र आमचे अशिलांकडुन संचकार रक्कम स्विकारून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणुन दिली नोटीस सही ता.०५/०९/२०२६. इ

**ॲड. आनंद प्रकाश पटवा**

**रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी.**

**मो.९४२०७७६४८६**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविणेत येते की...

मिळकतीचे वर्णन :- मौजे कबनूर ता. हातकणंगले येथील क. ग.नं. ६९७ यामधील प्लॉट नं. २ पैकी पुर्व बाजूची मिळकत क्षेत्र चौ.मी. १४६.३७ चौ. फुट १५७५.० ची बिगरशेती मिळकत सर्व . यासी चतु:सिमा:-पुर्वेस :- प्लॉट नं. ३ ची मिळकत, पश्चिमेस :- प्लॉट नं. २ पैकी शिल्लक मिळकत, दक्षिणेस :- श्री. चव्हाण यांची मिळकत, उत्तरेस :- २० फुट रूंदीचा रस्ता,

येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत सौ. स्वरूपा सुनिल पाटील. (एच यु एफ) रा. चंदुर यांचे मालकी असून त्यांचेकडून श्री. सुरेश रामबहादुर वर्मा रा. इचलकरंजी यांनी खरेदीपूर्व करारपत्राने घेवू केलेली असून त्यांनी सदर मिळकत आमचे अशिलांना खरेदी देणेचे ठरवून खरेदीपुर्व करारपत्र करून संचकार रक्कम स्विकारलेली आहे. सदरची मिळकत निर्वेध व निष्कर्जी असल्याचा निर्वाळा दिला आहे.. सबब सदर मिळकतीवर कोणाचाही हक्कसंबंध दावा अगर तक्रार असल्यास नोटीस प्रसिध्द झालेपासून (७) सात दिवसाचे आत खालील ॲडव्होकेट यांचे पत्यावर कागदपत्रासह लेखी खुलासा करावा. म्हणून दिली जाहीर नोटीस

ता. ०७/०९/२०२६

**ॲड.रागिणी उ. मोरबाळे**

**१६/१२०१, गोकुळ चौक, इचलकरंजी**

**मोबा.नं..९७६७१८३८९१**

## जाहीर नोटीस

मिळकतीचे वर्णनः जि. कोल्हापूर ता. हातकणंगले पैकी शहापूर येथील गट नं. ४६९ / प्लॉट नं./११ यापैकी प्लॉट नं. ११बी चे क्षेत्र १००.३७ चौ.मी.ची खुली जागा मिळकत. यासी चतुः सिमा : पुर्वेस : प्लॉट नं. ११/ए ची मिळकत. पश्चिमेस : प्लॉट नं. १३ ची मिळकत. दक्षिणेस : प्लॉट नं. ११/सी उत्तरेस : ९ मीटर रूंदीचा रस्ता. अस्लम उस्मान देसाई व राजेंद्र शिवा सुळकुडे रा. शहापूर यांचे कब्जे मालकीची असून आमचे अशिलांकडून संचकार रक्कम स्विकारून खरेदीपुर्व करारपत्र करून दिलेले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इजमेंट इ. वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही दि. ०७/०९/२०२६.

**ॲड. बाबासो एम. पाटील**

**(नोटरी भारत सरकार)**

**१७/७७, स्वामी विवेकानंद कॉलनी, इचलकरंजी. मो. ९२२६८८७००१**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविणेत येते की,

१) मिळकतीचे वर्णन - जिल्हा कोल्हापूर तालूका हातकणंगले पैकी इचलकरंजी येथील रि.स.नं. ५०७/२ याचे एकुण क्षेत्र हे. १ = १२ आर, पोट खराबे हे. ०=०१ आर, आकार रू. ११= ९७ पै., यापैकी गुंठेवारी बिगरशेती भुखंड क्र. ६९ चे एकुण क्षेत्र १३२.२९ चौ.मी. (याची प्रत्यक्षातील क्षेत्र ११२.९३ चौ.मी.) ची खुली मिळकत यासी चतु:सिमा- पूर्वेस - ओपन स्पेस, पश्चिमेस - ४.५७ मीटर रूंदीचा रस्ता, दक्षिणेस - रि.स. नं. ५०७ / ३ ची मिळकत, उत्तरेस - ३० फुट रूंदीचा रस्ता. येणेप्रमाणे चतुः सिमेतील मिळकत व त्यातील तदंगभूत वस्तूसह आणि ईजमेंटरी हक्कांसह सर्व .

२) वरील कलमी वर्णन केलेली मिळकत शितलकुमार निवृत्ती शिरोळे (एच.यु.एफ) व रमेश नंदलाल गुणाणी यांचे मालकीची आहे. त्यांनी सदर मिळकतीचे विक्रीबाबतचे करारपत्र संजय रामगोंडा पाटील, रामगोंडा अलगोंडा पाटील, अकबर अब्दूलरशीद मुतवल्ली व जुबेर अकबर मुतवल्ली यांना लिहून दिले आहे. सदर कराराचे आधारे सदरची मिळकत आमचे अशिलांना खरेदी देणेचे ठरवून आमचे अशिलांचेकडून संजय रामगोंडा पाटील वगैरे यांनी संचकार रक्कम स्विकारून खरेदीपूर्व करारपत्र लिहून दिलेले आहे. सदर मिळकत विक्री योग्य असल्याचा आणि ती निर्वेध व निष्कर्जी असल्याचा तसेच त्यावर कोणताही करार, नसुन तिच्यासंबंधी कोणत्याही न्यायालयात अथवा न्यायाधिकरणात वाद प्रलंबित नसल्याचा आणि मिळकत जप्ती / मनाई यापासुन मुक्त असल्याचा निर्वाळा मिळकतीचे मालकांकडुन व करारपत्र लिहुन देणार यांचेकडून देणेत आला आहे. तथापी सदर मिळकतीवर कोणाचा करार, वारसा, तारण, पोटगी, बोजा, कुळ, बक्षिसपत्र, मृत्युपत्र अगर अन्य कोणताही हक्क अगर हितसंबंध असलेस त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली नमूद वकिलांचे पत्त्यावर कागदपत्रांसहीत संपर्क साधून खात्री पटवून द्यावी. मुदतीत कोणाचीही तक्रार न आलेस आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही तक्रारींचा विचार केला जाणार नाही. म्हणून दिली जाहीर नोटीस आज मुक्काम इचलकरंजी

ता. ०७/०९/२०२६.

**ॲड.राहूल विलास जाधव**

**२०/९९५, स्वामी माळ, साईनाथ नगर, लेन नं -१, इचलकरंजी, मोबा.नं. ९१५६७७८४४५.**

## जाहीर नोटीस

मिळकतीचे वर्णन :- जि. कोल्हापूर ता.हातकणंगले पैकी मौजे कबनूर येथील :- क.ग.नं. ९०४/अ यापैकी संगणकीय ७/१२ प्रमाणे क्षेत्र हे. आर. पॉ. ०.०५.२७ आ. रूपये ०.१८ ची, बिगरशेती प्लॉट नं. १ सी याचे अंदाजे ५५६६.० चौरस फुट याचे ५२७.४२ चौरस मि.ची खुली व बांधीव मिळकत सर्व. यासी चतुः सिमा याचे पूर्वेस : २५ फुट रूंदीचा रस्ता, दक्षिणेसः सविता महारूद्र पाटील यांची मिळकत, पश्चिमेसः नलवडे यांची मिळकत, उत्तरेसः चराटे यांची मिळकत येणे प्रमाणे चतु:सिमेतील खुली व बांधीव मिळकत आतील तदंगभूत वस्तूसह इजमेंटरी हक्कासह सर्व. सदर मिळकत वक्रतुंड टेक्स्टाईल, तर्फे प्रोप्रा. विशाल हिंदुराव पाटील रा. महिपतराव बोंद्रेनगर कोल्हापूर यांचे कब्जे मालकीची असून, त्यांनी आमचे आशिलांकडून संचकार रक्कम स्विकारून संचकारपत्र लिहून दिले आहे. सदर मिळकत निर्वेध निर्जोखमी असलेचा निर्वाळा मिळकतीचे मालकानी दिलेला आहे. तथापि सदर मिळकती संदर्भात कोणाचा कसलाही हक्क, दावा पोटगी, लिज, बक्षिसपत्र, तारण आरक्षण, वहीवाटी बाबत हरकत असलेस सदर नोटीस प्रसिध्द झाले पासून सात (७) दिवसात खालील पत्त्यावर कागदपत्राच्या अस्सल प्रतिसह लेखी तक्रार नोंदवावी. मुदतीत कोणाचीही तक्रार न आलेस आमचे आशिल वरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूरा करतील याची समज असावी. म्हणून दिली जाहीर नोटीस

दिनांक ०७/०९/२०२६

**ॲड. बाबासो एम.पाटील**

**(नोटरी भारत सरकार) १७/७७, स्वामी विवेकानंद कॉलनी, इचलकरंजी.मो.नं. ९२२६८८७००१**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविणेत येते की, मौजे कबनूर येथील

१) सि. स.नं. २३१०२/१८ बिगरशेती प्लॉट नं. २० अ मधील क्षेत्र चौ.मी. ६४.९७ २) सि.स.नं. २३१०२/१७ बिगरशेती प्लॉट नं. २० ब मधील क्षेत्र चौ.मी.१३८.९१ सदरचे दोन्ही प्लॉट एकास एक लगत असुन याचे एकत्रित क्षेत्र चौ. मी. २०३.८८ ची जागा व यात असलेली बंदिस्त निवासी घर मिळकत याचा न.पा.मा.म.क्रं. ८४१ / १८ असा नोंद असलेली मिळकत सर्व.यासी एकत्रित चतु:सिमा- पुर्वेस- सि.स.नं.२३१०२/१८ ची मिळकत, पश्चिमेस-ओपन स्पेस, दक्षिणेस- कोन्नुर यांची मिळकत, उत्तरेस- २० फुट रुंदिचा रस्ता. याप्रमाणे चतु: सिमेतील मिळकत आतील सोई सह सर्व.

याप्रमाणे वर वर्णन केलेली मिळकत देशभक्त बाबासाहेब खंजिरे सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.इचलकरंजी यांचे मालकीची असुन उपधारक या नात्याने श्री. अस्लम महंमद बैरागदार रा. इचलकरंजी यांना अलॉट झालेली आहे. सदरची मिळकत चौंडेश्वरी सहकारी बँक इचलकरंजी व छाया कॉर्नर पत संस्था इचलकरंजी यांचे कर्ज बोजे शिवाय निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा देवून आमचे मित्राला संस्थेचे मान्यतेने हस्तांतरणपत्र पुरे करून देणेचे अटीवर लेखी संचकारपत्राने संचकार रक्कम स्विकारलेली आहे. सबब वरील मिळकती संदर्भात कोणाचा, कसलाही हक्कसंबंध,करार,तारण, गहाण, तसेच वित्तीय संस्था कर्ज बोजा, दावा, पोटगी, बक्षिस, कुळहक्क वगैरे असलेस नोटीस प्रसिद्धी पासून सात (७) दिवसाचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी म्हणून दिली जाहीर नोटीस असे सही ता.०५/०९/२०२६ इसवी.

**श्री. एम.आय.मुल्ला**

**मुद्रांक विक्रेता, इचलकरंजी.**

**मो.नं. ९९२२२४२१२३**

## जाहीर नोटीस

१)जि. कोल्हापूर, ता. हातकणंगले, पैकी इचलकरंजी येथील महानगरपालीका हद्दीत समाविष्ट झालेली मौजे शहापूर येथील मिळकत गट नं. ५७ मधील सि.स.नं. १८४४६ / १०५ ते ११२ चे क्षेत्र ३२७०.१० चौ. मी. या मिळकतीवर गैबान बिल्डर्स अँड डेव्हलपर्स तर्फे बांधणेत येत असलेले ''गैबान रेसिडेंन्सी'' या निवासी इमारती मधील ''विंग बी'' मधील तळ मजला, पहिला मजला व दुसरा मजला वरील बंदिस्त सदनिका असे एकूण मिळून २४ सदनिकांची टु बिचके ची इमारत व त्याखालील पार्किंग मिळकत यासी चतु:सिमा-

पुर्वेस-विंग सी व ६ मीटर रुंदीचा रस्ता, पश्चिमेस- ऐ विंग, दक्षिणेस-९ मीटर रुंदीचा रस्ता,:-उत्तरेस-९ मीटर रूंदीचा रस्ता,

येणेप्रमाणे चतु:सिमेतील त्या इमारतीमधील खालील पार्किंग, तदंगभुत वस्तूसह व इजमेंटचे हक्कासह, येणेप्रमाणे सदरची मिळकत वरीलनुसार त्यांचे कबजेतील व मालकीची आहे. सबब त्यांनी ही मिळकत् आमचे अशिलांना खरेदी देणेचे मान्य केले असून, विक्रीसासंदर्भात लेखी करार करून देऊन या व्यवहारापोटी आमचे अशिलांचेकडून रक्कम स्विकारून, मिळकत निर्वेध व निष्कर्जी असल्याचा निर्वाळा आमच्या अशिलांना दिला आहे. तसेच कायदेशीररीत्या झालेल्या कराराप्रमाणे खरेदीपत्र पुर्ण करुन देण्याचे आश्वासन आमचे अशिलाना दिले आहे.


२) सबब, वरील मिळकती संदर्भात कोणाची कांही तक्रार, हरकत, दावा, बोजा, आरक्षण, संपादन वा अन्य कांही कायदेशीर हक्कसंबंध असतील, तर ही नोटीस जाहीर झाल्यापासून ८ दिवसाचे आत माझे खाली नमुद केलेल्या पत्त्यावर सर्व कागदपत्रासह लेखी कळवावे, व प्रत्यक्ष भेटून माझी खात्री करून द्यावी. ३) याप्रमाणे कोणाकडून कांही समज न मिळालेस, मिळकत निर्वेध व निष्कर्जी आहे असे समजून, आमचे अशील व्यवहारपूर्ण करतील. मग कोणाची कांहीही तक्रार ऐकली जाणार नाही. म्हणून दिली नोटीस ता. ७/९/ २०२६

**ॲड. श्री. किरण डी. कोष्टी**

**आफिस - शॉप नं. १४, स्वप्नशिल्प टॉवर, निरामय हॉस्पिटल रोड, मोबा. नं. ९२७२७७७१४४.**

महासत्ता





चंदुर येथे आयोजित श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त दहीहंडी फोडताना घेतलेले छायाचित्र.

## चंदुरच्या राधाकृष्ण मंदिरात गोकुळाष्टमी उत्साहात

चंदुर,ता.७(वार्ताहर)–

**चंदुर (ता. हातकणंगले)येथील राधाकृष्ण देवस्थान मंदिर ट्रस्टच्या वतीने आयोजित श्रीकृष्ण जन्माष्टमी सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न झाला. गोकुळाष्टमी दिवशी अमाप उत्साहात, टाळ मृदुंगांच्या गजरात दहीहंडी फोडण्यात आली.**

जन्माष्टमी निमित्त श्री ज्ञानेश्वरी पारायण,अखंड हरिनाम सप्ताह संपन्न झाला.या सप्ताहात दररोज पहाटे काकड आरती, सकाळी दिंडी,सायंकाळी हरिपाठ,रात्री हरिजागर संपन्न झाला. यामध्ये सर्वश्री ह.भ.प.दीपक भोईटे,अभिजीत पोवार,श्रीधर सुतार,दिगंबर खोत, ज्ञानेश्वर माने, राहुल कदम यांचे प्रवचन तर राधाकृष्ण भजनी मंडळ, विठ्ठल भजनी मंडळ, मुक्ताई भजनी मंडळ,महासिद्ध भजनी मंडळ,मल्लिकार्जुन अतिगिडद व सहकारी यांच्या भजनाचा कार्यक्रम तर गुरुवारी केतकी पाटील,नवनाथ सूर्यवंशी व सहकारी यांच्या भक्तीगीतांचा सुरेल कार्यक्रम संपन्न झाला. शुक्रवारी श्रीकृष्ण जन्माष्टमी जागर,श्रीकृष्ण जन्मकाळ सोहळा तर शनिवारी दिगंबर खोत यांचे काल्याचे किर्तन संपन्न झाले. दुपारी पालखी नगर प्रदक्षिणा, दहीहंडी सोहळा व महाप्रसाद वाटप मोठ्या उत्साहात संपन्न झाला.या सर्व कार्यक्रमांना गावातील वारकरी संप्रदाय,भजनी मंडळ,कुंभार समाजासह सर्व समाज बांधव, विविध मंडळाचे कार्यकर्ते,मान्यवर,ग्रामस्थ महिला यांचे सहकार्य लाभले.

# आरोग्य सेवांच्या गुणवत्तेवर स्टार रेटिंगची नजर

### मंत्री प्रकाश आबिटकर

कोल्हापूर,ता.७(प्रतिनिधी)–

**सार्वजनिक आरोग्य विभागाअंतर्गत व बाह्यस्रोतांमार्फत दिल्या जाणाऱ्या आरोग्य सेवांच्या गुणवत्तेवर आता स्टार रेटिंग प्रणालीची नजर राहणार असून, यामध्ये कोणताही गैरप्रकार, अनियमितता, गुणवत्तेची कमतरता राहणार नाही याची काळजी घ्यावी, असा निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिला.**



आरोग्यसेवा आयुक्तालयात आयोजित विविध सेवांची आढावा बैठकीत अधिकाऱ्यांना सूचना देताना मंत्री प्रकाश आबिटकर,समोर उपस्थित अधिकारी वर्ग.

आरोग्यसेवा आयुक्तालयात मंत्री आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली बाह्यस्रोतांमार्फत पुरविण्यात येणाऱ्या विविध सेवांची आढावा बैठक झाली. नागरिकांना दर्जेदार सेवा मिळणे ही विभागाची प्राथमिकता आहे. त्यामुळे बाह्यस्रोतांमार्फत दिल्या जाणाऱ्या प्रत्येक सेवेचे नियमित परीक्षण आणि मूल्यांकन करावे. जिल्हा शल्यचिकित्सक आणि जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सेवांची नियमित तपासणी करून गुणवत्तेचा अहवाल सादर करावा, असे निर्देश मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. सार्वजनिक आरोग्य संस्थांमध्ये महिला बचत गटांच्या माध्यमातून सकस व आरोग्यदायी आहार पुरवठा करण्याच्या स्थानिक आमदारांच्या सहभागाने आरोग्य समितीच्या बैठका घेऊन त्यातील कार्यवाहीची अंमलबजावणी आणि त्याबाबतचा अहवाल तयार करावा, नोव्हेंबर महिन्यात जनआरोग्य समितीची राज्यस्तरीय बैठक होणार असून, त्यापूर्वी राज्यातील सर्व जन आरोग्य समित्या प्रभावीपणे कार्यान्वित असाव्यात,असे आरोग्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

बैठकीस आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ.निपुण विनायक,सचिव इ. रवींद्रन, आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर, शहरी आरोग्य अभियान आयुक्त डॉ. सुनील भोकरे, रुग्णालय–आरोग्य सेवा सहसंचालक डॉ.सुनीता गोल्हाईत तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. दूरदृश्य प्रणालीद्वारे राज्यातील सर्व जिल्ह्यांचे जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, उपसंचालक आणि वैद्यकीय अधीक्षक सहभागी झाले होते.

## स्वामी समर्थ पादुकांचे श्री क्षेत्र पैजारवाडीत दर्शन

बोरपाडळे,ता.७(प्रतिनिधी)–

**अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ समाधी मठाचे स्वामी सेवक केदार पुजारी हे श्री स्वामी समर्थांच्या पवित्र पादुका घेऊन श्रीक्षेत्र पैजारवाडी येथील परमपूज्य सद्गुरू चिले महाराज समाधी मंदिरास भेट देण्यासाठी आले होते.**

यावेळी मंदिरात पवित्र पादुकांचे विधिवत पूजन करण्यात आले. पूजा–अर्चा व आरतीचा कार्यक्रम भक्तीमय वातावरणात पार पडला. पादुकांच्या दर्शनासाठी भाविकांनी उपस्थित राहून दर्शन घेतले. स्वामी समर्थ व चिले महाराज यांच्या भक्तीमय नामस्मरणाने परिसरात आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले होते.

## मंडळांनी विधायक कामात स्पर्धा करावी-प्रणिल गिल्डा

वारणानगर,ता.७(प्रतिनिधी)

**गणेशोत्सवात गणेश मंडळांनी एकमेकात आवाजाची स्पर्धा न करता विधायक कामाची स्पर्धा करण्याचे आवाहन शाहुवाडी विभागाचे पोलीस उपअधिक्षक प्रणिल गिल्डा यांनी कोडोली (ता.पन्हाळा) पोलीस ठाण्याच्या कक्षेतील सर्वच मंडळांची गणेशोत्सवानिमीत्त बोलाविलेल्या बैठकीच्या अध्यक्षीय भाषणात केले.**

येथील रेणुका संस्कृतीत हॉल मध्ये हा कार्यक्रम पार पडला. यावेळी बोलताना कोडोली पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चेतन मसुगटे म्हणाले की, कोणतीही परवानगी न घेता सार्वजनिक गणपती बसवू नये व कोणताही अनुचित प्रकार न घडता चांगल्या पद्धतीने ' श्री'चा उत्सव पार पडला आहे ही परपंरा कायम राखण्याचे आवाहन केले. यावेळी शिवाजी पाटील, विशाल जाधव, माजी उपसरपंच डॉ. प्रशांत जमणे, अमरबाबा पाटील यांनी गणेश उत्सव शांततेत साजरा करून कोल्हापूर जिल्ह्यात आदर्श निर्माण करण्याचे आवाहन केले. यावेळी पन्हाळा पंचायत समिती सदस्य माणिक पाटील, मोहन चोपडे, मालेचे सरपंच उत्तम पाटील, बाजीराव केकरे यांच्यासह मंडळाचे कार्यकर्ते व प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. सूत्रसंचालन मोहन कदम यांनी केले.

# रोटरी सेंट्रल गीत गायन स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद

इचलकरंजी,ता.७–

**येथील रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी सेंट्रल व ॲनस् कमिटी यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या रोटरी सेंट्रल आयडॉल कराओके गीत गायन स्पर्धेस स्पर्धकांचा आणि रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. इचलकरंजी व परिसर तसेच कोल्हापूर, गडहिंग्लज, सांगली, सातारा भागातील विविध वयोगटातील स्पर्धकांनी प्राथमिक आणि अंतिम फेरीत सुरेल गाणी सादर केली.**



पारितोषिक विजेते स्पर्धक आणि परिक्षक व पदाधिकारी.

या स्पर्धेमध्ये वासिम मुजावर, कोल्हापूर याने प्रथम क्रमांक आणि कनक भुतडा, इचलकरंजी हिने द्वितीय क्रमांक तर आदित्य बल्लाळ, कागल याने तृतीय क्रमांक मिळविला.स्वप्नाली सुतार, राधानगरी आणि समर्था होगाडे, इचलकरंजी यांनी उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त केले. या स्पर्धेचे परीक्षक या नात्याने प्रसिद्ध गायक महेश हिरेमठ कोल्हापूर, दीपक फडके इचलकरंजी आणि सौ. अश्विनी जोशी, कोल्हापूर यांनी उत्तमरीत्या जबाबदारी पार पाडली.स्पर्धेच्या सुरुवातीला रोटरी क्लब सेंट्रलचे अध्यक्ष विमलकुमार बंब यांनी स्वागतपर मनोगत व्यक्त केले तर शिवकुमार धड्डु यांनी प्रास्ताविक केले.सौ.सायली होगाडे आणि सौ. सायली बंब यांनी सूत्रसंचालन केले. परीक्षकांचा परिचय सेक्रेटरी प्रमोद महाजन यांनी करून दिला. यावेळी सहाय्यक प्रांतपाल अशोक जैन तसेच परीक्षक व पदाधिकारी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून स्पर्धेचे उदघाटन करण्यात आले. यावेळी सौ. शितल धड्डु व सौ.राजश्री महाजन उपस्थित होत्या. पारितोषिक वितरण समारंभ सर्व परीक्षक तसेच पदाधिकारी यांच्या हस्ते संपन्न झाला. ध्वनी व्यवस्था होगाडेजॉबर यांची होती तर गाण्याच्या ट्रॅकची तांत्रिक बाजू अशोक जैन व निहाल पठाण यांनी सांभाळली. येथील रोटरी श्री दगडूलाल मर्दा मानव सेवा केंद्र सभागृहात सदरचा कार्यक्रम पार पडला.



प्रोबस क्लबतर्फे शिक्षक दिनानिमित्त शिक्षकांच्या सत्कारप्रसंगी उपस्थित प्रकाशराव सातपुते व इतर प्रमुख मान्यवर.

## प्रोबस क्लबतर्फे शिक्षक दिन उत्साहात साजरा

इचलकरंजी,ता.७–

**रोटरी सेंट्रल एक्झिक्युटिव्ह प्रोबस क्लबच्या वतीने शिक्षक दिनाचे औचित्य साधून शिक्षकांचा प्रकाशराव सातपुते व अनेक मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.**

रोटरी भवन येथे झालेल्या प्रोबस क्लबच्या कार्यक्रमात रामचंद्र निमणकर,डॉ.सतीश लवटे,विजयकुमार सोनी,सौ.माधवी कुलकर्णी,श्रीमती जयश्री चौगुले, सौ. विणा श्रेष्ठी आदी शिक्षकांचा पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.रामदास कोळी यांनी प्रास्ताविक केले. प्रकाशराव सातपुते यांनी प्रोबस क्लब स्थापनेमागील उद्देश स्पष्ट केला.यावेळी नव्याने सभासद झालेल्या सदस्यांचा परिचय व सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात बापूसाहेब घुले यांना आदर्श समाजसेवक पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला.कार्यक्रमास प्रमोद लाटणे,शिवबसू खोत, सुनील कोष्टी, आनंदा मेटे,प्रभाकर उरणे,गजानन शिरगुरे,हिमांशू मिरगे,जयप्रकाश शाळगावकर,प्रदीप लडगे,सौ. माया होगाडे,सौ. निर्मला मोरे, सौ.संगीता लडगे यांच्यासह सभासद उपस्थित होते.

## कोतोलीत गणेशमंडळांची समन्वय बैठक संपन्न

कोतोली,ता.७(प्रतिनिधी)–

**गणेशोत्सव शांततेत, उत्साहात आणि सलोख्याच्या वातावरणात पार पडावा, यासाठी पन्हाळा पोलीस ठाण्याच्या वतीने कोतोली येथील तेजस्विनी हॉलमध्ये गणेश मंडळांची समन्वय बैठक घेण्यात आली.**

कोतोलीसह अकरा गावांतील सुमारे १०० ते १५० नागरिक, गणेश मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते,सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पोलीस पाटील व ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.गणेशोत्सव डॉल्बीमुक्त साजरा करून पारंपारिक वाद्यांचा वापर करावा, मंडपाचा आकार कमाल १० बाय १२ फूट ठेवावा तसेच मूर्तीच्या ठिकाणी किमान दोन स्वयंसेवक कायमस्वरूपी उपस्थित ठेवावेत, अशा सूचना पोलिसांनी दिल्या.सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट, संदेश, व्हिडिओ प्रसारित करू नयेत.विसर्जन मिरवणुकीतील डॉल्बी चालक, स्ट्रक्चर व लाइटिंग मालकांची माहिती पोलिसांना द्यावी.प्रेशर हॉर्न, अपायकारक लेझर लाईट व इफेक्टचा वापर टाळावा, असेही सांगण्यात आले. यावेळी सहा.पोलीस फौजदार नाईक, पोलीस हवालदार फोडे व पोलीस अंमलदार सचिन पाटील यांनी मार्गदर्शन केले.

## स्व.कलिकते यांचे जीवन कार्य प्रेरणादायी-प्रा.चौगले

शिरगाव,ता.७(प्रतिनिधी)

**संपूर्ण आयुष्य शेतकरी, कामगार कष्टकरी,श्रमजीवी, शेतमजूर, धरणग्रस्त प्रकल्पग्रस्त यांच्यासाठी खर्ची घालणाऱ्या स्व. गोविदराव कलिकते यांचे जीवनकार्य प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन गोकुळचे संचालक प्रा. किसन चौगले यांनी केले.**



शिरगाव (ता.राधानगरी) येथील श्री राजर्षी शाहू छत्रपती शिक्षण प्रसारक मंडळाच्या सहा माध्यमिक विद्यालये व कलिकते परिवार यांच्यावतीने माजी आमदार स्वर्गीय गोविंदराव कलिकते यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी सरपंच सुभाषराव कलिकते हे होते. यावेळी बाबासाहेब देवकर, एकनाथराव पाटील ,महादेवराव कोथळकर, शिवाजीराव पाटील, दत्तात्रय पाटील राजाराम पाटील, दिगंबर मेडशिंगे बाजीराव चौगले, रोहित पाटील, राजाराम भाटळे, सभापती आर. वाय.पाटील, उमेश भोईटे प्रमुख उपस्थित होते. स्वागत संग्राम कलिकते यांनी केले. संजयसिंह कलिकते यांनी प्रास्ताविक केले.अँड.जी.ए पाटील,सौ.शालन पाटील प्रा.किसन चौगले यांच्या हस्ते स्वर्गीय गोविंदराव कलिकते यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेभोगावतीचे चेअरमन शिवाजीराव पाटील,धनाजी पाटील, सुभाष पाटील,दौलत कांबळे आनंदा पाटील, राहुल पाटील, मोहन पाटील ,उमेश भोईटे, सरपंच संदीप पाटील,डी.के.पाटील,पोलीस पाटील संजय कांबळे उपस्थित होते.मुख्याध्यापक मधुकर किरुळकर यांनी सूत्रसंचालन केले. उदय कलिकते यांनी आभार मानले.

## गोविंदराव हायस्कूलमध्ये शिक्षक दिन उत्साहात

इचलकरंजी,ता.७–

**येथील श्री. ना. बा. एज्युकेशन सोसायटी संचलित गोविंदराव हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये शिक्षक दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.**



गोविंदराय हायस्कूलमध्ये आयोजित शिक्षकदिन कार्यक्रमात बोलताना प्रा.शिवाजीराव भुकेले व्यासपीठावर इतर प्रमुख मान्यवर.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा.डॉ.शिवाजीराव भुकेले यांच्या हस्ते प्रतिमापूजन व मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.स्वागत व प्रास्ताविक मुख्याध्यापक एस. व्ही. पाटील यांनी केले. एस.एस.कांबळे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. यावेळी संस्थेच्यावतीने प्रशालेतील शिक्षक व सेवकांचा सत्कार करण्यात आला.यावेळी शिवाजीराव भुकेले,श्रीनिवास बोहरा यांनी मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाप्रसंगी कृष्णा बोहरा, उदय लोखंडे, बाबासाहेब वडिंगे,महेश बांदवलकर, लक्ष्मीकांत पटेल यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी एस.पी. गुरव,एन. एस. पाटील, पर्यवेक्षक ए. एम. जामदार, एस.बी.बखेडी व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.आभार ए. बी. कांबळे यांनी मानले. सूत्रसंचालन सौ. आर.एस. रॉडीग्युस यांनी केले.


श्रीहरी
शुक्रवार, ता. ४/०९/२०२६ पासून रोज ३ खेळ, दु. १ वा.
ओरिजीनल हिंदी इचलकरंजीत प्रथमच
मिस डॉली
४ व ७ वा.
A हॉट लडकी प्रौढांसाठी

श्रीदत्त
शुक्रवार, ता. ४ पासून रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
द रिव्हेंजर
A शहरात प्रथमच * फक्त प्रौढांसाठी A

पंचवटी चित्रमंदिर, इचलकरंजी DOLBY 7.1
कुटुंबासह चित्रपट पाहण्याचा आनंददायी अनुभव!
MIRZAPUR मिर्जापुर
हिंदी वेब सीरीजवर आधारित
प्रसिद्ध & सुपरहिट चित्रपट
शुक्रवार 4 पासून रोज 3 खेळ
सकाळी 11.30 AM दुपारी 3.00 PM रात्री 9.30 PM
श्रद्धा... शक्ती... आणि चमत्कार!
नीब करोरी बाबा यांच्या दैवी जीवनावर आधारित
HANUMAN ANSH हनुमान अंश
BASED ON THE BOOK "DIVINE DETOUR"
रोज 1 खेळ सायंकाळी 6.30 PM
बुकिंगसाठी संपर्क 96231 50103
महिला स्टाफ अवेलेबल
गुगल पे । फोन पे एक्सेप्ट करतो G Pay पे
आधुनिक सुविधा • स्वच्छता • मस्त वातावरण • कुटुंबासाठी सुरक्षित

५७ वर्षे सिनेरसिकांच्या सेवेत DOLBY DIGITAL
भाग्यरेखा चित्रमंदिर इचलकरंजी
नवीन डॉल्बी डिजिटल साऊंड सिस्टीम
शुक्रवार ता.४ पासून
दु. १२ * ३ वा. सायं.६ * ९ वा.
हनुमान अंश (हिंदी) मिर्झापूर (हिंदी)

कल्पना लेजर प्रोजेक्टरसहीत शुक्रवार ता.४ पा.
स.११.३० * दु.३.३० * रा.९
ॲक्शन, क्राईम, थ्रिलर चित्रपट
(हिंदी चित्र) DOLBY DIGITAL QUBE
तिकीट दर 60/-
मिर्झापूर

गुरु शुक्रवार,ता. ४ पासून रोज ४ खेळ
ऑनलाईन बुकींग bookmyshow
दुपारी १२ वा. सत्य घटनेवर आधारीत
रोज ३ खेळ ३ * ६.३० * ९.४५ वा.
हनुमान अंश (हिंदी) मिर्झापूर (हिंदी)

RK CINEMA 3 SCREEN MULTIPLEX
राधाकृष्ण सिनेमा 3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
REAL 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
7447440070 bookmyshow
" मिझापूर: द मूव्ही " ( हिंदी )
11:00 AM, 01:15 PM 03:00 PM, 06:30 PM 09:30 PM, 10:30 PM
" हनुमान अंश " ( हिंदी )
10:30 AM, 12:30 PM 03:45 PM, 05:00 PM 07:45 PM, 10:15 PM
39 वर्षांचा अविरत प्रवास पूर्ण करून आरके सिनेमाने दिमाखात 40व्या वर्षात पदार्पण केलं!
चित्रपटाचा भरघोस आनंद घ्या आमच्या नवीन खाद्य प्रकारासह, खासकरून पिज्जा, पास्ता, सँडविच, गार्लिक ब्रेड आणि बरिस्ता एक्सप्रेसो कॉफी इचलकरंजीत प्रथमच

फोर्च्युन सिनेफ्लेक्स इचलकरंजी
Now Book Tickets on bookmyshow OR Via www.fortuneshahgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क +91 88 88 01 51 11
मिर्झापूर: द मूव्ही (HIN) (A)
11.00am, 01.30, 03.00, 05.15, 06.30, 09.00, 10.00pm
हनुमान अंश (HIN) (U)
10.30am, 12.30, 03.30, 07.00, 10.15pm
आता पहा कोणताही मूवी शो फक्त 100 पासून पुढे

# सागावचे किरवण तळे कमळफुलांनी बहरले

## वन विभागाकडून कमळवाटिका व वडांच्या झाडांचे संगोपन; दोन्ही प्रयोग यशस्वी

शिराळा,ता.७(प्रतिनिधी)-

..............................

**सध्या सुरू असलेला पाऊस आणि हिरवाईने नटलेला परिसर यामुळे सागाव (ता.शिराळा) येथील किरवण तळ्याचे रूपडे अधिकच खुलले आहे. शिराळा-कणदूर रस्त्यालगत असलेल्या या तळयात वन विभागाने स्वप्रेरणेतून विकसित केलेली कमळवाटिका सध्या विविध रंगांच्या कमळफुलांनी बहरली आहे.**



सागाव (ता.शिराळा)येथील शिराळा-कणदूर रस्त्यालगत असलेल्या किरवण तलावातील कमळवाटिका विविध रंगाच्या कमळफुलांनी सध्या बहरली आहे.

तळ्याच्या परिसरात वड, पिंपळ, पिपरण, चिंच आदी वृक्षांचे केलेले संगोपनही जोमाने वाढले असून, वन विभागाचा हा निसर्ग संवर्धनाचा प्रयोग लक्षवेधक ठरत आहे.सागावच्या उत्तरेला सुमारे दीड किलोमीटर अंतरावर भागाईवाडी फाट्याजवळ हे तळे आहे. पूर्वी येथे दगडाची खाण होती. बांधकामासाठी दगड काढल्यानंतर खाणीत कायमस्वरूपी पाणी साचत असल्याने कालांतराने तिचे तळ्यात रूपांतर झाले. पूर्वी या परिसराकडे फारसे कोणी फिरकत नव्हते. मात्र, कालांतराने परिसरात मठाची स्थापना झाल्याने लोकांची ये-जा वाढली.

दोन-तीन वर्षांपूर्वी वन विभागाने या परिसरात वड महोत्सव घेऊन विविध वडांची लागवड केली. त्याचबरोबर तळयात कमळवाटिका विकसित करण्यात आली. सध्या वडांची झाडे चांगली वाढली असून, तळ्याचा मोठा भाग कमळफुलांनी व्यापला आहे. सकाळच्या वेळी पाण्यावर उमललेली कमळफुले आणि सभोवतालची हिरवाई यामुळे ये-जा करणाऱ्या नागरिकांचे व प्रवाशांचे लक्ष वेधले जात आहे. अनेक नागरिक हे निसर्गरम्य दृश्य पाहण्यासाठी येथे थांबत आहेत.

किरवण तळे प्रादेशिक वन विभागाच्या हद्दीत येते. तळ्याच्या परिसराचे सौंदर्य वाढविण्याबरोबरच पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने वृक्षलागवड आणि कमळवाटिकेचा उपक्रम राबविण्यात आला आहे. या दोन्ही प्रयोगांना चांगले यश मिळाल्याचे चित्र सध्या दिसत आहे.

### गावोगावी कमळवाटिका उभारण्याची गरज

शिराळा तालुक्यात कांदे, चिखली,नाटोली, सागाव, कणदूर, पूनवत, फुपेरे, बिळाशी, कोकरूड, खुजगाव,प.त. वारुण,वाकुर्डे खुर्द, गिरजवडे आदी गावांमध्ये तळी आहेत. ही तळी गाळमुक्त करून ग्रामपंचायती व ग्रामस्थांनी पुढाकार घेतल्यास किरवण तळ्याप्रमाणे कमळवाटिका विकसित करता येऊ शकतात. त्यामुळे गावांच्या सौंदर्यात भर पडण्याबरोबरच जलस्त्रोतांचे संवर्धन व प्रदूषणमुक्ती होण्यास मदत होईल.

### तळ्याचे विद्रूपीकरण करू नये

**कमळवाटिकेमुळे किरवण तळ्याच्या सौंदर्यात मोठी भर पडली आहे. त्यामुळे नागरिकांनी तळ्यात कचरा, निर्माल्य, घाण किंवा टाकाऊ वस्तू टाकू नयेत. तळ्याचे पाणी प्रदूषित होणार नाही, याची सर्वांनी काळजी घ्यावी.तळ्याचे विद्रूपीकरण न करता परिसर स्वच्छ ठेवावा, असे आवाहन वन विभागाने केले आहे.**

# 'सह्याद्री'तर्फे ऊस न पुरविलेल्या सभासदांनाही मिळणार साखर

कराड ,ता.७(प्रतिनिधी)-

..............................

**राज्यात 'सह्याद्री पॅटर्न' म्हणून नावारूपास आलेल्या कराड तालुक्यातील यशवंतनगर येथील सह्याद्री सहकारी साखर कारखान्याने नेहमीच सभासद हिताला प्राधान्य दिले आहे. साखरेच्या दरात झालेली वाढ आणि आगामी सणासुदीचा काळ लक्षात घेऊन सर्वसामान्य सभासदांना दिलासा देण्यासाठी कारखान्याला मागील पाच वर्षात ऊस न पुरविलेल्या सभासदांनाही त्यांच्या साखर कार्डावरील सप्टेंबर २०२६ अखेरपर्यंतची साखर देण्याचा निर्णय सह्याद्री साखर कारखान्याने घेतला आहे.**

साखरेच्या दरात अचानक वाढ झाल्याने सर्वसामान्यांच्या दैनंदिन खर्चावर परिणाम होत आहे. तसेच चहा, गोड पदार्थ आणि सणासुदीच्या काळात आवश्यक असलेल्या साखरेच्या वापरासाठी अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर शेतकरी सभासदांना साखरेच्या वाढलेल्या दराची झळ कमी प्रमाणात बसावी आणि सणासुदीच्या काळात साखर उपलब्ध व्हावी, या उद्देशाने कारखाना व्यवस्थापनाने हा निर्णय घेतला आहे.कारखान्याच्या निर्णयानुसार मागील पाच वर्षात कारखान्यास ऊस न पुरविलेल्या सर्व सभासदांना त्यांच्या साखर कार्डावरील सप्टेंबर २०२६ अखेरपर्यंतची साखर देण्यात येणार आहे.त्यामुळे ऊस पुरवठा न केलेल्या सभासदांनाही या निर्णयाचा लाभ मिळणार असून आगामी सणासुदीच्या काळात त्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. साखर वाटपाबाबत अधिक माहितीसाठी सभासदांनी कारखान्याच्या संबंधित विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन कार्यकारी संचालकांनी केले आहे.



संपदा मोरे यांचा सत्कार करताना भाग्यश्री शिंदे सोबत वैभव शिंदे, नंदकुमार बसुगडे, स्नेहा माळी, झिनात अत्तार व मान्यवर.

# आष्ट्यात संपदा मोरे यांचा सत्कार

आष्टा,ता.७(प्रतिनिधी)-

..............................

**सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या अंतर्गत समूह संघटक म्हणून कार्यरत असलेल्या संपदा विश्वास मोरे यांना सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल एक्सलंट अॅवॉर्ड प्राप्त झाल्याबद्दल एकविरा नागरी सहकारी पतसंस्थेच्यावतीने वाळवा पंचायत समितीच्या माजी उपसभापती भाग्यश्री शिंदे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार झाला.**

यावेळी सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक वैभव शिंदे, नगराध्यक्ष विशाल शिंदे, उपनगराध्यक्ष दिलीपराव वग्यानी,पालिकेचे पाणीपुरवठा सभापती नंदकुमार बसुगडे, नगरसेवक विराज शिंदे, तानाजी सूर्यवंशी,धैर्यशील शिंदे,अॅड.अभिजित वग्यानी, विश्वास मोरे, वरदराज शिंदे, शिरू सावंत, स्नेहा माळी,झिनत अत्तार,संदीप तांबवेकर,दिनकर बसुगडे, अर्जुन तांबवेकर यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

# ग्रामस्थांच्या पोर्टलवरील तक्रारीनंतर रस्त्याचे पॅचवर्क

मिरज,ता.७(प्रतिनिधी)-

..............................

**वारंवार मागणी करुन, तक्रारी करुनही मिरज तालुक्यातील सावळी ते तानंग रस्त्याचे पॅचवर्क करण्यात येत नव्हते यामुळे आक्रमक झालेल्या ग्रामस्थ व ग्रामपंचायत सदस्यांनी याबाबतची तक्रार थेट राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पोर्टलवर केली. खराब रस्त्याची छायाचित्रेही या पोर्टलवर अपलोड करण्यात आली. यानंतर प्रशासन व्यवस्थेला जाग आली व रस्त्याचे पॅचवर्क सुरू करण्यात आले.**



सावळी-तानंग रस्त्याचे काम सुरू झाल्यानंतर ग्रामस्थांनी या ठिकाणी भेट देऊन पाहणी केली.

तक्रारदार ग्रामपंचायत सदस्य दीपक कारंडे, बजरंग माळी यांच्यासह पदाधिकारी व ग्रामस्थांनी येथील रस्ता दुरुस्ती कामाची पाहणी केली. याबाबत दीपक कारंडे व ग्रामस्थांकडून माहिती देण्यात आली की, रस्ता अत्यंत खराब झाला होता. अनेक वेळा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तक्रार करून सुद्धा याची दखल घेतली नाही.

यामुळे सरपंच सन्मती गणे, ग्रामपंचायत सदस्य दीपक कारंडे व ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेऊन रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला. तत्पूर्वी सरपंच गणे, ग्रामपंचायत सदस्य कारंडे, ग्रामसेवक बाबासाहेब खाडे व सदस्य यांनी रस्त्याची पाहणी करून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकृत पोर्टलवर रस्त्यावरील खड्ड्यांचे फोटो अपलोड केले.संबंधित अधिकाऱ्यांकडे दूरध्वनीद्वारे तक्रार दिली. या तक्रारीनंतर लगेचच दुसऱ्या दिवशी या रस्त्याच्या पॅचवर्कचे काम सुरू करण्यात आले आहे. रस्त्याचे काम सुरु झाल्यामुळे ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

# कोयना दूध संघ ३२ लाखांचा दर फरक देणार-धोकटे

कराड ,ता.७(प्रतिनिधी)-

..............................

**कोयना दूध संघाने दूध उत्पादकांना यावर्षी म्हैस दुधासाठी ५० पैसे तर गाय दुधासाठी ४० पैसेप्रमाणे सुमारे ३२.५ लाख रूपये दर फरक देण्याचा निर्णय घेतल्याचे प्रतिपादन संघाचे अध्यक्ष बाबुराव धोकटे यांनी केले.**

खोडशी (ता.कराड) येथे कोयना दूध संघाच्या ६९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. यावेळी अॅड.उदयसिंह पाटील,रयत कारखान्याचे उपाध्यक्ष आप्पासाहेब गरूड,प्रदीप पाटील, सतीश इंगवले, अनिल मोहिते, हणमंतराव चव्हाण,संपतराव इंगवले, मारूती यादव,साहेबराव शेवाळे, सीए तानाजीराव जाधव, संघाचे उपाध्यक्ष शिवाजीराव जाधव, सर्व संचालक आदींची प्रमुख उपस्थिती होती.

धोकटे म्हणाले,संघातर्फे भविष्यात नव्याने आईस्क्रीम, गुलाबजाम, कुल्फी आदी उत्पादन निर्मिती केली जाणार आहे. दूध संकलन वाढवण्यासाठी विविध योजना राबवून दूध उत्पादकांना न्याय देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. अॅड.उदयसिंह पाटील म्हणाले, कोयना दूध संघाच्या विकासाचा चढता आलेख ठेवण्यासाठी सर्व संचालक, अधिकारी व कर्मचारी उत्तमसेवा देण्याचा प्रयत्न करत आहेत. होतकरू युवकांनी एकत्र येऊन मुक्त गोठा पद्धत राबवावी व दूध उत्पादन वाढवावे. यासाठी कोयना दूध संघ सहकार्य करेल.सभेचे नोटीस वाचन संघाचे जनरल मॅनेजर नितीन बनगर यांनी केले. विषय पत्रिकेतील सर्व विषय बहुमताने खेळीमेळीच्या वातावरणात मंजूर करण्यात आले.सूत्रसंचालन गणेश जाधव यांनी केले. आभार संघाचे उपाध्यक्ष शिवाजीराव जाधव यांनी मानले.

यावेळी कोयना दूध संघ, खरेदी विक्री संघ, बाजार समिती, कोयना बँक,शामराव पाटील पतसंस्था आदींचे आजी-माजी संचालक तसेच प्राथमिक सहकारी दूध संघाचे प्रतिनिधी, चेअरमन, सचिव, दूध उत्पादक यांच्यासह संघाचे कर्मचारी उपस्थित होते.

# भरतगाववाडीच्या नूतन मिरवणूक रथास खास.उदयनराजेंची भेट

सातारा,ता.७(प्रतिनिधी)-

..............................

**नागठाणे गावचे स्वयंभू देवस्थान व ग्रामदैवत श्री गणेशाच्या कृपेने पावन झालेल्या भरतगाववाडी येथील आगामी होऊ घातलेल्या श्री गजानन भंडारा उत्सवासाठी सर्व ग्रामस्थ आणि तरुण वर्गाच्या पुढाकाराने कातर खटाव येथे तयार करण्यासाठी देण्यात आलेल्या नूतन देखण्या रथास खास.छत्रपती उदयनराजे भोसले यांनी सदिच्छा भेट दिली.**



याप्रसंगी रथाची सखोल पाहणी करून त्यांनी उपस्थितांशी आस्थेवाईकपणे संवाद साधला. या सदिच्छा भेट प्रसंगी सुनील काटकर, काका धुमाळ, डॉ.महेशराव गुरव, हिम्मतराव माने, तेजस जगताप, अमित कदम यांची प्रमुख उपस्थिती होती.नूतन रथाची निर्मिती अंतिम टप्प्यात असताना रथाचे कुशल कारागीर सचिन भांडवलकर, नितीन भांडवलकर आणि आकाश सुतार यांचा खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी खा.उदयनराजे भोसले यांनी त्यांच्या कामाचे कौतुक केले.

# ईश्वरपूरात १० जानेवारीला रंगणार 'नांदी साहित्य संमेलन'

### मसापच्या ईश्वरपूर कार्यकारिणी बैठकीत निर्णय

ईश्वरपूर,ता.७(प्रतिनिधी)-

..............................

**येथील 'नांदी साहित्य संमेलन' येत्या जानेवारी महिन्यात आयोजित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा ईश्वरपूरच्या कार्यकारिणी बैठकीत एकमुखाने घेण्यात आला.**

राजारामबापू ज्ञानप्रबोधिनीच्या सभागृहात पार पडलेल्या या बैठकीच्या अध्यक्षस्थानी राजारामबापू पाटील ज्ञानप्रबोधिनीचे अध्यक्ष प्रा. शामराव पाटील होते. जानेवारी २०२७ मध्ये पुण्यात १०० वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन संपन्न होत आहे. या शताब्दी संमेलनाच्या पार्श्वभूमीवर राज्यभरात ९९ पूर्वतयारी नांदी साहित्य संमेलने आयोजित केली जात आहेत. त्यातील एक महत्त्वपूर्ण संमेलन ईश्वरपूर येथे घेण्याचा निर्णय प्रा. पाटील यांनी यावेळी जाहीर केला.प्रारंभी शाखेचे अध्यक्ष प्रा.सुभाष खोत यांनी स्वागत केले. कार्याध्यक्ष धर्मवीर पाटील यांनी मागील सभेचा आढावा घेतला.

या बैठकीस प्रा.डॉ.दीपक स्वामी,प्रा.डॉ.दीपा विवेक देशपांडे, आनंदहरी,प्रा.दशरथ पाटील,सुनील पाटील, गणेश पोतदार, प्रा.डॉ.संजय थोरात,प्रा.डॉ.संदीप पाटील, उदयसिंह पाटील,प्रा.प्रकाश जाधव, डॉ.अर्चना थोरात, उत्तम सावंत, सूर्यकांत शिंदे, प्रा.शैलजा यादव-पाटील, भारती पाटील, डॉ.संजीव घोरपडे आदी मान्यवर व कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते. डॉ.कालीदास पाटील यांनी आभार मानले.

# डीजे-डॉल्बीमुक्त उत्सव साजरा करावा

### कराड-मलकापूरमधील सामाजिक संस्थांचे आवाहन

कराड ,ता.७(प्रतिनिधी)-

..............................

**उत्सव, सण-समारंभ, मिरवणुका तसेच वाढदिवसासारख्या कार्यक्रमांमध्ये मोठ्या आवाजातील डीजे-डॉल्बी, लेझर लाईट आणि प्लाझ्माचा वाढता वापर आरोग्य, पर्यावरण आणि सामाजिक शांततेसाठी घातक ठरत असल्याने या साधनांचा वापर टाळण्याचे आवाहन कराड-मलकापूरमधील विविध सामाजिक संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी केले. त्याऐवजी पारंपारिक वाद्ये,अभंग, देशभक्तीपर गीते, लेझीम, मृदंग, टाळ, दांडपट्टा आदी सांस्कृतिक उपक्रमांच्या माध्यमातून उत्सव साजरा करण्याचा निर्धार चर्चासत्रात करण्यात आला.**



कराड येथील छत्रपती शिवाजी उद्यान येथे आयोजित चर्चासत्रात आगामी दहीहंडी, गणेशोत्सव, नवरात्रोत्सव तसेच विविध धर्मांच्या सण-समारंभांच्या पार्श्वभूमीवर ध्वनीप्रदूषणाचा प्रश्न उपस्थित करण्यात आला. मोठ्या आवाजामुळे ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, आजारी व्यक्ती, गर्भवती महिला, तसेच पशुपक्ष्यांना त्रास होण्याबरोबरच परिसरातील शांततेवरही परिणाम होत असल्याचे यावेळी नमुद करण्यात आले.

कृत्रिम ध्वनीवर्धकांचा अतिवापर टाळणे ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून नागरिकांनीही सामाजिक बांधिलकी म्हणून त्याला प्रतिसाद देणे गरजेचे आहे. पोलिसांकडून ध्वनीची मर्यादा निश्चित केली जात असली तरी कायद्याच्या चौकटीत राहूनही नागरिकांनी स्वच्छेने मोठ्या आवाजाचे ध्वनीवर्धक टाळल्यास उत्सव अधिक आनंददायी आणि शांततापूर्ण होऊ शकतात, असा सूर चर्चेत उमटला.लेझर लाईटचा अनियंत्रित वापर डोळ्यांसाठी, तसेच मोबाईल आणि कॅमेऱ्यांच्या सेन्सरसाठी नुकसानकारक ठरू शकतो.त्यामुळे उत्सवातील मनोरंजन आणि आनंदाच्या नावाखाली आरोग्याला धोका निर्माण करणाऱ्या साधनांचा वापर करण्यापेक्षा सांस्कृतिक व पारंपारिक उपक्रमांना प्राधान्य द्यावे, असे आवाहन करण्यात आले.

देशातील काही शहरांमध्ये आणि गावांमध्ये डीजे-डॉल्बीमुक्त उत्सवांचे प्रयोग सुरू असून, पारंपारिक वाद्ये आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून शांततेत उत्सव साजरे केले जात आहेत. कराड-मलकापूर परिसरातही अशी सकारात्मक परंपरा निर्माण करण्यासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा,असे आवाहन उपस्थित मान्यवरांनी केले.

# कराड येथे झिम्मा-फुगडी स्पर्धा उत्साहात संपन्न

कराड ,ता.७(प्रतिनिधी)-

..............................

**येथील लायन्स क्लब कराड सिटी व शिवाजी हौसिंग सोसायटी महिला ग्रुप यांच्यातर्फे येथील शिवाजी हायस्कूलच्या प्रांगणात झिम्मा-फुगडी स्पर्धा घेण्यात आल्या.अनेक महिलांनी याचा लाभ घेतला. त्यामधील उत्कृष्ठ तीन महिलांना वाणसामानांचे साहित्य बक्षीस म्हणून देण्यात आले.**

महिलांनी पारंपारिक खेळाची परंपरा जोपासावी, ती पुढील पिढीमध्ये उतरावी, तसेच विचारांची देवाणघेवाण व्हावी, यासाठी हा उद्देश ठेवून हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी लायन्स क्लब कराड सिटीच्या अध्यक्षा सुनीता पाटील, मनीषा भोसले, अंजली चव्हाण, प्रगती पाटील, शिवाजी हौसिंग सोसायटीच्या अध्यक्षा सुनीता जाधव, पौर्णिमा जाधव व सदस्या उपस्थित होत्या.

# वसना-वांगणा योजनेद्वारे सहा पाझर तलाव भरले

## ३५ गावांना होणार लाभ; आम.महेश शिंदे यांच्या प्रयत्नांना यश

कोरेगाव,ता.७(वार्ताहर)-

..............................

**कोरेगाव विधानसभा मतदारसंघाचे आम.महेश शिंदे यांच्या प्रयत्नांना मोठे यश आले असून, धोम धरणातून पुरावाटे वाया जाणारे पाणी प्रथमच दुष्काळी भागाकडे वळविण्यात आले आहे.**



वसना-वांगणा उपसा जलसिंचन योजना कार्यान्वित करून धोम कालव्यातून सोडण्यात आलेले पाणी किन्हई येथील पंपगृहातून उपसा करण्यास सुरुवात झाली असून, या पाण्यामुळे रुई, आझादपूरसह सहा पाझर तलाव भरून घेण्यात आले आहेत. अरबवाडी तलाव भरण्याच्या मार्गावर आहे. एकूणच कोरेगाव तालुक्याच्या पूर्व व उत्तर भागातील ३५ गावांमधील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, हाता-तोंडाशी आलेली पिके वाचण्यास मदत होणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा डॉ. सौ. प्रियाताई महेश शिंदे यांनी दिली.

किन्हई येथील पंपगृहातून पाणी उपसा करण्याचा शुभारंभ ता.१६ ऑगस्ट रोजी डॉ. सौ. प्रियाताई शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला होता. यावेळी सातारारोड आणि कुमठे जिल्हा परिषद गटातील सर्वसामान्य ग्रामस्थ व शेतकऱ्यांच्या उपस्थितीत धोम कालव्यात पाणीपूजन करून कृष्णामाईची ओटी भरण्यात आली. त्यानंतर पंपगृहातील बटन दाबून मोटर सुरू करण्यात आली आणि दुष्काळी भागाकडे पाणी वळविण्याच्या महत्त्वपूर्ण उपक्रमाला सुरुवात झाली होती. अवघ्या २० दिवसात सहा पाझर तलाव भरले आहेत.

डॉ.प्रियाताई शिंदे पुढे म्हणाल्या की, आमदार महेश शिंदे हे भूमिपुत्र असून कोरेगाव तालुक्याच्या पूर्व व उत्तर भागातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांची त्यांना विशेष काळजी आहे.गुरुवर्य कै. लक्ष्मणरावजी इनामदार जिहे-कठापूर उपसा जलसिंचन योजनेच्या माध्यमातून हा संपूर्ण भाग हिरवागार करण्याचा त्यांचा निर्धार आहे.

धोम धरणातून पुराचे पाणी सोडण्यास सुरुवात झाल्यानंतर जिल्हा परिषद सदस्य हणमंतराव जगदाळे यांनी धोम कालव्याद्वारे पाणी आणून वसना-वांगणा योजना कार्यान्वित करण्याची मागणी केली होती. त्यानुसार संबंधित यंत्रणेला पत्र देण्यात आले. त्यानंतर आमदार महेश शिंदे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याशी चर्चा करून धोम धरणाचे पाणी दुष्काळी भागाकडे वळविण्यासाठी पाठपुरावा केला. जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनीही या कामासाठी मोठी मदत केली,असे डॉ.प्रियाताई शिंदे यांनी सांगितले.

जिल्हा परिषद सदस्य हणमंतराव जगदाळे म्हणाले की, आम.महेश शिंदे यांनी खऱ्या अर्थाने वसना-वांगणा उपसा जलसिंचन योजनेला नवसंजीवनी दिली आहे. अनेक वर्षांपासून ही योजना चालू-बंद अवस्थेत होती. परदेशी तंत्रज्ञानाच्या आधारे योजना राबविण्याचा प्रयत्न झाला, मात्र प्रत्यक्षात तिचा पुरेपूर उपयोग झाला नाही.

# कराड शहरातील जुन्या इमारतींना मिळणार नवसंजीवनी

कराड ,ता.७(प्रतिनिधी)-

..............................

**शहरी भागातील मध्यवर्ती पेठ भागांसह जुन्य गावठाणातील वर्षानुवर्षे नवीन नळ जोडणी किंवा जलनिस्सारणाची सुविधा व्हावी, यासाठी पुनर्बांधणीच्या जाचक अटीत अडकलेल्या इमारतींना शासनाने दिलासा दिला आहे.**

नगर विकास विभागाने 'ईझ ऑफ लिव्हिंग' आणि 'ईझ ऑफ डुइंग बिझनेस' अंतर्गत जुन्या इमारतींना रेन वॉटर हार्वेस्टिंग आणि घनकचऱ्यासह जैव-गाळ व्यवस्थापन करण्याची अट घातली आहे.अटीनुसार नवीन युटिलिटी कनेक्शन्स देण्यास मंजुरी दिली आहे. त्यामुळे जुन्या इमारतींना संजीवनी मिळणार आहे. शहरात किमान तीन हजार इमारतींना त्याचा लाभ होण्याची शक्यता अभ्यासकांनी वर्तवली आहे. कराड पालिकेच्या हद्दीत वाणिज्यच्या सात हजार ५०२, तर निवासी १४ हजार ८६५ अशा दोन्ही मिळून २२ हजार ०४५ नोंदणीकृत इमारती आहे. त्यापैकी शनिवार पेठ, रविवार, सोमवार, मंगळवारासह हद्दवाढ भागात सुमारे तीन हजार जुन्या इमारती आणि वाड्यांना शासनाच्या नव्या कार्यपद्धतीचा थेट फायदा होणार आहे. जुन्या पेठेतील इमारतींना पायाभूत सोयीसुविधा देताना नियमांचे अडसर येणार नाही. नव्या निर्णयामुळे रेन वॉटर हार्वेस्टिंगद्वारे भूजल पातळी वाढण्यास मदत होईल. नागरिकांना पाणी व ड्रेनेजची जोडणी कायदेशीररीत्या सुलभतेने मिळेल, अशी अपेक्षा आहे. इमारतीचे बांधकाम मंजूर व स्टॅबिलिटी प्रमाणपत्र वैध असावे. रेन वॉटर हार्वेस्टिंग अथवा बायो-स्लज सिस्टिम बसवण्याची पुरेशी सुविधा असावी. प्रकल्पाच्या अंमलबजावणीवेळी कायदेशीर नियमांचे तंतोतंत पालन करणे बंधनकारक आहे.

महासत्ता इचलकरंजी
# आरोग्य
१०
मंगळवार
८ सप्टेंबर २०२६





## पितृत्वालाही वयोमर्यादा

**आजवर** प्रजनन क्षमता या विषयांत केवळ महिलांच्या वयाला महत्त्व दिले गेले आहे. मात्र वडिलांचे वाढते वयही गर्भधारणा, गर्भाचा विकास आणि संततीच्या आरोग्यावर परिणामकारक ठरु शकतो, असे संशोधनातून समोर आले आहे.

गर्भधारणा तसेच अपत्यप्राप्तीकरिता मातेचे वय महत्त्वाचे मानले जाते. मात्र संततीप्राप्तीसाठी केवळ आईच्याच नव्हे तर वडिलांचेही वय महत्त्वाचे ठरते हे आता संशोधनातून समोर येत आहे. गर्भधारणेसाठी केवळ मातेचेच नव्हे तर वडिलांचे वयदेखील परिणामकारक ठरते. संततीप्राप्तीसाठी वडिलांचे वय उलटून गेले असेल तर गर्भधारणेत समस्या उद्भवतात. याचा फटका नवजात शिशूलाही बसतो. गर्भधारणेची शक्यता धूसर होत जाते. गर्भधारणा झाल्यानंतरही प्रसूतीकाळापर्यंत अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. गर्भाशयातील मूलाच्या आरोग्याला सतत धोका जाणवतो. मूल जन्मल्यानंतरही आरोग्याच्या तक्रारी सुरु राहतात. वडिलांचे वय जास्त असल्यास जन्मलेल्या मूलाच्या आरोग्यावर दीर्घकालीन परिणाम दिसून येतो, असे या संशोधनातून स्पष्टपणे नमूद आले आहे.



गर्भधारणेच्यावेळी पुरुषाच्या वयाला वडिलांचे वय असे संबोधले जाते. किशोरवयापासूनच पुरुषांमधील प्रजनन क्षमतेची सुरुवात होते. या वयात त्यांच्या शरीरात बदल होत असतात. या बदलांमुळे शुक्राणूंची निर्मिती आणि टेस्टोस्टेरॉन या संप्रेरकाचा स्त्राव सुरु होतो. विसाव्या वर्षी शुक्राणूंची संख्या, त्यांची हालचाल आणि संप्रेरकांचे संतुलन हळूहळू स्थिर होते. साधारणपणे वयाच्या २५ ते ३५ वर्षांच्या दरम्यान पुरुषांची प्रजनन क्षमता पूर्णपणे विकसित झालेली असते. या वयोगटातील पुरुषांमध्ये शुक्राणूंची संख्या स्थिरावते. त्यांना पुरेशी गती प्राप्त होते. डीएनएची गुणवत्ताही सुधारते. त्यामुळे गर्भधारणेची शक्यता वाढते. गर्भधारणेतील भ्रूण निरोगी जन्माला येण्याची शक्यता दुणावते.

पुरुषांची प्रजनन क्षमता वाढत्या वयामुळे संपुष्टात येत नाही, असे अनेक अभ्यासांतून सिद्ध झाले आहे. प्रजनन प्रक्रियेची कार्यक्षमता हळूहळू कमी होत जाते. वयाच्या पस्तीशीनंतर शुक्राणूंच्या गुणवत्तेत लक्षणीय बदल दिसू लागतात. चाळीशीनंतर हे बदल प्रखरतेने दिसून येतात. हा नैसर्गिक बदल तसेच याबाबतीतील कालमर्यादा समजून घेणे आवश्यक आहे. त्यामुळे तरुण जोडप्यांना कुटुंब नियोजनाबत योग्य निर्णय घेण्यास मदत होईल.



## २० ते ४० वयोगटातील महिलांमध्ये वाढतोय हा गंभीर धोका!

**अलीकडच्या** काळात २० ते ४० वयोगटातील महिलांमध्ये स्तनातील गाठी आढळण्याचे प्रमाण वाढत असल्याचे तज्ज्ञांनी सांगितले आहे. जरी या गाठींपैकी बहुतांश गाठी कर्करोगाच्या नसल्या तरी स्तनात जाणवणाऱ्या कोणत्याही नव्या गाठीकडे दुर्लक्ष करू नये आणि त्वरित वैद्यकीय सल्ला घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

पूर्वी स्तनातील गाठींची समस्या प्रामुख्याने वयोवृद्ध महिलांमध्ये दिसून येत होती. मात्र, आता २०, ३० आणि ४० वर्षांच्या वयोगटातील महिला देखील स्तनाशी संबंधित तक्रारी घेऊन डॉक्टरांकडे येत आहेत. बदलती जीवनशैली, लठ्ठपणा, हार्मोन्समधील असंतुलन, उशिरा होणारी गर्भधारणा, कुटुंबातील स्तनाच्या कर्करोगाचा वैद्यकीय इतिहास तसेच महिलांमध्ये वाढलेली जागरूकता ही या वाढत्या प्रमाणामागील संभाव्य कारणे असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

स्तनात 'ही' लक्षणं दिसली तर वेळीच द्या लक्ष मदरहूड हॉस्पिटल, लुल्लानगर, पुणे येथील प्रसूती व स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. सुजाता उदय राजपूत म्हणाल्या, दर आठवड्याला २५ ते ४५ वयोगटातील सुमारे १० पैकी ३ महिला स्वयं स्तन तपासणी करताना किंवा दैनंदिन काम करताना स्तनात गाठ जाणवल्यामुळे रुग्णालयात उपचारासाठी येतात. या गाठींपैकी अनेक गाठी फायब्रोॲडेनोमा, सिस्ट, हार्मोन्समधील बदल किंवा संसर्गामुळे निर्माण झालेल्या आणि कर्करोगाशी संबंधित नसतात. मात्र, स्तनात सतत जाणवणारी गाठ, स्तनाच्या आकारात किंवा स्वरूपात बदल, स्तनाग्रातून स्त्राव होणे, त्वचेवर खड्डा पडणे, स्तनाग्र आतल्या दिशेने ओढले जाणे किंवा काखेत सूज येणे अशी लक्षणे आढळल्यास त्वरित तपासणी करणे आवश्यक आहे. योग्य वेळी वैद्यकीय तपासणी आणि आवश्यक इमेजिंग चाचण्यांद्वारे गाठीचे कारण शोधता येते आणि गरज असल्यास वेळीच उपचार सुरू करता येतात.

तपासणी आवश्यक त्या पुढे म्हणाल्या, अनेक तरुण महिलांना असे वाटते की या तरुण वयात आपल्याला स्तनाचा कर्करोग होऊच शकत नाही आणि हा एक गैरसमज असतो. त्यामुळे त्या डॉक्टरांकडे जाण्यास विलंब करतात. स्तनात जाणवलेली कोणतीही नवीन गाठ काही आठवडे कायम राहिल्यास तिच्याकडे दुर्लक्ष करू नये. स्तनांविषयी जागरूक राहणे, नियमित स्वयं स्तन तपासणी करणे, निरोगी जीवनशैलीचा अवलंब करणे आणि ज्या महिलांना धोका अधिक आहे त्यांनी नियमित तपासणी करून घेणे, यामुळे स्तनाचा कर्करोग असल्यास तो सुरुवातीच्या टप्प्यात ओळखता येतो. वेळीच उपचार केल्यास महिलांचे आरोग्य आणि जीवनमान सुधारण्यास मदत होते.

गाठीची तपासणी होणे अत्यंत आवश्यक डॉ. राजपूत यांनी सांगितले की, स्तनांच्या आरोग्याबाबत जागरूकता हेच सर्वात प्रभावी शस्त्र आहे. दर आठवड्याला २५ ते ४५ वयोगटातील सुमारे १० पैकी २ महिला गाठ आपोआप नाहीशी होईल किंवा ती गंभीर नसेल, या समजुतीमुळे डॉक्टरांचा सल्ला घेण्यास उशीर करतात. प्रत्येक महिलेने नियमित स्वयं स्तन तपासणी करावी, कोणताही असामान्य बदल जाणवल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घ्यावा, वजन नियंत्रणात ठेवावे, नियमित व्यायाम करावा आणि कुटुंबात स्तनाच्या कर्करोगाचा वैद्यकीय इतिहास असल्यास डॉक्टरांना त्याची माहिती द्यावी.

प्रत्येक गाठ ही कर्करोगाचीच असते असे नाही, मात्र प्रत्येक गाठीची तपासणी होणे अत्यंत आवश्यक आहे. वेळेत निदान झाल्यास गंभीर आजार टाळतात येतो, अनावश्यक भीती कमी होते आणि आवश्यक उपचार त्वरित सुरू करता येतात.

## रोज सकाळी रिकाम्या पोटी चहा पिणे आरोग्यासाठी अत्यंत घातक

**भारतात** सकाळी उठल्याबरोबर गरमागरम चहा पिणाऱ्यांची संख्या खूप मोठी आहे. सकाळी चहा प्यायल्याने शरीराला तरतरी येते आणि आळस दूर होतो, असा अनेकांचा समज असतो. मात्र, वैद्यकीय तज्ज्ञांच्या मते, रोज सकाळी रिकाम्या पोटी चहा पिणे आरोग्यासाठी अत्यंत घातक आणि धोकादायक ठरू शकते. जर तुम्हालाही सकाळी उठल्याबरोबर चहा पिण्याची सवय असेल, तर या सवयीमुळे आरोग्यावर होणाऱ्या भयंकर परिणामांबद्दल नक्की जाणून घ्या.

ॲसिडिटी आणि पचनक्रिया पूर्णपणे बिघडणे–सकाळी उठल्यानंतर आपल्या पोटात ॲसिडची पातळी आधीच वाढलेली असते. अशा वेळी उपाशीपोटी चहा प्यायल्याने, चहामधील ॲसिड आणि पोटातील नैसर्गिक ॲसिड एकत्र येतात. यामुळे पोटात प्रचंड गॅस, गंभीर ॲसिडिटी आणि छातीत जळजळ होण्याची समस्या निर्माण होते. ही सवय दीर्घकाळ राहिल्यास पोटात अल्सर होण्याचा मोठा धोका असतो. तसेच, पचनासाठी लागणारे पाचक रस बिघडल्यामुळे अपचन आणि बद्धकोष्ठतेचा त्रास सुरू होतो.

शरीरात पाणी आणि पोषक तत्वांची तीव्र कमतरता– चहामध्ये कॅफिन असते, जे शरीरात मूत्राशय उत्तेजित करण्याचे काम करते. यामुळे सकाळी उपाशीपोटी चहा प्यायल्यानंतर वारंवार लघवीला जावे लागते. रात्रीच्या झोपेनंतर शरीर आधीच डिहायड्रेटेड असते; त्यात चहा प्यायल्याने शरीरात पाण्याची प्रचंड कमतरता निर्माण होते.याशिवाय चहामध्ये 'टॅनिन'नावाचा घटक असतो. हा घटक अन्नातून मिळणारे आयर्न (लोह) आणि कॅल्शियम शरीरात शोषले जाण्यापासून रोखतो. यामुळे शरीरात रक्ताची कमतरता निर्माण होऊन हाडे कमकुवत होतात आणि सतत थकवा जाणवतो.

दात खराब होणे आणि निद्रानाश– सकाळी आपल्या तोंडात बॅक्टेरियाची पातळी वाढलेली असते. अशा वेळी साखरेचा चहा प्यायल्याने,चहातील गोडवा आणि ॲसिड तोंडातील बॅक्टेरियासोबत मिसळून दातांच्या संरक्षणात्मक थराला इजा पोहोचवतात. यामुळे दात किडणे,दातांवर पिवळेपणा येणे आणि कॅव्हिटीची समस्या निर्माण होते.

त्याचप्रमाणे, उपाशीपोटी चहाचे म्हणजे कॅफिनचे सेवन केल्याने शरीरातील चेतातंतू अचानक उत्तेजित होतात. यामुळे हृदयाचे ठोके वेगाने वाढणे, घाबरल्यासारखे वाटणे, चिडचिड होणे आणि मानसिक ताण वाढणे यांसारखे त्रास होतात. याचा थेट परिणाम रात्रीच्या झोपेवरही होतो. त्यामुळे उपाशीपोटी चहा घेणं शक्यतो टाळावं असा सल्ला डॉक्टर देतात.



## बिडी-सिगारेटचे व्यसन कसे सोडावे?

**मौजेखातर** केलेले धूम्रपान कालांतराने कधी व्यसनात बदलते हे त्या व्यक्तीलाही कळत नाही. व्यसनाधीनता फक्त मुलांपुरतीच मर्यादित राहिलेली नसून मुलीसुद्धा त्याच्या आहारी जात असल्याचे विविध अहवाल सांगतात. आज देशातील लाखो युवक–युवती धूम्रपान तसेच मद्यपानाच्या विळख्यात अडकल्याचे दिसून येतात. धूम्रपान आरोग्यासाठी अत्यंत हानिकारक असल्याची कल्पना बऱ्याच लोकांना असते. तरीदेखील त्याचे व्यसन सोडणे अनेकांसाठी अत्यंत आव्हानात्मक ठरते. या पार्श्वभूमीवर धूम्रपानाचे प्रमाण कसे कमी करावे आणि त्यापासून हळूहळू कसे मुक्त व्हावे? याबाबत तज्ज्ञांनी अत्यंत महत्वाचा सल्ला दिला आहे, त्याविषयीः

**बिडी-सिगारेटचे व्यसन नेमके कसे सोडावे?**

दिल्लीतील इंद्रप्रस्थ अपोलो रुग्णालयातील कर्करोगतज्ज्ञ डॉ. अक्षत मलिक यांच्या मते, एखाद्या व्यक्तीला बिडी–सिगारेट ओढण्यास कोणती गोष्ट प्रवृत्त करते हे ओळखणे अत्यंत गरजेचे असते. अनेकांना चहा किंवा कॉफी घेताना, जेवणानंतर, कामातील ब्रेकदरम्यान, मद्यपान करताना किंवा तणावाखाली असताना धूम्रपान करण्याची इच्छा होते. त्यामुळे अशा परिस्थिती आणि सिगारेट यांच्यातील संबंध ओळखणे अत्यंत महत्वाचे ठरते. धूम्रपान करण्याची इच्छा झाल्यानंतर लगेच सिगारेट न ओढता काही वेळ त्याकडे दुर्लक्ष करणे फायदेशीर ठरू शकते. दोन सिगारेट ओढण्यामधील कालावधी हळूहळू वाढवत नेल्यास दिवसाभरातील सिगारेटची संख्या आपोआप कमी होण्यास मदत होते. दरम्यान, सिगारेट ओढण्याचे प्रमाण कमी करण्याऐवजी पूर्णपणे धूम्रपान बंद करणे हेच मुख्य उद्दिष्ट असले पाहिजे, असेही डॉ. मलिक यांनी सांगितले.

**धूम्रपान सोडण्यास निकोटीन गम मदत करतात का?**

सिगारेट किंवा तंबाखूचे व्यसन सोडताना बाजारात उपलब्ध असलेले विविध निकोटीन गम आणि निकोटीन पॅचही काही प्रमाणात उपयुक्त ठरू शकतात. या उत्पादनांमुळे सिगारेट ओढण्याची तीव्र इच्छा नियंत्रणात ठेवणे शक्य होते असा अनेकांचा समज आहे. धूम्रपान कमी करण्यासाठी किंवा पूर्णपणे सोडण्यासाठी काही उत्पादने अत्यंत प्रभावी ठरत असल्याचे समाजमाध्यमांवर दावे केले जातात; पण अशा उत्पादनांच्या परिणामकारकतेबाबत तितके ठोस वैज्ञानिक पुरावे उपलब्ध नाहीत. त्यामुळे निकोटीन गम आणि निकोटीन पॅच याकडे धूम्रपान सोडण्यासाठीच्या वैद्यकीयदृष्ट्या सिद्ध पर्याय म्हणून पाहू नये, असा इशाराही डॉक्टर मलिक यांनी दिला.

**धूम्रपान सोडण्यास मोबाईल उपकरणे किती फायदेशीर?**

डॉ. मलिक यांच्या मते, धूम्रपान कमी करण्यासाठी किंवा सोडण्यासाठी काही मोबाईल उपकरणेही (ॲप्स) अनेकांसाठी फायदेशीर ठरू शकतात. विशेषतः दिवसभरात किती सिगारेट ओढल्या जातात याची नोंद ठेवणे, धूम्रपानाची इच्छा निर्माण करणारे ट्रिगर्स ओळखणे, व्यसन सोडण्याचे उद्दिष्ट निश्चित करणे आणि प्रगतीचा मागोवा घेणे, यासाठी या उपकरणांची मदत होऊ शकते. मात्र, अशी उपकरणे केवळ सहाय्यक म्हणून काम करतात आणि ते धूम्रपान सोडवण्याचा एकमेव उपाय असू शकत नाहीत. वारंवार प्रयत्न करूनही जर एखाद्या व्यक्तीला धूम्रपान सोडण्यात अपयश येत असेल, तर केवळ मोबाईल उपकरणांवर अवलंबून न राहता तज्ज्ञांचे समुपदेशन किंवा डॉक्टरांच्या सल्ल्याने घेतलेली औषधे अधिक प्रभावी ठरतात, असा सल्लाही डॉ. मलिक यांनी दिला आहे.



**धूम्रपान हा केवळ इच्छाशक्तीचा विषय आहे का?**

धूम्रपान करणे किंवा सोडणे ही केवळ प्रबळ इच्छाशक्तीची बाब नाही. बिडी–सिगारेटमध्ये असलेल्या निकोटीनचा मेंदूतील मरिवॉर्ड सिस्टीमफवर परिणाम होतो आणि वारंवार धूम्रपान केल्याने त्याचे व्यसन लागू शकते. त्याचबरोबर धूम्रपानाची सवय विशिष्ट दिनचर्या, भावना आणि परिस्थितींशी जोडली जाते. त्यामुळेच एखाद्या व्यक्तीला धूम्रपान सोडण्याची तीव्र इच्छा असूनही ते सोडणे कठीण जाऊ शकते. अशा वेळी निकोटीन रिप्लेसमेंट थेरपी, औषधोपचार आणि वर्तणुकीशी संबंधित समुपदेशन यांच्या मदतीने हे व्यसन सोडणे अधिक सोपे होऊ शकते, असेही डॉ. मलिक यांनी सांगितले.

**धूम्रपानाचा शरीरातील अवयवांवर काय परिणाम होतो?**

डॉ. मलिक यांच्या मते, धूम्रपानाचा परिणाम केवळ फुफ्फुसांपुरता मर्यादित राहत नाही. शरीरातील रक्तवाहिन्यांवरही त्याचा परिणाम होतो. त्यामुळे हृदयविकाराचा झटका, स्ट्रोक आणि पायांमध्ये रक्ताभिसरण कमी होण्याचा धोका वाढतो. याशिवाय धूम्रपानामुळे तोंड, घसा, अन्ननलिका, मूत्राशय आणि स्वादुपिंडाच्या कर्करोगासह इतर अनेक प्रकारच्या कर्करोगांचा धोका वाढतो. प्रजनन क्षमता, हाडांचे आरोग्य,तोंडाचे आरोग्य आणि जखम भरून येण्याच्या प्रक्रियेवरही धूम्रपानाचा परिणाम होऊ शकतो. महत्त्वाचे म्हणजे, धूम्रपानामुळे एखाद्या व्यक्तीला श्वास घेण्यास त्रास किंवा खोकल्यासारखी फुफ्फुसांशी संबंधित कोणतीही स्पष्ट लक्षणे दिसत नसली, तरीही त्याच्या शरीराच्या आत हे घातक परिणाम हळूहळू विकसित होत असतात, असा इशाराही डॉ.मलिक यांनी दिला आहे.

**धूम्रपान करणे आरोग्यासाठी कसे घातक ठरते?**

तज्ज्ञांच्या मते, नियमित धूम्रपान आणि मद्यपान करणाऱ्या व्यक्तींनी शक्य तितक्या लवकर या दोन्ही व्यसनांपासून दूर जाण्याचा प्रयत्न करायला हवा. ही दोन्ही व्यसने एकत्र असल्यास त्यांचा शरीरावर परस्परपूरक परिणाम होतो. त्यामुळे तोंड, घसा व अन्ननलिकेच्या कर्करोगाचा धोका केवळ एकाच व्यसनाच्या तुलनेत अनेक पटींनी वाढतो. काहींसाठी कदाचित धूम्रपान आणि मद्यपान एकाच वेळी सोडणे कठीण वाटू शकते; पण अशा परिस्थितीत सर्वसाधारणपणे आधी धूम्रपान सोडण्याचा निर्णय घेतल्यास त्याचा आरोग्याच्या दृष्टीने मोठा फायदा होतो. धूम्रपान सोडल्याचे फायदे जवळपास तत्काळ दिसू लागतात. काही आठवड्यांतच शरीरातील रक्ताभिसरण आणि फुफ्फुसांचे कार्य सुधारते. तसेच कालांतराने हृदयविकार, पक्षाघात आणि कर्करोगाचा धोका सातत्याने कमी होत जातो. मात्र, व्यसनमुक्तीसाठी एकच उपाय सर्वांवर लागू होत नाही, असेही तज्ज्ञांनी स्पष्ट केले.

**सिगारेटच्या व्यसनापासून दूर कसे जायला हवे?**

धूम्रपान असो किंवा मद्यपान, कोणतेही व्यसन सोडणे हा सकारात्मक निर्णय आहे. मात्र, उपचाराची रणनीती प्रत्येक व्यक्तीच्या गरजेनुसार ठरवली पाहिजे. एखाद्या व्यक्तीची निकोटीन आणि मद्यावरील अवलंबित्वाची तीव्रता, रुग्णाची व्यसन सोडण्याची तयारी, मानसिक आरोग्य आणि इतर आजारांचा विचार करूनच आरोग्यतज्ज्ञ योग्य उपचाराची योजना आखतात. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली उपचार घेतल्यास दीर्घकाळ व्यसनमुक्त राहण्याची शक्यता लक्षणीयरीत्या वाढते. व्यसनाधीन व्यक्तीचे समुपदेशन, निकोटीन रिप्लेसमेंट थेरपी, मद्यपान कमी करण्यासाठीची औषधे, तसेच वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध उपचारपद्धती यांचा अवलंब केल्यास व्यसनमुक्ती यशस्वी होण्याची आणि ती दीर्घकाळ टिकून राहण्याची शक्यता अधिक असते, असा निष्कर्षही तज्ज्ञांनी मांडला आहे.

## मूत्रमार्गातून जळजळ आणि तापसुद्धा येतो का?

**शरीरात** काही गडबड सुरू झाली की ते अनेकदा वेगवेगळ्या लक्षणांच्या माध्यमातून आपल्याला संकेत देत असते. मात्र, अनेकजण ही लक्षणं किरकोळ समजून दुर्लक्ष करतात. लघवी करण्याच्या सवयीमध्ये झालेला बदल किंवा लघवी करताना होणारी जळजळ हेदेखील आरोग्याशी संबंधित महत्त्वाचे संकेत असू शकतात.

अनेक दिवसांपासून लघवी करताना जळजळ जाणवत असेल तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. कधी कधी शरीरातील पाण्याची कमतरता किंवा इतर कारणांमुळेही अशी समस्या होऊ शकते. मात्र, जळजळीसोबत वारंवार लघवी होणे, अचानक तीव्र लघवीची इच्छा होणे, पोटाच्या खालच्या भागात दुखणे आणि ताप येणे अशी लक्षणं दिसत असतील तर ते युरिनरी ट्रॅक्ट इन्फेक्शन म्हणजेच चे संकेत असू शकतात.

युरिनरी ट्रॅक्ट इन्फेक्शन म्हणजे मूत्रमार्गाच्या कोणत्याही भागात होणारा संसर्ग. बॅक्टेरिया मूत्रमार्गातून शरीरात प्रवेश करून मूत्राशयापर्यंत पोहोचू शकतात. काही परिस्थितींमध्ये संसर्ग किडनीपर्यंतही पोहोचू शकतो. महिलांमध्ये तुलनेने अधिक आढळतो, मात्र पुरुषांनाही होऊ शकतो. त्यामुळे लक्षणं कोणामध्येही दिसली तरी ती गांभीर्याने घेणं महत्त्वाचं आहे.

लघवी करताना जळजळ? या लक्षणांकडे लक्ष द्या



- लघवी करताना जळजळ किंवा वेदना होणे
- वारंवार लघवीला जावेसे वाटणे
- लघवीची तीव्र इच्छा होणे
- वारंवार इच्छा होऊनही कमी प्रमाणात लघवी होणे
- पोटाच्या खालच्या भागात दुखणे किंवा अस्वस्थता जाणवणे
- लघवीला असामान्य किंवा तीव्र वास येणे

ही लक्षणं जाणवत असतील तर स्वतःहून औषधं घेण्याऐवजी डॉक्टरांचा सल्ला घेणं योग्य ठरतं.

जळजळीसोबत ताप आणि थंडी वाजत असेल तर सावध

लघवी करताना जळजळ आणि त्यासोबत ताप, थंडी वाजणे किंवा कंबर किंवा पाठीच्या बाजूला दुखणे अशी लक्षणं दिसत असतील तर त्याकडे विशेष लक्ष द्या. काही वेळा संसर्ग मूत्राशयापासून वरच्या मूत्रमार्गातून किडनीपर्यंत पोहोचू शकतो. त्यामुळे अशी लक्षणं दिसल्यास वैद्यकीय तपासणी लवकर करून घेणं महत्त्वाचं आहे.

महिलांचा मूत्रमार्ग पुरुषांच्या तुलनेत लहान असल्याने बॅक्टेरियांना मूत्रमार्गातून मूत्राशयापर्यंत पोहोचणं तुलनेने सोपं असतं.

याशिवाय काही परिस्थितींमध्ये संसर्गाचा धोका वाढू शकतो.

- लैंगिक संबंधांनंतर स्वच्छतेकडे दुर्लक्ष होत असल्यास
- मेनोपॉजनंतर महिलांमध्ये
- रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात नसल्यास

रोगप्रतिकारक शक्ती कमी असल्यास लघवी करताना जळजळ काही दिवसांपासून कायम असेल, वारंवार होत असेल किंवा त्यासोबत ताप, थंडी वाजणे, रक्तमिश्रित लघवी, कंबरदुखी किंवा उलट्या यासारखी लक्षणं असतील तर डॉक्टरांचा सल्ला घेणं आवश्यक आहे. कारण समजण्यासाठी डॉक्टर गरजेनुसार लघवीची तपासणी किंवा इतर चाचण्या सुचवू शकतात. योग्य कारण समजल्यावरच उपचार करणं महत्त्वाचं आहे.

## जास्त पाणी पिण्यानेही बिघडू शकते शरीराचे संतुलन

**कडक** उन्हात फिरल्यानंतर, जास्त घाम आल्यावर किंवा व्यायाम केल्यानंतर पाणी पिल्यास तहान भागणे आणि शरीराला आराम मिळणे ही एक सामान्य प्रक्रिया आहे. मात्र, भरपूर पाणी पिऊनही थोड्याच वेळात पुन्हा घसा कोरडा पडत असेल किंवा वारंवार तीव्र तहान लागत असेल, तर या समस्येकडे निव्वळ हवामानाचा प्रभाव म्हणून दुर्लक्ष करणे महागात पडू शकते.



तज्ज्ञांच्या मते, पाणी पिऊनही सतत तहान लागणे हे शरीरातील पाणी आणि अत्यंत महत्त्वाच्या खनिजांचे संतुलन बिघडल्याचे गंभीर लक्षण असू शकते.

जास्त पाणी पिण्यानेही बिघडू शकते शरीराचे संतुलन आपल्या शरीराला फक्त पाण्याचीच नव्हे, तर सोडियम,पोटॅशियम आणि क्लोराईडसारख्या इलेक्ट्रोलाइट्सचीही तेवढीच गरज असते. हे इलेक्ट्रोलाइट्स शरीरातील पाण्याचे प्रमाण नियंत्रित ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात.

जेव्हा एखादी व्यक्ती कमी वेळात प्रमाणापेक्षा जास्त पाणी पिते, तेव्हा शरीरातील सोडियमचे प्रमाण अत्यंत पातळ होते. यामुळे शरीराचे इलेक्ट्रोलाइट संतुलन बिघडते आणि हे संतुलन पूर्ववत करण्यासाठी शरीर मेंदूला वारंवार तहान लागल्याचे संकेत पाठवते.

डॉक्टरांचा सल्ला कधी घ्यावा?उन्हाळ्यात किंवा शारीरिक मेहनतीनंतर तहान लागणे ही सामान्य बाब आहे. मात्र, कोणतेही उघड कारण नसताना जर तुम्हाला सतत तीव्र तहान लागत असेल आणि पाणी पिऊनही अजिबात आराम मिळत नसेल, तर त्यामागे मधुमेह किंवा किडनीशी संबंधित आजार असण्याची शक्यता असते. अशा वेळी केवळ सतत पाणी पीत न राहता वेळेवर तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्य तपासणी करून घेणे अत्यंत गरजेचे आहे.

# इस्कॉन इचलकरंजीतर्फे श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्साहात



इचलकरंजी,ता.७

..................

**इस्कॉन इचलकरंजीच्यावतीने आयोजित भव्य श्रीकृष्ण जन्माष्टमी महामहोत्सव भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या महोत्सवात इचलकरंजी शहर परिसरातील तीन हजारांपेक्षा अधिक भाविकांनी उपस्थित राहून भगवान श्रीकृष्णांचे दर्शन घेतले.**

यावेळी भगवान श्रीकृष्णांचा विविध पवित्र द्रव्यांनी अभिषेक झाला. मंत्रोच्चार व भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्याने उपस्थित भाविकांना दिव्य आध्यात्मिक अनुभूती दिली. भगवान श्रीकृष्णांना विविध प्रकारच्या पदार्थांचा पारंपरिक 'छप्पन भोग' अर्पण करण्यात आला. वृंदावनधाम येथील कथाव्यास श्रीमान श्रीशकृष्णदास प्रभुजी यांनी भगवान श्रीकृष्णांच्या दिव्य लीला, भक्तीचे महत्त्व आणि आध्यात्मिक जीवनाविषयी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. तिलकधारी गोपाल आणि पारंपरिक गोपी वेशातील चिमुकल्यांची उपस्थिती हे कार्यक्रमाचे आकर्षण ठरले.

यावेळी इचलकरंजीच्या माध्यमातून राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांमधील इस्कॉन गर्ल्स फोरम तसेच कान्हा फन स्कूलच्या संस्कार वर्गातील मुलांनी भगवान श्रीकृष्णांच्या दिव्य लीलांवर आधारित गोवर्धन लीला नाटिका सादर केली. त्यानंतर भव्य हरिनाम संकीर्तनात भाविकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत हरे कृष्ण महामंत्राच्या गजरात लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वजण भक्तिरसात तल्लीन झाले. महोत्सवानिमित्त सर्व भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. तसेच इस्कॉन युथोरम, इचलकरंजीच्या माध्यमातून भव्य श्रीमद् भगवद् गीता तसेच अन्य अध्यात्मिक ग्रंथांचे वितरण अभियान राबविण्यात आले.

# शक्तिपीठ महामार्गाच्या मोजणी नोटिसांची होळी

कोल्हापूर, ता.७(प्रतिनिधी)

..............................

**पवनार (वर्धा) ते पात्रादेवी (गोवा) प्रस्तावित शक्तिपीठ महामार्गासाठी करवीर तालुक्यातील १८ गावांतील बाधित शेतकऱ्यांना बजावण्यात आलेल्या ऑनलाइन मोजणी नोटिसांच्या निषेधार्थ सोमवारी शक्तिपीठ महामार्गविरोधी संघर्ष समिती आणि बाधित शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने केली. यावेळी शेतकऱ्यांनी मोजणी नोटिसांची होळी करत शक्तिपीठ महामार्गाचा प्रस्ताव कायमस्वरूपी रद्द करण्याची मागणी केली. आंदोलनानंतर जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांना निवेदन देण्यात आले.**

शक्तिपीठ महामार्गाची आवश्यकता नसतानाही पर्यावरणाचा ऱ्हास आणि भ्रष्टाचाराला खतपाणी घालण्यासाठी हा प्रकल्प शेतकऱ्यांच्या माथी मारला जात असल्याचा आरोप आंदोलकांनी केला.

यावेळी बोलताना कॉ. गिरीश फोंडे म्हणाले की, ९ सप्टेंबर ते २२ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत प्रस्तावित मोजणी केली जाणार आहे. हरकतींची सुनावणी न घेता सुरू केलेली ही प्रक्रिया म्हणजे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार आहे. सरकारने मोजणी रद्द करावी; अन्यथा मोजणी अधिकाऱ्यांना शेतात पाय ठेवू देणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.

शिवसेना ठाकरे गटाचे विजय देवणे म्हणाले की, शक्तिपीठ महामार्गासाठी जिल्ह्यातील सुमारे १,६०० एकर सुपीक जमीन संपादित केली जाणार असल्याने शेतकऱ्यांच्या उपजीविकेचा प्रश्न निर्माण होणार आहे. शेतकऱ्यांच्या परवानगीशिवाय त्यांच्या जमिनीवर मोजणीच्या माध्यमातून अतिक्रमण करण्याचा प्रयत्न सहन केला जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

यावेळी कॉ. गिरीश फोंडे, विजय देवणे, अमर पाटील, विक्रांत पाटील, प्रकाश पाटील, सम्राट मोरे, बाबासो देवकर, कृष्णात पाटील, युवराज शेटे, नामदेव पाटील, कॅप्टन उत्तम पाटील, यादव, शिवाजी कांबळे, कृष्णात साबळे, ज्ञानदेव पाटील यांच्यासह मोठ्या संख्येने बाधित शेतकरी उपस्थित होते.

# मंडलिक कारखान्याचा दुसरा हप्ता ९० रूपये

मुरगूड,ता. ७ (प्रतिनिधी)–

..........................

**लोकनेते सदाशिवराव मंडलिक सहकारी साखर कारखान्यास गत गळीत हंगाम २०२५-२६ मध्ये गाळपास आलेल्या ऊसाला एफ.आर.पी. प्रमाणे पहिला हप्ता प्रति टन ३४१० रू. प्रमाणे ऊस बिलाची रक्कम यापूर्वीच संबंधीत शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग केली होती. सोमवारी प्रतिटन ९० रुपये प्रमाणे शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग केले असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन संजय मंडलिक यांनी पत्रकार परिषदेत दिली.**



मंडलिक कारखान्याने गत हंगामात ४,४४,३८५ मे. टन इतके गाळप केले आहे. सन २०२५-२६ चा हंगाम सुरु होण्यापूर्वी गळीतास येणाऱ्या ऊसास पहिली उचल प्रति टन ३४१० रू. प्रमाणे व उर्वरीत ९० रू. दुसरा हप्ता असे एकूण प्रति टनास ३५००रू. देण्याचे जाहीर केले होते. त्यानुसार २०२५-२६ मध्ये गळीतास आलेल्या ऊसास प्रति टन ९० रू.प्रमाणे दुसरा हप्ता संबंधीत शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर वर्ग केला आहे.

मंडलिक कारखान्याने नेहमीच एफआरपी पेक्षाही जादा दर देण्याची परंपरा जपली आहे. यापुढेही शेतकऱ्यांना जास्तीत जास्त ऊस दर देण्यासाठी आम्ही कटीबध्द आहोत. तसेच शेतकऱ्यांनी पिकविलेल्या ऊसाला चांगला दर मिळाला पाहिजे,ही नेहमीच व्यवस्थापनाची भूमिका राहील. २०२६-२७ साठी निश्चित केलेले गळीताचे उद्दिष्ट पूर्ण करणेसाठी सभासदांनी आपला पिकविलेला सर्व ऊस कारखान्याकडे गळीतास पाठवावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी कारखान्याचे व्हा.चेअरमन विश्वास कुराडे, शिवाजीराव इंगळे, प्रकाश पाटील, प्रधान भोजे, धनाजी बाचणकर, प्रदिप चव्हाण, कृष्णा शिंदे,नारायण चौगुले, तुकाराम ढोले, पुंडलिक पाटील, संभाजी मोरे, महेश घाटगे, मंगल तुकान,विरेंद्र मंडलिक,अनिल कांबळे,नंदिनीदेवी घोरपडे, प्रतिभा पाटील, नेताजी पाटील,विष्णू बुवा, कारखान्याचे कार्यकारी संचालक एन.वाय. पाटील, सेक्रेटरी सुदाम देसाई व चिफ अकौंट एस.डी. पाटील उपस्थित होते.

# अकॅडमीत विद्यार्थिनींवर अत्याचार

## गोटखिंडीतील घटना : पती –पत्नीवर गुन्हा

आष्टा,ता.७( प्रतिनिधी)–

..............................

**वाळवा तालुक्यातील गोटखिंडी गावातील केतनराज स्पर्धा परीक्षा अकॅडमीत निवासी शिक्षण घेणाऱ्या तीन अल्पवयीन विद्यार्थिनींवर लैंगिक अत्याचार झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी अकॅडमीचा संस्थापक काशिनाथ रामचंद्र नांगरे व त्याला साथ देत मुलींना धमकावणारी त्याची पत्नी मनीषा काशिनाथ नांगरे (दोघे रा.गोटखिंडी) यांच्यावर आष्टा पोलीस ठाण्यात पोक्सो कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत पन्हाळा (जि.कोल्हापूर) तालुक्यातील एका पीडित विद्यार्थिनींच्या नातेवाईकांनी आष्टा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.**

गोटखिंडी येथे काशिनाथ नांगरे यांनी केतनराज स्पर्धा परीक्षा अकॅडमी सुरू केली आहे.या निवासी अकॅडमीमध्ये सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यातील विद्यार्थीनींचे प्रवेश आहेत. काशिनाथ हा ११ जून २०२६ पासून वारंवार कोल्हापूर जिल्ह्यातील व वाळवा तालुक्यातील दोन अशा तीन अल्पवयीन मुलींचा लैंगिक अत्याचार व विनयभंग करीत होता. याबाबतची माहिती पीडित मुलींनी मनीषा नांगरे हिला दिली. मात्र मनीषा हिने कोणालाही सांगू नका, अन्यथा तुमचे शैक्षणिक नुकसान करीन अशी धमकी मुलींना दिली.मात्र पीडित मुलींनी या अत्याचारविषयी पालकांना सांगताच पालकांनी आष्टा पोलीस ठाण्यात धाव घेत फिर्याद दिली.

घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस निरीक्षक सिध्देश्वर जंगम व कर्मचाऱ्यांनी याबाबतची पडताळणी केली. काशिनाथ नांगरे याला पोलिसांनी ताब्यात घेत ईश्वरपूर येथील न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला १० सप्टेंबर पर्यंत पोलीस कोठडी दिली. आष्टा पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात या आठवड्यात बाल लैंगिक अत्याचाराबाबतचा दुसरा गुन्हा नोंद झाला आहे.

# दोन चाकी एमएच के ५१ ही नोंदणी मालिका नियमित सुरु

कोल्हापूर,ता.७ (प्रतिनिधी)

..............................

**नवनिर्मित उप प्रादेशिक परिवहन कार्यालय इचलकरंजीमार्फत आगाऊ दोन चाकी एमएच के ५१ ही नोंदणी मालिका ९ सप्टेंबरपासून नियमित सुरु करण्यात येत आहे. नवीन दोन चाकी एमएच के ५१ पसंती क्रमांकाचे अर्ज ९ व १० सप्टेंबर कार्यालयात स्विकारण्यात येतील, अशी माहिती इचलकरंजी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी श्रीकृष्ण नकाते यांनी दिली.**

वाहन नोंदणी क्रमांकांची मागणी करतेवेळी सुचनांचे पालन करावे.पसंतीचा नोंदणी क्रमांक घेण्यासाठी अर्जासोबत त्या क्रमांकासाठी असलेल्या मुळ रकमेचा डिमांड ड्राफ्ट जोडलेला असणे आवश्यक आहे.

---

**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## SRM TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (SRM Tender) from registered contractors/suppliers on Mahatransco SRM E-Tendering portal for following works under EHV O&M Circle, Kolhapur.**

**Name of work:** SRM E-Tender for Work of Supply, Installation & Commissioning of Controlled Switching Device (CSD) for switching of 125 MVAr Bus Reactor at 400kV R.S. Division, Talandge (1st call).

1. **RFx No.:** 7000041448
2. **Estimated cost:** Rs. 23,66,962/- (Including Taxes)
3. **E.M.D.:** Rs. 23,670/- By Online Payment
4. **Tender Fee:** Rs 500/- + GST By Online Payment
5. **Date of start:** From 08.09.2026 at 00:01 Hrs.
6. **Date of Submission:** Up to Closing date i.e.17.09.2026 at 23:59 Hrs.
7. **Date of opening (Tech. bid):** 18.09.2026 at 10:30 Hrs. onwards; if possible.

For further details visit our website **https://mahatransco.in/**

**Note:** All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tendering portal (**https://srmetender.mahartransco.in**).

**(Save the Energy)**

**Sd/-**
**Superintending Engineer**
**EHV O&M Circle, Kolhapur**

---

जनप/बां.वि./कोटेशन नोटीस/१८२३/२०२६
नगरपरिषद कार्यालय, जयसिंगपूर
दिनांक-०७/०९/२०२६

## जयसिंगपूर नगरपरिषद, जयसिंगपूर
## बांधकाम विभाग
## कोटेशन नोटीस

जयसिंगपूर नगरपरिषद हद्दीतील विविध ठिकाणी आधुनिक पद्धतीचे एस्पिरेशनल टॉयलेट (Aspirational Toilet) बसविणे कामी या एस्पिरेशनल टॉयलेट (Aspirational Toilet) बाबीचे दरपत्रक मागविणेत येत आहे याबाबतचा तपशील जयसिंगपूर नगरपरिषद कार्यालायातील बांधकाम विभागाकडे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल. तरी इच्छुक मक्तेदार/पुरवठादार/संस्था यांनी सदर कामाचे दरपत्रक दिनांक-८/०९/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजलेपासून ते दिनांक-१५/०९/२०२६ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी नगरपरिषद कार्यालयामध्ये सिलबंद लिफाफ्यातून सादर करणेचे आहे. तसेच इतर अटी व शर्ती न.पा. कार्यालयातील बांधकाम विभागाकडे कार्यालयीन वेळेत पाहाणेस मिळतील.

सही/-
**मुख्याधिकारी,**
**जयसिंगपूर नगरपरिषद**

सही/-
**नगराध्यक्ष,**
**जयसिंगपूर नगरपरिषद**

---

## कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर

केंद्र कार्यालय, १०९२- ई, शाहूपुरी, कोल्हापूर.

### वार्षिक सर्वसाधारण सभा नोटीस

(फक्त बँकेच्या व्यक्ती सभासदांकरिता)

**बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार दिनांक २८/०९/२०२६ इ. रोजी होणार आहे.** महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ च्या नियम क्रमांक २२ (१) (अ) अन्वये बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मतदान करण्याचा व्यक्ती सभासदांचा हक्क मर्यादित करणेत आला आहे. या मर्यादेचे स्वरुप असे कि, व्यक्ती सभासदांनी आपल्या सभासद संख्येच्या दर २५ सभासदांचे करिता एक या प्रमाणे प्रतिनिधी निवडावयाचे आहेत. मात्र अशा तऱ्हेने एकूण व्यक्ती सभासदांच्या प्रतिनिधीची संख्या संस्थांच्या प्रतिनिधींच्या संख्येच्या एक चतुर्थांशपेक्षा जास्त असता कामा नये. दिनांक ३१/०३/२०२६ इ. रोजी बँकेच्या सभासद रजिस्टरवर ज्या व्यक्ती सभासदांची नांवे असतील अशा सभासदांनी सोमवार दिनांक २८/०९/२०२६ इ. रोजी होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेस व्यक्ती सभासदांतर्फे भाग घेणेकरिता त्या व्यक्तीनी अधिकृत प्रतिनिधी निवडणेचे आहेत ते खालीलप्रमाणे

टीप:

१] दर २५ व्यक्ती सभासदांकरिता एक प्रतिनिधी याप्रमाणे जास्तीत-जास्त २९ प्रतिनिधी
२] सदर अधिकृत निवड झालेल्या प्रतिनिधींनाच सभेच्या कामकाजात भाग घेता येईल.
३] सदर प्रतिनिधीची मुदत एक वर्ष राहिल.
४] सदर व्यक्ती सभासदांची, प्रतिनिधी निवडणेकरिता **सभा सोमवार दिनांक २८/०९/२०२६ इ. रोजी दुपारी १२.०० [बारा] वाजता महासैनिक दरबार हॉल, सर्किट हाऊस जवळ लाईन बझार रोड, कसबा बावडा कोल्हापूर** येथे भरणार आहे. तरी सर्व सभासदांनी हजर रहावे ही विनंती.

मा. संचालक मंडळाचे हुकूमावरुन
सही/-
**जी. एम. शिंदे,**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**स्थळ : कोल्हापूर**
**दिनांक : ०८/०९/२०२६**

---

**महावितरण**

## ई-निविदा सूचना

महावितरण कंपनीच्या नोंदणीकृत ठेकेदारांकडून कोल्हापूर मंडल कार्यालय अंतर्गत ई-निविदाद्वारे खालीलप्रमाणे निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | निविदा क्र. | तपशील | निविदा रक्कम (लाखात) | निविदा किंमत | बयाणा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | SE/KC/Tech/ DT BOX REP/ T-11/2026-27 | Repairing and Maintenance (Reconditioning) work of Three Phase Transformer Distribution Boxes of various capacities at site and its allied works on "Turnkey Basis" at Ichalkaranji, Jaysingpur & Kolhapur urban division under Kolhapur Circle. | रु. ७५.०० | रु. ५०००/- + १८% GST | रु. ७५,०००/- |

महावितरण ई-निविदा https://www.mahadiscom.in/etender: या संकेतस्थळावर बिड कागदपत्रांची उपलब्धतेची तारीख ०८.०९.२०२६(०९:००) व निविदा भरण्याची अंतिम तारीख २०.०९.२०२६(२३:५०). संपर्क क्र.७८७५७६९०९७.

**KOPZ PRO No. - PRO/KOPZ/१७५/२०२६-२७** **अधीक्षक अभियंता (कोमं), कोल्हापूर**

---

## वसुली अधिकारी
## जनसेवा सहकारी पतसंस्था मर्या., कोतोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर
### नमुना झेड (Z)
### महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १०७ पोटनियम (११) (ड-१) पहा)

ज्याअर्थी खाली सही करणार वसुली अधिकारी जनसेवा सहकारी पतसंस्था मर्या., कोतोली, ता. पन्हाळा, जि.कोल्हापूर यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ नियम १०७ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानूसार मा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था पन्हाळा यांचेकडील महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ नुसार वसुली प्रमाणपत्र क्रं.२२९/२०२६ दि.२३/०३/२०२६ यात नमूद न्यायनिर्णीत ऋणको श्री लक्ष्मण देवाप्पा कांबळे यांचेकडून रु.१,७९,१००/- व मुद्दल रूपये १,५०,०००/- यावर द.सा.द.शे. १४% प्रमाणे दि.०१/०१/२०२६ पासून पुर्ण वसुली होईपर्यंत होणारे व्याज खर्च व कॉस्ट ऑफ प्रोसेस इ. अशी एकूण होणारी रक्कम वैयक्तीक अगर संयुक्तीकरीत्या येणे आहे. याकरिता प्राप्त अधिकारानुसार खालील परिशिष्ठातील स्थावर मालमत्ता वसुली अधिकारी यांनी कर्जदार यांचे थकबाकी वसुलीकरीता स्थावर मालमत्ता धारकाच्या हिश्याचे मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मिळकत धारकाचे नाव | स्थावर मिळकतीचे वर्णन | चतु:सीमा | क्षेत्र | शेरा |
|---|---|---|---|---|
| कोल्हापूर जिल्हा व तहसिल पन्हाळा मौजे कोतोली ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर श्री देवाप्पा चंद्राप्पा कांबळे | मौजे कोतोली येथील गट नं. १५४८ क्षेत्र ०.०६.०० शेतमिळकत | पूर्वेस-श्री आप्पाणा रूद्राप्पा दाभाडे यांची शेत मिळकत पश्चिमेस-श्री बळी धोंडी कांबळे यांची शेतमिळकत दक्षिणेस-श्री केरबा दत्तु कांबळे यांची शेतमिळकत उत्तरेस-श्री आनंदा शंकर पाटील यांची शेतमिळकत | मौजे कोतोली येथील गट नं. १५४८ क्षेत्र ०.०६.०० शेतमिळकत | सहकर्जदार श्री देवाप्पा चंद्राप्पा कांबळे यांची स्वत:ची मिळकत |

वर नमूद हूकूमनाम्याकरीता दि. १८/०५/२०२६ रोजी ऋणकोला तसेच सर्व जाबदार यांना मागणी नोटीस तद्नंतर नोटीसीत निर्दिष्ठ केलेल्या मुदतीत जाबदारांनी वैयक्तीक अगर संयुक्तीकरीत्या रक्कम न भरलेने दि.२०/०७/२०२६ रोजी प्रतिकात्मक ताबापूर्व नोटीस लागू केलेली आहे. यास्तव परिशिष्ठात नमूद केलेली जप्त आदेशाने मनाई केलेली स्थावर मिळकत जप्त करणेत आली आहे.

ऋणको यांनी रक्कम जमा करणेस कसूर केलेमुळे ऋणकोला आणि सर्व नागरीकांना याप्रमाणे नोटीस देणेत येत आहे, वर नमूद केलेल्या परिशिष्ठातील स्थावर मालमत्तेचे खाली सही करणाऱ्यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील १०७ (११) (ड-१) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार दि. २१/०८/२०२६ इ. रोजी प्रतिकात्मक ताबा घेतला आहे.

विशेषकरून ऋणकोला आणि सर्व नागरीकांना याद्वारे सावध करणेत येत आहे की, वर नमूद स्थावर मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास जनसेवा सहकारी पतसंस्था मर्या., कोतोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर यांच्या बोजाची रक्कम याला अधीन राहावे लागेल.

**दि. २१/०८/२०२६**
**ठिकाण – कोतोली**

सही
**श्री. एस. बी. पाटील**
**वसुली अधिकारी**
**जनसेवा सहकारी पतसंस्था मर्या., कोतोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर**

---

## महाराष्ट्र शासन,
## कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, कोल्हापूर
## दरपत्रके मागणीबाबत सन २०२६-२०२७

**कामाचे नांव :– उपविभागीय अभियंता, इमारत प्रकल्प उपविभाग, कोल्हापूर अंतर्गत राजर्षी शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय शेंडा पार्क, कोल्हापूर आवारामध्ये बॅडमिंटन/टेबल/बास्केट बॉल कोर्टचे बांधकाम करणे.**

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, कोल्हापूर या विभागीय कार्यालयांतर्गत उपविभागीय अभियंता, इमारत प्रकल्प उपविभाग, कोल्हापूर यांचेकडील विषयांकित कामाकरिता वस्तु उत्पादक/कारागीर/पुरवठादारांकडून खालील बाबी (Item) करिता दरपत्रके मागविणेत येत आहेत. तरी आपण आपली दरपत्रके **कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, कोल्हापूर, मुख्य पोस्ट कार्यालय, रमणमळा, ताराबाई पार्क, कोल्हापूर– ४१६००३** या पत्यावर सिलबंद लखोट्यामधून पाठविणेची आहेत. सदरच्या दरपत्रकामध्ये जी.एस.टी. आकार स्वतंत्रपणे दर्शविणेत यावेत. उक्त दरपत्रके प्रशासकीय कामकाजासाठी तसेच अंदाजपत्रके तयार करणेसाठी वापरणेत येणार आहेत. याची नोंद घ्यावी. सदरची दरपत्रके हि **दि. १५/०९/२०२६** रोजी १७.०० पर्यंत या कार्यालयात पोहोचतील अशारीतीने पाठविणेत यावीत. शक्य झाल्यास सदर दरपत्रक त्याच दिवशी उघडण्यात येतील.

| Sr. No. | Description | Qty. |
|---|---|---|
| 1 | Providing and fixing BWF compliant Indoor Badminton Court Sports Flooring system of size 13.40 m x 6.10 m (44 ft x 20 ft) for doubles court, comprising 21 mm thick kiln-seasoned imported Maple wood surface boards of 55-90 mm width, random length, T&G with finger-lock joints and air-pass grooves at bottom, anti-termite and water-resistant treated, fixed over 70 x 45 mm anti-termite-treated Pine Wood runners at 300 mm c/c supported on 10 mm thick resilient air-cushion rubber pads at 350 mm c/c over 100-200 micron vapour barrier laid on prepared and levelled concrete base, including necessary peripheral expansion gaps, machine sanding and finishing with approved water based polyurethane finish and over which approved 4.5mm thick 100% PVC sports flooring, green colour, with min 26% shock absorption, non-slip, wear-resistant, noise-proof, stretch-resistant and anti- microbial properties, supplied in 1.80 x 15.00m rolls, joints by approved SR solution or plastic welding, including approved water-based PU game-line marking as per BWF norms for doubles/singles sidelines, long / short service lines and centre line, including all materials, labour, adhesives, hardware, T&P, transportation, wastage and incidental works, complete in all respects as per BWF Laws, approved drawings and specifications, relevant sports performance standards suitable for indoor badminton use, with 5 years warranty for materials, installation and workmanship, complete to the satisfaction of Engineer-in-Charge. | Per Sq. mtr. |

Sign./-
**Executive Engineer,**
**Public Works Division, Kolhapur.**

टीप :–

**१) सदर कामांच्या बाबींसाठी लागणारे नकाशे** Drawings **व दरपृथ:करण प्रपत्रे** (Rate Analysis) **या विभागातील प्रकल्प शाखा तसेच उपविभागीय अभियंता, इमारत प्रकल्प उपविभाग, कोल्हापूर यांचेकडे पहावयास मिळतील व कोणतेही अगर सर्व दरपत्रके मंजूर अथवा नामंजूर करणेचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, कोल्हापूर यांनी राखून ठेवला आहे. याची नोंद घ्यावी.**

**२) उपरोक्त साहित्यांचे दर हे विभागांचे दरसुचीमध्ये समाविष्ठ नसलेने महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र. २०१७/प्र.क्र.-११/नियोजन-३/२०१८ दि.२९/१०/२०१८ नुसार दर मंजूर करून घेणेचे असलेने न्युनत्तम दरपत्रक धारकांस पुरवठा आदेश या कार्यालयाकडून देणे बंधनकारक नाही यांची नोंद घ्यावी.**

**३) दरपत्रक नोटीस ही विभागाचे** "www.mahapwd.gov.in" **व** "https://www.paytopwd.com" **या संकेत स्थळावर प्रसिध्द केली आहे. ती सिलबंद लखोट्यात या कार्यालयात सादर करावी. (ऑनलाईन दरपत्रकधारकास फि रक्कम रु.५००/- इतकी राहील.)**

विमाका/कोल्हापूर/११२/२०२६-२०२७

---

## कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर

केंद्र कार्यालय, १०९२ - ई, शाहूपुरी, कोल्हापूर.

### वार्षिक सर्वसाधारण सभा नोटीस

[ फक्त बँकेच्या सभासदांकरिता ]

**कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., कोल्हापूर या संस्थेची ८८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार दिनांक २८/०९/२०२६ इ. रोजी दुपारी ०१.०० [ एक ] वाजता महासैनिक दरबार हॉल, सर्किट हाऊस जवळ, लाईन बझार रोड, कसबा बावडा - कोल्हापूर येथे भरणार आहे. सदर सभेमध्ये खालील कामे करणेत येतील. तरी सर्व सभासदांनी उपस्थित रहावे, ही विनंती.**

**सभेपुढील विषय**

**१] मागील दिनांक ०८ सप्टेंबर २०२५ इ॥ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.**
**२] दिनांक ३१/०३/२०२६ इ॥ रोजी संपलेल्या सालातील बँकेच्या कामकाजाचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक स्विकारणे आणि मा. संचालक मंडळ शिफारशीनुसार नफा वाटणीस मंजुरी देणे.**
**३] सन २०२५-२०२६ सालच्या अंदाजपत्रकापेक्षा ज्या बाबीवर जादा खर्च झालेला आहे त्यास व सन २०२६-२०२७ सालच्या अंदाजपत्रकास मा. संचालक मंडळ सभेचे शिफारशीप्रमाणे मंजुरी देणे.**
**४] सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षणाच्या दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.**
**५] सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.**
**६] सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षणासाठी वैधानिक लेखापरिक्षकाची नियुक्ती करणे.**
**७] सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात सामोपचार कर्ज परतफेड योजनेअंतर्गत व अवसायनातील संस्थांना अवसायन तारखेचा लाभ देऊन शेती व बिगर शेती विभागाकडे वसुल झालेल्या संस्थांच्या केलेल्या जमा खर्चास मान्यता देणेबाबत.**
**८] सन २०२६-२०२७ करिता बाहेरील कर्ज उभारणी मर्यादा निश्चित करणे बाबत.**
**९] मा. सभेचे अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांवर विचार करणे.**

मा. संचालक मंडळाचे हुकुमावरुन
सही/-
**जी. एम. शिंदे,**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**स्थळ : कोल्हापूर**
**दिनांक : ०८/०९/२०२६**

टीप:

१] सभासदांना बँकेच्या अहवाल व ताळेबंदासंबंधी माहितीवजा प्रश्न विचारावयाचे असतील **त्यांनी दिनांक १९/०९/२०२६ अखेरपर्यंत लेखी स्वरुपात बँकेच्या १०९२ ई, शाहूपुरी कोल्हापूर** येथील केंद्र कार्यालयाकडे अथवा **Email: manager.board@kolhapurdccb.bank.in** या इमेल आयडीवर पाठवावेत.

२] संस्था सभासदांनी आपले प्रतिनिधी बाबतचा ठराव अहवालात जोडलेल्या नमुन्याप्रमाणे दिनांक १९/०९/२०२६ अखेर बँकेच्या १०९२ ई, शाहूपुरी, कोल्हापूर येथील केंद्र कार्यालयाकडे पाठवावा. बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी उपस्थित राहणेसाठी संस्थेने निवड केलेला प्रतिनिधी त्या संस्थेचा थकबाकीदार असता कामा नये. तसेच ठरावाची एक प्रत प्रतिनिधीनी सभेस हजर राहताना कृपया बरोबर आणावी.

३] प्रतिनिधींनी सभेला येतेवेळी बँकेच्या वार्षिक अहवालाची प्रत सोबत आणणे विषयी विनंती आहे.

४] वरील प्रमाणे वार्षिक सर्वसाधारण सभा ही कोरम अभावी तहकूब केली गेल्यास त्याच दिवशी विषय पत्रिकेत नमूद असलेल्या विषयांचे विचारार्थ आणि निर्णयार्थ त्याच ठिकाणी ठरलेल्या वेळेच्या अर्ध्या तासानंतर सभेचे कामकाज सुरु करणेत येईल. अशा तऱ्हेने तहकुब झालेल्या सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.

# ३० चौकार,७ षटकार; इशानची वादळी खेळी



दुलीप ट्रॉफी स्पर्धेच्या फायनलच्या मुकाबल्यात इशानने २७० धावांची मॅरेथॉन खेळी साकारली. दक्षिण विभागाच्या दर्जेदार आक्रमणाविरुद्ध खेळताना इशानने ३० चौकार आणि ७ षटकार लगावले. इशानकडे पूर्व विभागाचे नेतृत्वही आहे दुलीप ट्रॉफी स्पर्धेचे जेतेपद पूर्व विभागाच्या हातून निसटू नये यादृष्टीने इशानची खेळी निर्णायक आहे.

भारताच्या टी २० संघाचा अविभाज्य भाग असलेला इशान आता कसोटी आणि वनडे संघातही स्थान पटकावण्याच्या शर्यतीत आहे.

२८ फेब्रुवारी २०२४ रोजी बीसीसीआयने वार्षिक करारबद्ध खेळाडूंची यादी जाहीर केली. या यादीतून श्रेयस अय्यर आणि इशान किशन यांना वगळण्यात आले होते. श्रेयसच्या फिटनेससंदर्भात स्पष्टता नसल्याने तर इशानने वैयक्तिक कारणास्तव ब्रेक घेतल्याने त्यांचा यादीत समावेश करण्यात आला नाही. वनडे प्रकारात द्विशतक नावावर असणारा इशान हा ऋषभ पंतनंतर विकेटकीपिंगसाठी प्रथम प्राधान्य होता. मात्र आयपीएलसाठी तयार राहण्यासाठी इशानने झारखंडसाठी खेळणे सोडून दिले. बीसीसीआयला इशानचे हे वागणे पसंत पडले नाही. डोमेस्टिक क्रिकेटला प्राधान्य द्या असे सांगितलें असतानाही इशानच्या या कृतीने बीसीसीआयने कारवाई केली.

करारबद्ध खेळाडूंच्या यादीतून बाहेर पडल्याने भारतीय संघनिवडीवेळी प्राधान्याने त्याच्या नावाचा विचार होणार नाही हे स्पष्ट झाले इशानच्या अनुपस्थितीत ध्रुव जुरेलला कसोटी पदार्पणाची संधी मिळाली. इशानने खणखणीत खेळ आणि नेतृत्वातून निवडसमितीला दखल घ्यायला भाग पाडले. इशानच्या नेतृत्वात झारखंड संघाने २०२५-२६ हंगामात सय्यद मुश्ताक अली स्पर्धेचे जेतेपद पटकावले. हरयाणाविरुद्धच्या फायनलच्या मुकाबल्यात इशानने ४९ चेंडूत १०१ धावांची तडाखेबंद खेळी केली. यामध्ये १० षटकारांचा समावेश होता. या स्पर्धेत इशानने १० डावात १९७च्या स्ट्राईकरेटसह ५१७ धावा केल्या. या स्पर्धेदरम्यान इशानने त्रिपुराविरुद्ध ५० चेंडूत ११३ धावांची खेळी केली. सय्यद मुश्ताक अली स्पर्धेत सर्वाधिक शतके (५) झळकावणाऱ्या विक्रमाची त्याने बरोबरी केली.

# ईस्ट झोनचा धावांचा डोंगर

चेन्नई,ता.७ –

**ईशान किशनच्या २७० धावांच्या जोरावर ईस्ट झोनने पहिल्या डावात ७०८ धावांचा डोंगर उभा केला. त्याच्या प्रथम-श्रेणी कारकिर्दीतील हे दुसरे द्विशतक आणि दुलीप ट्रॉफीमधील पहिले द्विशतक होते. किशनसोबतच कुमार कुशाग्रनेही शतक झळकावले आणि संघाला ही धावसंख्या गाठण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.**

किशनला त्रिशतक करण्याची एक उत्तम संधी मिळाली होती, पण ती त्याच्या हातून निसटली. पहिल्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत, ईस्ट झोनने ४ गडी गमावून ३८५ धावा केल्या होत्या. दुसऱ्या दिवशी, ईस्ट झोनच्या फलंदाजांनी साऊथ झोनच्या गोलंदाजांवर जोरदार हल्ला चढवला. आणि पहिल्या दिवसाप्रमाणेच त्यांची धुलाई केली. दुसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत ईस्ट झोनचा संघ ७०८ धावांवर सर्वबाद झाला.

पहिल्या दिवसाचा खेळ संपता संपता इशानने शतक पूर्ण केले होते. दुसऱ्या दिवशीही त्याने शानदार फलंदाजी करत २७० धावा केल्या. आपल्या प्रथम-श्रेणी क्रिकेट कारकिर्दीत त्रिशतक झळकावण्याची इशानला पहिलीच संधी मिळाली होती, पण त्याचे स्वप्न भंगले. इशानने ३३४ चेंडूंमध्ये ३० चौकार आणि ७ षटकारांसह २७० धावा केल्या. या

## पहिल्या डावात ७०८ धावा

## इशान किशनचे त्रिशतक हुकले

काळात त्याचा स्ट्राईक रेट ८०.८४ होता.

किशन व्यतिरिक्त, कुमार कुशाग्रनेही साऊथ झोनच्या गोलंदाजांना चांगलेच धारेवर धरले. त्याने आक्रमक फलंदाजी करत शतक झळकावले. कुशाग्रने १३२ चेंडूंमध्ये ८ चौकार आणि ५ षटकारांसह १०१ धावा केल्या. ईस्ट झोनच्या तळाच्या फलंदाजांनीही चांगली कामगिरी केली. अनुकूल रॉयने ४५ धावा, मोहम्मद कौनियान कुरेशीने ४० धावा आणि मोहम्मद शमीने २८ धावा केल्या. दक्षिण विभागासाठी त्रिपुराना विजय हा सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला, त्याने चार बळी घेतले. दुसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत पूर्व विभागाने ७०८ धावा केल्या होत्या. आता तिसऱ्या दिवशी सर्वांचे लक्ष साऊथ झोनच्या फलंदाजांच्या कामगिरीवर असेल.



# इंग्लंडच्या वन-डे, टी-२० संघासाठी पीटरसनची स्पेशालिस्ट मेंटॉर म्हणून नियुक्ती

लंडन, ता.७ –

**२०२७ च्या वनडे विश्वचषकाच्या पार्श्वभूमीवर इंग्लंडच्या पुरुष व्हाईट-बॉल (वनडे आणि टी-२०) संघांसाठी इंग्लंडचा माजी कर्णधार केविन पीटरसनची स्पेशालिस्ट मेंटॉर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्याची पहिली जबाबदारी ऑस्ट्रेलिया आणि त्यानंतर दक्षिण आफ्रिकेचा व्हाईट-बॉल दौरा असेल. त्यानंतर पाकिस्तान आणि न्यूझीलंडविरुद्धच्या मायदेशातील मालिकांसाठी तो पुन्हा संघाशी जोडला जाईल.पुढील १२ महिन्यांत विश्वचषकाच्या दिशेने वाटचाल करताना संघासोबत काम करेल. ही प्रमुख वनडे स्पर्धा दक्षिण आफ्रिकेत होणार असून, झिम्बाब्वे आणि नामिबिया हे देश त्याचे सह-यजमान असतील.**

पीटरसन हा ब्रेंडन मॅक्युलमच्या कोचिंग टीममध्ये सामील होईल. या टीममध्ये मार्कस ट्रेस्कोथिक, टिम साउथी, सारा टेलर आणि जीतन पटेल यांचाही समावेश असेल. यापूर्वी त्याने आयपीएल फ्रँचायझी दिल्ली कॅपिटल्ससोबत मार्गदर्शक म्हणून काम केले आहे.

पीटरसन म्हणाला की, दक्षिण आफ्रिकेत विश्वचषक जिंकण्याच्या प्रवासात या संघाला मदत करण्यासाठी मला बोलावले गेले, याचा मला अभिमान वाटतो. आमच्याकडे अत्यंत प्रतिभावान व्हाईट-बॉल संघ आहे आणि या खेळाडूंची क्षमता पूर्णपणे विकसित करण्यासाठी त्यांच्यासोबत कठोर परिश्रम करण्यास मी उत्सुक आहे. पुढील १२ महिन्यांत ब्रेंडनच्या थिंक टँकचा भाग असणे ही एक उत्तम संधी आहे.

# श्रीलंका महिला संघ उपांत्य फेरीत

## आशिया कप २०२६ : बांगलादेशचा ११४ धावांत खुर्दा

दुबई,ता.७ –

**महिला आशिया कप २०२६ सध्या दुबईमध्ये सुरू आहे. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारताने साखळी फेरीतील आपले सर्व सामने जिंकून उपांत्य फेरीत प्रवेश केला. श्रीलंकेनेही गट फेरीतील सामन्यात बांगलादेशला पराभूत करत अव्वल स्थान पटकावले. आता श्रीलंका आणि भारत उपांत्य फेरीत पोहोचले आहेत.**



महिला आशिया कप २०२६ च्या दहाव्या सामन्यात बांगलादेशचा सामना श्रीलंकेशी झाला. प्रथम फलंदाजी करताना, बांगलादेश महिला संघाकडून शोभनाने सर्वाधिक ३४ धावा केल्या, तर दिलारा अख्तरनेही २६ धावांचे योगदान दिले. बांगलादेशला केवळ ११४ धावाच करता आल्या, ज्यात चामुडी प्रबोधाने तीन आणि सुगंधिका कुमारीने दोन बळी घेतले. ११५ धावांचे लक्ष्य गाठताना श्रीलंकेने ४४ धावांत पाच गडी गमावले. तथापि, हर्षिता समरविक्रमाने चार चौकार आणि दोन षटकारांसह ३७ चेंडूंमध्ये नाबाद ४८ धावा करून अखेरीस संघाला गट फेरीतील तिसरा सामना जिंकून दिला.

श्रीलंकेच्या महिला संघाने बांगलादेश, युएई आणि इंडोनेशियाला पराभूत करून गट ब मधून उपांत्य फेरीत प्रवेश केला. भारतीय संघाने गट अ मध्ये अव्वल स्थान पटकावले. आता उपांत्य फेरीत भारताचा सामना गट ब मधील दुसऱ्या क्रमांकावरील संघाशी होईल. बांगलादेश आणि युएई यांच्यातील उर्वरित सामन्याचा विजेता उपांत्य फेरीत भारतीय संघाचा सामना करेल. उपांत्य फेरीपूर्वी ८ सप्टेंबर रोजी बांगलादेश आणि युएई यांच्यात उपांत्यपूर्व फेरीसारखा सामना खेळला जाईल, तर भारताचा उपांत्य सामना १० सप्टेंबर रोजी खेळला जाईल.

# वनडे मालिकेसाठी बावुमा कर्णधार

जोहान्सबर्ग,ता.७–

**दक्षिण आफ्रिकेने ऑस्ट्रेलियाविरुध्दच्या आगामी एकदिवसीय मालिकेसाठी संघ जाहीर केला आहे. या संघाचे नेतृत्व नियमित कर्णधार टेंबा बावुमा करणार आहे. अनुभवी फलंदाज डेव्हिड मिलर आणि क्विंटन डी कॉक यांचाही या संघात समावेश करण्यात आला आहे, हे दोन्ही क्रिकेटपटू २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेच्या प्लॅनमध्ये असल्याचे सूचित करतात. सध्या, या दोन्ही क्रिकेटपटूंकडे केंद्रीय करार नाही. पण दोघेही यावर्षीचा टी-२० विश्वचषक खेळले आहेत आणि जगभरातील टी-२० लीगमध्ये सक्रियपणे खेळत आहेत.**

दुसरीकडे, वेगवान गोलंदाज कागिसो रबाडा हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीतून पूर्णपणे बरा न झाल्यामुळे या मालिकेतून बाहेर पडला आहे. त्याच्या अनुपस्थितीत जेराल्ड कोएत्झीला वनडे संघात परत बोलावण्यात आले आहे. कोएत्झीने २०२३ विश्वचषकापासून दक्षिण आफ्रिकेसाठी एकही वनडे खेळलेला नाही. गेल्या तीन वर्षांपासून तो सतत दुखापतींशी झुंज देत आहे, पण अलीकडेच तो दक्षिण आफ्रिका अ संघाकडून खेळून क्रिकेटच्या मैदानात परतला आहे.

मुख्य प्रशिक्षक शुक्री कॉनराड यांनी, विश्वचषकासाठी अजून काही वेळ शिल्लक आहे आणि ही मालिका संघाची रचना सुधारण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. संघाचा उद्देश एक अशी

## दक्षिण आफ्रिकेचा संघ जाहीर : रबाडाचा समावेश नाही





मधली फळी तयार करणे आहे जी स्फोटक तसेच दबावाला तोंड देऊ शकेल आणि डावाला खोली देऊ शकेल,असे सांगितले.

**दक्षिण आफ्रिका संघ –**

टेम्बा बावुमा (कर्णधार), ओटनीएल बार्टमन, कॉर्बिन बॉश, मॅथ्यू ब्रिट्झके, गेराल्ड कोएत्झी, क्विंटन डी कॉक, टोनी डीजॉर्जे, ब्योर्न फोर्टुइन, मार्को जॅन्सन, केशव महाराज, क्वेना माफाका, एडन मार्कराम, डेव्हिड मिलर, लुंगी सेंट रिक्लेब्स, आर.

# शफालीला सेंडऑफ दिला; पाक कर्णधार फातिमा सनाला दंड

नवी दिल्ली,ता.७–

**आशिया चषक २०२६ मध्ये भारताने पाकिस्तानला प्रथम अवघ्या ५६ धावांवर सर्वबाद केले होते आणि नंतर ८.४ षटकांत ७ विकेट्सने विजय मिळवला होता. या सामन्यात दुसऱ्या डावात फलंदाजी करताना पाकिस्तानची कर्णधार फातिमा सना हिने शफाली वर्माला दिलेला सेंडऑफ तिला चांगलात महागात पडला असून तिच्यावर कारवाई करण्यात आली आहे.**



भारत-पाकिस्तान महिला आशिया चषक सामन्यात भारतीय सलामीवीर शफाली वर्माला बाद केल्यानंतर केलेल्या आक्रमक सेलिब्रेशनसाठी पाकिस्तानची कर्णधार फातिमा सनावर कारवाई करण्यात आली. सनाला तिच्या मॅच फीच्या १० टक्के दंड ठोठावण्यात आला असून, तिच्या खात्यात एक डिमेरिट पॉइंटही जोडण्यात आला आहे.फातिमा सनाने शफालीला बाद केल्यानंतर सेलिब्रेशन करताना तिला पॅव्हिलियनमध्ये परत जाण्याचा इशारा केला. शफालीने फातिमाच्या गोलंदाजीवर सरळ फटका मारण्याच्या प्रयत्नात तिच्या हातात सोपा झेल दिला होता. त्यानंतर फातिमाने केलेल्या या इशाऱ्याने सामनाधिकाऱ्यांचे लक्ष वेधून घेतले. मैदानी पंच निमाली परेरा आणि शथिरा जाकीर जेसी, तिसरे पंच रोकेया सुलताना आणि चौथे पंच रबाब अहसान यांनी या प्रकाराबद्दल फातिमा सनावर कारवाई केली.

# द.आफ्रिका दौऱ्यासाठी ऑस्ट्रेलिया कसोटी संघ जाहीर

## खराब कामगिरीनंतरही मार्नस लबुशेनला संधी

सिडनी,ता.७ –

**बांगलादेश विरुद्धच्या खराब कामगिरीनंतरही, ऑस्ट्रेलियाने मार्नस लबुशेनला दक्षिण आफ्रिकेच्या आगामी कसोटी दौऱ्यासाठी संघात कायम ठेवले आहे. ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील तीन कसोटी सामन्यांची मालिका ९ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहे. २०१८ च्या वादग्रस्त दौऱ्यानंतर ऑस्ट्रेलियन संघ प्रथमच दक्षिण आफ्रिकेत कसोटी मालिका खेळणार आहे.**

ऑस्ट्रेलियाने युवा अष्टपैलू खेळाडू कूपर कॉनॉलीचाही संघात समावेश केला आहे. कॉनॉलीने गेल्या वर्षी श्रीलंकेविरुद्ध कसोटी पदार्पण केले होते. त्याच्या नावावर फक्त एक



कसोटी सामना आहे. मॅथ्यू कुनेमन आणि मायकल नेसर यांचाही संघात समावेश करण्यात आला आहे.

कुहनेमन हा डावखुरा फिरकी गोलंदाज असून तो ऑफ-स्पिनर नॅथन लायनला फिरकी गोलंदाजीचा एक अतिरिक्त पर्याय उपलब्ध करून देईल. दरम्यान, नेसर त्याच्या अष्टपैलू क्षमतेमुळे दक्षिण आफ्रिकेत उपयुक्त ठरू शकतो. पोटरीच्या दुखापतीमुळे तो बांगलादेशविरुद्धची कसोटी मालिका खेळू शकला नाही. २०२५-२६ च्या ॲशेस मालिकेत तीन सामन्यांत १५ बळी घेत उत्कृष्ट कामगिरी करणारा नेसर, आपल्या मायदेशी दक्षिण आफ्रिकेविरुध्द खेळण्याची शक्यता आहे.ऑस्ट्रेलियाने मॅथ्यू रेनशॉला ट्रॅव्हिस हेडचा सलामीचा जोडीदार म्हणून कायम ठेवले आहे.

दक्षिण आफ्रिका दौऱ्यातील पहिला कसोटी सामना ९ ऑक्टोबरपासून डर्बनमधील किंग्समीड येथे खेळला जाईल. दुसरा सामना १८ ऑक्टोबरपासून ग्केबेर्हा येथील सेंट जॉर्ज पार्क येथे खेळला जाईल, तर मालिकेतील अंतिम सामना २७ ऑक्टोबरपासून केप टाऊनमधील न्यूलँड्स येथे खेळला जाणार आहे.

**ऑस्ट्रेलिया कसोटी संघ:**

पॅट कमिन्स (कर्णधार), स्कॉट बोलँड, ॲलेक्स कॅरी, कूपर कॉनोली, कॅमेरॉन ग्रीन, जोश हेझलवूड, ट्रॅव्हिस हेड, जोश इंग्लिस, मॅथ्यू कुहनेमन, मार्नस लॅबुशेन, नॅथन लायन, मायकल नेसर, मॅथ्यू रेनशॉ, स्टीव्ह स्मिथ, मिचेल स्टार्क आणि ब्यू वेबस्टर.

# अल्काराझची विजयी घोडदौड कायम

## उपांत्यपूर्व फेरीत बेन शेल्टनशी होणार लढत

न्यूयॉर्क,ता.७–

**अल्काराझने यूएस ओपनमधील आपली विजयी घोडदौड कायम ठेवत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. सबालेंकानेही स्थान मिळवले.गतविजेत्याने टॉमी पॉलवर सरळ सेट्समध्ये विजय मिळवून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला असून, आता त्याचा सामना बेन शेल्टनशी होईल.**



गतविजेता कार्लोस अल्काराझने न्यूयॉर्क येथे सुरू असलेल्या यूएस ओपन २०२६ च्या पुरुष एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत पोहोचण्यासाठी शानदार कामगिरी केली. अल्काराझने अमेरिकन टॉमी पॉलला सरळ सेट्समध्ये पराभूत करून स्पर्धेतील आपला दावा कायम ठेवला. अल्काराझने टॉमी पॉलविरुद्ध सामन्याच्या सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ केला. त्याने हा सामना ६-४, ६-३, ६-४ अशा फरकाने जिंकला. या विजयामुळे अल्काराझची ग्रँड स्लॅम स्पर्धांमधील विजयी मालिकाही कायम राहिली.

यूएस ओपनमधील अल्काराझची आतापर्यंतची कामगिरी प्रभावी ठरली आहे. संपूर्ण स्पर्धेत त्याने फक्त एकच सेट गमावला असून, प्रत्येक सामन्यात त्याने आपल्या तंदुरुस्तीने आणि खेळाच्या दर्जाने प्रभावित केले आहे. उपांत्यपूर्व फेरीत अल्काराझचा सामना आठव्या मानांकित अमेरिकन बेन शेल्टनशी होईल. शेल्टननेही आपल्या मागील सामन्यात उत्कृष्ट कामगिरी करत ग्रीसच्या स्टेफानोस त्सित्सिपासला ६-२, ६-३, ६-४ असे पराभूत करून अंतिम आठ संघांमध्ये स्थान मिळवले.

दरम्यान, जगातील अव्वल महिला एकेरी खेळाडूंपैकी एक असलेल्या आर्यना सबालेन्कानेही उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. तिने अमेरिकेच्या टेलर टाउनसेंडचा ६-४, ६-३ असा पराभव केला. सबालेन्काने सुरुवातीलाच आघाडी घेतली आणि दुसऱ्या सेटमध्ये मागे पडल्यानंतरही तिने एक उल्लेखनीय पुनरागमन केले. दुसऱ्या सेटमध्ये ती १-३ ने मागे होती, पण त्यानंतर तिने सलग पाच गेम्स जिंकून सामन्यावरील आपली पकड मजबूत केली.या विजयासह सबालेन्काने सलग सहाव्यांदा यूएस ओपनच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. तिचा पुढील सामना विद्यमान विम्बल्डन चॅम्पियन आणि सहावी मानांकित लिंडा नोस्कोवाशी होईल. नोस्कोवाने तिच्या मागील सामन्यात मार्टा कोस्त्युकला एका अटीतटीच्या लढतीत पराभूत केले. तिने हा सामना ७-५, ५-७, ६-४ असा जिंकून अंतिम आठ संघांमध्ये प्रवेश केला.

# पाकिस्तान क्रिकेट संघात मॅच-फिक्सिंग?

## काही खेळाडूंचे मोबाईल पीसीबीकडे

इस्लामाबाद,ता.७–

**पाकिस्तान क्रिकेट संघ आणि पाकिस्तान क्रिकेट बोर्डाला पुन्हा एकदा मॅच-फिक्सिंगने घेरल्याची चर्चा सुरू झाली आहे. इंग्लंडविरुद्ध सुरू असलेल्या तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेदरम्यान पाकिस्तान क्रिकेटमध्ये मोठी उलथापालथ झाली आहे. दुसऱ्या कसोटीत पाकिस्तानचा १९४ धावांनी पराभव झाल्यानंतर पाकने तब्बल सात खेळाडूंना संघातून वगळण्याचा निर्णय घेतला. या चर्चांदरम्यान पाकिस्तान क्रिकेट संघात मॅच फिक्सिंग झाल्याची चर्चा क्रिकेट वर्तुळात रंगली आहे.**

पाकिस्तानकडून सात नव्या खेळाडूंचा संघात समावेश करण्यात आला असून, यापैकी पाच खेळाडूंनी अद्याप आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केलेले नाही. सईम अय्युब आणि अब्दुल्ला फझल हे दोन अनुभवी फलंदाज संघात परतले आहेत. तर रझाउल्लाह खान आणि मोहम्मद इम्रान हे वेगवान गोलंदाज, अष्टपैलू, डावखुरा फिरकीपटू अराफात मिन्हास, यष्टिरक्षक साद बैग आणि डावखुरा वेगवान गोलंदाज मोहम्मद इम्रान ज्युनियर यांचा नव्या खेळाडूंमध्ये समावेश आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पाकिस्तान क्रिकेटमध्ये करण्यात आलेले हे मोठे बदल केवळ मैदानावरील खराब कामगिरीमुळे झालेले नाहीत. या कारवाईमागे 'क्रिकेटपेक्षा अधिक' कारणे असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे पुन्हा एकदा पाकिस्तान क्रिकेटमध्ये मॅच-फिक्सिंगच्या चर्चांना उधाण आले आहे. काही खेळाडूंचे मोबाईल फोन पीसीबीकडे जमा करण्यात आले असून अंतिम कसोटी संपेपर्यंत ते बोर्डाच्याच ताब्यात राहणार आहेत. मात्र, कोणत्या खेळाडूंचे फोन जप्त करण्यात आले आहेत, याची माहिती या देण्यात आलेली नाही. तसेच, हे फोन ताब्यात घेण्यामागचे नेमके कारण पीसीबीने अद्याप जाहीर केलेलं नाही.